31 AUGUST TO 06 SEPTEMBER 2020 - Page 1 (CRIME SANDHYA):Layout 1 29/08/2020 8:46 PM Page 1

C M Y K

|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ८ | अंक : ३७ | सोमवार दि. ३१ ऑगस्ट २०२० ते रविवार दि. ०६ सप्टेंबर २०२० | पाने : ८ | किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com | महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक | crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड

## सरकारच्या गाईड लाईनला वरिष्ठांनी कापले पन्नास वर्षांवरील पोलिसांनाही कामाला जुंपले



फाईल फोटो

विरार/लक्ष्मणराव पाटोळे

कोरोनाच्या संकट काळात पोलिसांनी कोविड योद्धे म्हणून जे काम केले आहे ते निश्चितपणे कौतुकास्पद आहे आणि जनतेसाठी आपली सेवा बजावताना अनेक पोलीस कर्मचारी शहीद झाले, तर काही कोरोन बाधित पोलीस कर्मचाऱ्यांवर वेगवेगळ्या रुग्णालयात उपचारही सुरु आहे. ५० वर्षांवरील व्यक्तींना कोरोनाची लागण होण्याचा अधिक धोका असतो असे आरोग्य तज्ञांचे म्हणणे आहे. म्हणूनच पोलीस खात्यावरचा वाढता ताण कमी करण्यासाठी गृहखात्याने एक परिपत्रक काढून ५० ते ५५ वर्ष वयोगटातील पोलीस कर्मचाऱ्यांना पोलीस ठाण्यातच डेस्कवर काम द्यावे आणि ५५ ते ५८ वयोगटातील पोलीस कर्मचाऱ्यांना तसेच ज्यांना मधुमेह आणि उच्च रक्तदाब आहे अशा पोलीस कर्मचाऱ्यांना भर पगारी रजा देऊन घरीच बसवावे, असे परिपत्रकात आदेश आहे. मात्र याच परिपत्रकाच्या अनुषंगाने येत्या विधानसभा अधिवेशनात एक तारांकित प्रश्न उपस्थित करण्यात आला असून त्यात याबाबतची माहिती मागवण्यात आली होती. मात्र अशी माहिती सादर करण्याबाबत पालघर जिल्हा पोलीस अधिकाऱ्यांमध्ये समन्वयच नसल्याने आजही सरकारच्या गाईड लाईनचे उल्लंघन केले जात आहे.

सूत्रांकडून मिळालेल्या माहिती नुसार मोहरम आणि गणेशोत्सव विसर्जनासाठी जिल्हा पोलीस मुख्यालयाकडून विविध पोलीस ठाण्यांसाठी जो अतिरिक्त पोलीस बंदोबस्त उपलब्ध करून देण्यात आला होता, त्यातील कित्येक पोलीस हे ५० वर्षांपेक्षा अधिक वयाचे होते आणि अशा लोकांना बाहेर बंदोबस्तासाठी ठेवण्यात आले होते. त्यामुळे काही पोलिसांना कोरोनाची लागण झाली असण्याची शक्यता आहे. मात्र आता हि बाब उघडकीस येताच पालघर जिल्हा विशेष शाखा आणि आणि स्थानिक पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी एकमेकांकडे बोट दाखवून या प्रकरणातून आपले हात झटकण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची पोलीस महासंचालकांनी चौकशी करून ...पान ६ वर

जिल्हा विशेष शाखेकडून मोहरम व गणेश विसर्जनासाठी जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांना दिलेल्या बंदोबस्ताबाबत अशी माहिती देण्यात आली कि त्यांनी आपल्या पोलीस ठाण्याच्या हद्दीत शासनाच्या गाईड लाईन नुसारच बंदोबस्त द्यावा असे पत्र प्रभारी अधिकाऱ्यांना मुख्यालयातून देण्यात आले आहे, असे जिल्हा विशेष शाखेचे पोलीस निरीक्षक संखे यांनी आमच्या प्रतिनिधी बरोबर बोलताना सांगितले.

## 'यारा'साठी संपला मातृत्वाचा लळा जन्मदातीने आवळला बाळाचा गळा

सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी



शरीर सुखाची चटक आणि त्यातून निर्माण झालेले अनैतिक संबंध इतके वाईट असतात कि माणसाला रक्ताच्या नात्याची किंवा पोटच्या पोराचीही किमत राहत नाही. ज्या मुलाला ९ महिने उदरात वाढवले त्याला आपल्याच हाताने ठार मारण्याचे पाप ज्या बाईच्या हातून घडते तिला आई नव्हे तर कैदासीन म्हणायला हवे. बार्शी येथील वांगरवाडी गावात अशाच एका कैदासिनीने अनैतिक संबंधात अडथला ठरणाऱ्या आपल्या ९ महिन्याच्या पोटच्या गोळ्याला ठार मारून मातृत्वाला कलंक लावला आणि आपले हे पाप लपवण्यासाठी तिने चक्क दरोड्याचा बनाव करून दरोडेखोरांनी आपल्या मुलाला मारल्याची फिर्याद नोंदवली होती. मात्र पोलिसांनी तिचा हा बनाव हाणून पाडला आणि तिला अटक केली. या घटनेने सर्वत्र संताप व्यक्त केला जात आहे.

सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यातील वांगरवाडी येथे नऊ महिन्यांचा बालक वारंवार किरकिर करत असल्याने चोरी झाल्याचा बनवाबनवी करीत चक्क सख्या आईनेच सख्या मुलाचे मोबाईल चार्जरच्या वायरने गळा आवळून खून केला आहे. बार्शी तालुका पोलीस ठाण्याने, सोलापूर स्थानिक गुन्हे शाखेच्या मदतीने दोन दिवसांतच या खून प्रकरणाचा छडा लावला. दोन दिवसांपूर्वी बार्शी तालुक्यातील वांगरवाडी येथे ही घटना घडली होती. अश्विनी स्वानंद तुपे असे आरोपी आईचे नाव असून मंगळवारी तिला अटक करण्यात आली आहे. २२ ऑगस्ट रोजी दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास तालुक्यातील वांगरवाडी येथे सार्थक स्वानंद तुपे (वय ९ महिने, रा. वांगरवाडी) याचा गळा आवळून खून करण्यात आला होता. मुलाचे चुलते आनंद राजेंद्र तुपे (वय २७ रा. वांगरवाडी ता. बार्शी) यांनी अज्ञात व्यक्तीने चोरी करून बालकाचा खून केल्याची फिर्याद दिली होती. यानंतर सोलापूर पोलीस अधीक्षक मनोज पाटील, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे ...पान २ वर

## अभिनेत्याकडे खंडणी मागितल्याने गोत्यात आला आबू सालेम याचा तोतया हस्तक गजाआड झाला

मुंबई/एस.कुमार

आजकालच्या तरुणांना झटपट श्रीमंत होण्याची स्वप्न पडू लागतात आणि त्यासाठी मग कोणत्याही ठरला जाण्याची त्यांची तयारी असतात आणि याच मानसिकतेतून त्यांची पावले गुन्हेगारीकडे वळतात. त्यातच सध्या कोरोनामुळे काही लोकांवर बेरोजगार होण्याची पाळी आल्याने पैशासाठी त्यांनी गुन्हेगारीचा मार्ग अवलंबला आहे. मुंबईतील अशाच एका तरुणाने झटपट श्रीमंत होण्यासाठी चक्क चित्रपट श्रुष्टीतील आघाडीचे निर्माते दिग्दर्शक आणि अभिनेते महेश मांजरेकर यांच्याकडे अबू सालेमचा हस्तक असल्याचे सांगून ३५ कोटीची खंडणी मागितली आणि खंडणी न दिल्यास जीवे मारण्याची धमकी दिली. मात्र पोलिसांनी या खंडणीखोराला मोठ्या शिताफीने अटक केली आहे.





मुंबई शहरातील मराठी व हिंदी सिनेसृष्टीतील नामांकित चित्रपट निर्माते, दिग्दर्शक, लेखक व अभिनेते महेश मांजरेकर यांना दि.२३ आगस्ट रोजी त्याच्या मोबाईलवर अज्ञात इसमाने फोन करून जिवे ठार मारण्याची धमकी देऊन रूपये ३५ करोड इतकी खंडणीची मागणी केली होती. सदर अज्ञात इसमाने खंडणीची मागणी करताना हवाला मार्फत सदरची रक्कम लपकरात लवकर ...पान २ वर

## सोन्याचे आमिष दाखवून लुटणे अंगाशी आले शिकार करायला गेले पण स्वतःच शिकार झाले

अहमदनगर/क्राईम रिपोर्टर

सोन्याचा मोह प्रत्येक माणसाला असतो आणि याच मोहातून अनेक वेळा काही लोकांवर जीव गमावण्याची आली आहे. सोन्या नाण्यासाठी दरोडे तर घातले जातातच, पण सोन्याचे आमिष दाखवून ग्राहकाला लुटण्याच्या घटनाही घडलेल्या. त्यामुळे सोन्याच्या व्यवहारात सावधगिरी बाळगणे अतिशय गरजेचे असते. कारण सोन्याचा मोह दाखवून ग्राहकाची शिकार करणाऱ्या काही गुन्हेगारी टोळ्या ग्रामीण भागात सक्रीय आहेत. कमी पैशात सोने देण्याचे आमिष दाखवायचे आणि सोने खार्दीसाठी आलेल्या ग्राहकाला लुटायचे. अशी या टोळ्यांची कार्य पद्धती आहे. पण सगळेच दिवस काही सारखे नसतात. कारण आजकाल ग्राहक पण हुशार झालेत. त्यामुळे सोने खरेदीच्या व्यवहारात दगा फटका होऊ नये म्हणून तेही तयारीनेच जातात. जळगाव मधील एका महिलेला अशाच एका टोळीने कमी पैशात सोने देण्याचे आमिष दाखवले आणि तिची शिकार करण्याची योजना आखली होती. पण हि योजना बुम्रंग होऊन त्या टोळीवरच उलटली.





कारण सोने खरेदी करण्यासाठी आलेल्या ग्राहक महिले सोबतच्या तरुणाकडे धारदार सुरा होता. त्यामुळे त्यांच्याकडचे पैसे काढून घेण्याचा प्रयत्न त्या टोळीतील लोकांनी करताच त्या तरुणाने त्या टोळीतील लोकांवर प्रती हल्ला केला, अन् चौघांचे गळे चिरून त्यांना ठार मारले. पान ६ वर

## संशयामुळे त्याची मती गुंग झाली म्हाताऱ्याच्या हातून म्हातारी मेली

पाटण/क्राईम रिपोर्टर



माणसाच्या स्वभावाला काही औषध नसते. त्यामुळे तरुणपणात जसा तो वागत असतो तसाच म्हातारा झाल्यावरही वागू लागतो आणि अशी माणसे संशयी असतात. एकदा का त्याच्या मानेवर संशयाचे भूत बसले कि तो एकदम सैर भैर होतो आणि त्याला भांडणा शिवाय काही सुचत नाही, असा संशयी माणूस केवळ त्याच्या पत्नीसाठीच नव्हे, तर संपूर्ण कुटुंबासाठी त्रासदायक ठरलेला असतो. त्यामुळे त्याचा वेळीच बंदोबस्त केला नाही, तर तो एखाद्याचा जीवही घेऊ शकतो. पाटनमध्ये असेच घडले, एक साठ वर्षांचा म्हातारा त्याच्या वयोवृद्ध पत्नीच्या चारित्र्यावर सतत संशय घ्यायचा. घरात सुना, नातवंडे असतानाही पत्नीला मारझोड करायचा आणि एकेदिवशी त्याने पत्नी झोपेत असतानाच तिच्या डोक्यात कुऱ्हाड घालून तिचा खून केला.

पाटण तालुक्यातील दिवशी बुद्रुक येथे उतम महापुरे हा आपल्या पत्नी सावित्री आणि मुलांच्याबरोबर राहतो. त्याच्या ...पान २ वर

## पोलिसांचा खबरी असल्याचा संशय वाढला चोर मित्रांनीच केळेवाल्याचा मुडदा पाडला

जळगाव/क्राईम रिपोर्टर

गुन्हेगारांशी दोस्ती कधी न कधी महागात पडते. कारण एकतर पोलिसांकडून त्रास होतो. नाहीतर गुन्हेगार मित्रच जीवावर उठतात आणि असे लोकं उलट्या काळजाचे असल्याने असे लोकं नातेवाईक किंवा मित्राची परवा करीत नाहीत. रेल्वेत केळी विकणाऱ्या रईस खान याची रेल्वेत चोऱ्या करणाऱ्या टोळीतील तिघांशी मैत्री झाली होती. मात्र हे तिघे एका चोरीच्या प्रकरणात पकडले जाताच त्यांना रईस खान यानेच पोलिसांना टीप दिल्याचा संशय आला आणि याच संशयातून त्या तिघांनी रईसला पोलिसांचा खबरी समजून ठार केले. मात्र पोलिसांनी या तिघानाही अटक केली आहे.





रईसखा रेल्वेत केळी विक्री करत असे. केळी विक्री करुन तो आपल्या कुटूंबाचा चरितार्थ चालवत असे. पत्नी, चार मुल व आईसह तो रावेर येथे रहात होता. त्याचे सावदा येथील एका महिलेसोबत प्रेम प्रकरण सुरु होते. त्याचे त्याच्या पत्नीसोबत कोणत्या ना कोणत्या कारणामुळे वाद होत असत. दरम्यान त्याचे सावदा येथील महिलेसोबात प्रेमप्रकरण सुरु होते. आपल्या पतीचे सावदा येथील परस्त्रीसोबत सुरु असलेला प्रेमाचा सिलसिला ...पान २ वर

## संशयाने मारली मैत्रीला लाथ मित्रानेच केला मित्राचा घात

बोईसर/क्राईम रिपोर्टर



कोणताही गुन्हेगार किती जरी शतीर दिमाग असला तरी पोलीस दोन पावले त्याच्या पुढे असतात आणि त्या गुन्हेगाराने पोलिसांना किती जरी चकवण्याचा प्रयत्न केला तरी पोलीस कधी ना कधी त्याच्या मानेभोवती कारवाईचा फास आवळून त्याची सगळी चलाखी हाणून पाडतात. बोईसरमध्ये असेच घडले. बेपता असलेल्या इसमाचा खून करून जो साळसूदपणे त्याला शोधण्यासाठी फिरत होता. फिर्याद नोंदवण्यासाठी जो पोलीस ठाण्यापर्यंत जाऊन आला तोच अखेर खुनी निघाला. एखाद्या हिंदी चित्रपटाच्या कथेला साजेल अशा या खून प्रकरणात आरोपीने दोन समाजातील भांडणाचा मोठ्या खुबीने स्वतःला वाचवण्यासाठी वापर करण्याचा प्रयत्न केला. पण कानून के हात बडे लंबे होते हे म्हणूनच पोलिसांनी त्याला मोठ्या शिताफीने अटक केली.

बोईसरच्या अवध नगर मधील रोषण गॅरेज गल्लीत राहणारा शिवरत्न रोय उर्फ शिवम हा शनिवारी २२ ऑगस्टच्या ...पान २ वर

## सव्वा लाख घेताना गजाआड झाली प्रांताधिकारी मॅडम लाचखोर निघाली



प्रांत. दिपमाला चौरे







लिपिक अतुल सानप

जळगाव/खास प्रतिनिधी

वाळू माफिया, महसूल अधिकारी आणि पोलीस यांचे साटेलोटे सर्वश्रुत आहेत. त्यामुळे वाळू माफियांवर किती जरी कारवाईचा देखावा केला, तरी प्रत्यक्षात मात्र शासनाचा कोट्यावधींचा महसूल बुडवून महसूल अधिकारी वाळू माफियांकडून मिळणाऱ्या मलीद्यावर करोडपती झालेत आणि आता या लाच खोरीत महिला अधिकारीही मागे राहिलेल्या नाहीत. जळगावमध्ये वाळूच्या तस्करीचे पकडलेले ट्रक सोडण्यासाठी महिला प्रांत अधिकारी दीपमाला चौरे यांनी सव्वा लाखांची लाच मागितली होती. मात्र या बाबतची माहिती लाच लुचपत प्रतिबंध विभागाला मिळताच त्यांनी सापळा रचून छापा टाकला आणि दीपमाला यांना अटक केली. या कारवाईमुळे महसूल विभागाच्या अब्रूचे धिंडवडे निघालेले आहेत.

जळगाव शहरात अँटीकरप्शन विभागाने वाळू प्रकरणात पकडलेले ट्रक सोडून देण्यासाठी एक लाख पंचवीस हजार रुपयांची लाच हस्तकाकरवी घेणाऱ्या प्रांताधिकारी दिपमाला चौरे यांच्यावर यशस्वी छापा टाकण्यात आला. या छाप्यामुळे जळगाव महसुल प्रशासनाच्या अब्रुचे धिंडवडे अर्थात चिंधड्या उडाल्या आहेत. वाळूच्या ठेकेदार वाहतुक व्यावसायीकाकडून त्यांचे नाक दाबून महसुल अधिकारी कशाप्रकारे दणक्यात दरमहा लाखो रुपयांची वसुली करतात त्याचे हे राज्यातील नामी उदाहरण म्हणावे लागेल. जळगावात कोण कोण ब्लॅकमेलर आहेत अशी आरटीआय कार्यकर्त्याकडे विचारणा करणाऱ्या प्रांताधिकारीच लाच प्रकरणात पकडल्या गेल्या. त्यामुळे महसूल खात्यातील खालपासून थेट वरपर्यंत भ्रष्टाचाराची लक्तरे पुन्हा चव्हाट्यावर आली आहेत. सुमारे चार वर्षापुर्वी वाळूचे ट्रक पकडल्याच्या प्रकरणात ...पान २ वर

## शेतीचा वाद प्राणावर बेतला भावानेच भावाचा जीव घेतला

कोल्हापूर/क्राईम रिपोर्टर



मयत आदिनाथ

कोल्हापूर जवळील करवीर तालुक्यातील उपवडे पैकी आरेवाडी येथे गोपीनाथ वाकरेकर आणि सीताराक वाकरेकर याच्यात शेतजमीनाचा वाद बरीच वर्ष चालु होता. त्यातून त्याचा वाद हा वाढत चाललेला होता. अशातच रविवार दुपारी बांधावरील गवत काढण्याच्या वादातून झालेल्या मारहाणीत आदिनाथ वाकरेकर या तरूणाचा मृत्यू झाला होता. सदरची घटना ही रविवार दि.१६ ऑगस्ट २०२० रोजी घडली. आरेवाडी येथे वाकरेकर कुटूंबात शेतजमीनीच्या वादातून बऱ्याच वेळेला भांडण तंटा आणि मारामारी होत होती. सोमवारी झालेल्या दोन गटाच्या मारामारीच्या धुमचक्रीत आदिनाथ वाकरेकर याच्यावर दहा जणांनी प्राणघातक हल्ला केलेला होता. यात विळ्या काठीचा मुक्तपणे वापर करण्यात आलेला होता. त्यात त्याचा मृत्यू झाला होता. या घटनेची नोंद करवीर पोलीस ठाण्यात झाली होती. या घटनेची परस्पर विरोधी तक्रारी दाखल झाल्या होत्या. आदिनाथच्या खूनप्रकरणी पोलीसांनी आठ जणांना ताब्यात घेतले होते. यात दोन महिलांचा ही समावेश होता.



करवीर तालुक्यातील उपवडे पैकी आरेवाडी येथील वाकरेकर कुंटुंब हे सधन आणि प्रगतशील शेतकरी कुटूंब म्हणून ओळखले जात होते. आरेवाडीतील गोपीनाथ वाकरेकर आणि सीताराम वाकरेकर या दोघा सख्या चुलत भावात त्याच्यातील गट नंबर ५२ या शेतजमीनीचा वाद हा बरीच वर्ष चालु होता. त्यातून त्या दोन कुंटूंबात वाद विवाद आणि बऱ्याचवेळेला मारामारी ही ...पान ६ वर

C M Y K

31 AUGUST TO 06 SEPTEMBER 2020 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 29/08/2020 8:47 PM Page 1



## पान १ वरून....

### 'यारा'साठी संपला मातृत्वाचा लळा...

यांनी घटनास्थळी भेट देऊन बार्शी तालुका पोलीस स्टेशन, सोलापूर स्थानिक गुन्हे शाखेला तपासाचे आदेश दिले होते. यानुसार उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. सिद्धेश्वर भोरे यांच्या मार्गदर्शनाखाली गतीने तपास करीत या खून प्रकरणातील आरोपी मुलाची आई अश्विनी स्वानंद तुपे (वय २३ रा. वांगरवाडी ता बार्शी) हीच असल्याचे स्पष्ट झाले आहे. शेजारील एका साक्षीदाराकडून काही माहिती मिळाली अन हा धागा पकडून पोलीस आरोपी पर्यत पोहोचले. या कारवाईत बार्शी तालुका पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवाजी जायपत्रे, बापू शिंदे, लाला राठोड, अजय वाघमारे, तसेच तालुका पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण जाधव पोलीस कर्मचारी, तानाजी धीमधीमे, सचिन माने, राजेंद्र मंगरुळे, विजय घोगरे आदींनी ही कारवाई केली आहे.

### अभिनेत्याकडे खंडणी मागितल्याने ...

त्याचे पर्यत पोहचविण्याची समज सुध्दा दिली होती. तसेच तो गैंगस्टर अबु सालेम उर्फ कंप्टन याचा हस्तक असल्याचे त्याने त्यात नमुद केले. दि. २३ ते २५ आगस्ट रोजीच्या दरम्यान अज्ञात इसमाने वारंवार तक्रारदार यांना धमकीचे संदेश पाठविले तसेच फोन करून त्यांना संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. सदर आलेल्या धमकीच्या संदेशाच्या अनुषंगाने तक्रारदार महेश मांजरेकर यांनी दि.२४ आगस्ट २०२० रोजी दादर पोलीस ठाणे तसेच गुन्हे शाखा, मुंबई येथे तक्रार अर्ज दिला होता . दरम्यान तक्रारदारांना आलेल्या धमकीच्या अनुषंगाने दि . २६ आगस्ट २०२० रोजी दादर पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क , २४७/२०२० कलम ३८५ , ३८७ भा.द.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता. या तक्रार अर्जाची गंभीर दखल घेत मुंबई गुन्हे शाखेच्या खंडणी विरोधी पथकाने सह पोलीस आयुक्त (का.व सु. गुन्हे) विनय चौबे, पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण) अकबर पठाण, सहाय्यक पोलीस आयुक्त, डी (विशेष) शशांक सांडभोर यांच्या मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकाचे प्र.पो.नि. अजय सावंत, पो.नि. सचिन कदम, अरविंद पवार, स.पो.नि. राजु सुर्वे, विश्वास पाटील, सुशिल वंजारी, स.फौ. जाधव, पो.ह. कांबळे, पोना. सचिन पाटील, अनिल रणखांबे, सचिन दळवी, निलेश कंद, पो.शि. स्वप्नील शिंदे, रोहन सुर्वे, सदिप पाटील, पो.शि.चा. नवसारे यांनी गोपनीय चौकशी सुरू करून तपासला सुरुवात केली. या तपासासाठी खंडणी विरोधी पथकाची दोन पोलीस पथके तयार करून तातडीने कल्याण, जि. ठाणे व खेड, जि. रत्नागिरी येथे रवाना करण्यात आली. आरोपी हा गुन्हयासाठी वापरत असलेला मोबाईल सतत बंद ठेवत असल्याने त्याचा शोध घेणे कठिण जात होते. नमुद पथकाने कसोशीने प्रयत्न करून स्थानिक बातमीदार तसेच तांत्रिक विश्लेषण करून फोन करणाऱ्या इसमाचा शोध घेतला व त्यास खेड, जि. रत्नागिरी येथून ताब्यात घेतले व पुढील तपासकामी खंडणी विरोधी कक्ष कार्यालय, मुंबई येथे घेऊन आले. त्याची चौकशी केली असता त्याने आपले नाव, गाव तसेच त्याने हा गुन्हा का आणि कशासाठी केला? याची कबुली पोलिसांजवळ दिली. ती पुढील प्रमाणे. मिलिंद बाळकृष्ण तुळसनकर (वय ३४) रा.१०४ विष्णू दादा अपारमेंट, मूब्रादेवी कॉलनी रोड ट्रॉनसफार्मर जवळ दिवा (पूर्व) जिल्हा ठाणे असे अटक करण्यात आलेल्या या संशयित तरुणाचे नाव असून तो मूळचा साखरोली, ता. खेड, जि. रत्नागिरी येथील रहिवासी आहे. कोविड १९ मुळे तो बेकार झाल्याने त्याच्या हाताला कामधंदा नव्हता. इतरांप्रमाणे त्यालाही झटपट श्रीमंत होण्याचे स्वप्ने पडू लागली. आधीच लॉकडाऊनमुळे बेरोजगार असल्याने मिलींद तुळसनकर याने मग वाममार्ग पत्करण्याची तयारी सुरू केली. त्यासाठी त्याने युटयुबवर गँगस्टर अबु सालेमचे वेगवेगळे व्हिडीओ बघून त्याच्याबाबत तसेच त्याच्या गुन्हेगारी कार्यप्रणालीबाबत माहिती प्राप्त केली. त्यानंतर त्याने ग़ूपशींर.ले वरून या गुन्हयातील फिर्यादी महेश मांजरेकर यांचा मोबाईल नंबर प्राप्त केला व त्यानंतर दिनांक २३ आगस्ट २०२० रोजी नामाकित मराठी व हिंदी चित्रपट क्षेत्रातील निर्माते, दिग्दर्शक, लेखक व अभिनेते महेश मांजरेकर यांना त्याच्या मोबाईलवर संशयित आरोपी मिलिंद तुळसनकर याने फोन करून गँगस्टर अबू सालेम याचा हस्तक असल्याचे सांगून त्याच्या नावाने जिवे ठार मारण्याची धमकी देऊन ३५ करोड रुपये खंडणीची मागणी केली. दरम्यान खंडणीची मागणी करताना हवाला मार्फत ही रक्कम लवकरात लवकर त्याच्या पर्यत पोहचविण्याची समज सुध्दा दिली. दि.२३ ते २५ आगस्ट रोजीच्या दरम्यान अज्ञात इसमाने वारंवार तक्रारदार महेश मांजरेकर यांना धमकीचे संदेश पाठविले तसेच फोन करून त्यांना संपर्क साधण्याचा प्रयत्न केल्याने या धमकीला घाबरून तक्रारदार महेश मांजरेकर यांनी दि .२४ आगस्ट २०२० रोजी दादर पोलीस ठाणे तसेच गुन्हे शाखा, मुंबई येथे तक्रार अर्ज दिला होता. त्यावरून दादर पोलिसांनी अज्ञात आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करून सदरचा गुन्ह्य खंडणी विरुधी पथकाकडे वर्ग करण्यात आला. या पथकाने तपास करून आरोपी मिलिंद तुळसनकर यास साखरोली, ता. खेड, जि. रत्नागिरी येथून दि. २७ आगस्ट रोजी अटक करण्यात आली .यावेळी त्याच्या कडून गुन्हयात वापरलेला मोबाईल फोन व दोन सिमकार्ड हस्तगत करण्यात आले आहेत. झटपट श्रीमंत होण्यासाठी हा मार्ग पत्करल्याचे त्याने पोलिसांजवळ दिलेल्या कबुली जबाबात म्हटलं आहे. त्यास न्यायालयासमोर रिमांडकामी हजर केले असता मा. न्यायालयाने मिलिंद तुसनकर यास २ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी दिली आहे. पुढील तपास खंडणी विरोधी पथकाचे पोलीस करीत आहेत. ही कामगिरी मुंबई गुन्हे शाखेचे सह पोलीस आयुक्त (का. व सु./गुन्हे ) विनय चौबे, पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण) अकबर पठाण व सहाय्यक पोलीस आयुक्त, डी (विशेष) शशांक सांडभोर यांच्या मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकातील प्र.पो.नि. अजय सावंत, पो.नि. सचिन कदम, अरविंद पवार, स.पो.नि. राजु सुर्वे, विश्वास पाटील, सुशिल वंजारी, स.फौ. जाधव, पो.ह. कांबळे, पोना. सचिन पाटील, अनिल रणखांबे, सचिन दळवी, निलेश कंद, पो.शि.स्वप्नील शिंदे, रोहन सुर्वे, सदिप पाटील, पो.शि.चा. नवसारे यांनी पार पाडलेली आहे.

### संशयामुळे त्याची मती गुंग झाली...

लग्नाला जवळपास ३८ ते ४० वर्ष झाली होती. त्याचा मोठा मुलगा निवास हा आपल्या बायको मुलासह पुण्याला नोकरीसाठी असतो. गावातच महापुरे यांची दोन घरे आहेत. एक घर गावात तर दुसरे लक्ष्मीनगर येथील वसतीवरती आहे. बरीच वर्ष हे दोघे नवरा बायको गावातच राहत होते. गावातील शेतीवर त्यांचा उदरनिर्वाह चालत होता. उत्तम हा कधी तरच काम करीत होता. इतर वेळी तो काही ही कामधंदा न करता दारू पिऊन गावातून इकडे तिकडे फिरत होता. त्याच्या संसाराला ३५ वर्ष होत आली तरी तो पत्नी सवित्रीवर चारित्र्याचा संशय घेऊन तिला मारहाण करीत होता. तिच्या वागण्या बोलण्यात तो खोट काढीत होता. घरची शेती कमी असल्याने ती बिचारी दुसऱ्याच्या शेतात मोलमजुरी करायला जात होती. त्यातून ती आपल्या संसाराचा राहट गाडा ओढीत होती. त्याला मात्र याचे काहीच सोयर सुतक नव्हते. तो दिवस रात्र दारू पिवून येऊन बायकाबरोबर भांडण काढून तिला मारहाण करीत होता. ती बिचारी त्याचा मार खावून गप्प राहत होती. त्या भांडणात तो तिला नको नको ते बोलत होता. तिच्या वर संशय घेऊन तिच्या चारित्र्यावर शितोंडे उडवित मारहाण करून तिला सळो की पळो करून सोडीत होता. दिवसामागून दिवस असेच जात होते. मुले मोठी होत होती. मात्र त्याच्या डोक्यातील तिच्या विषयीचा संशयाचा किडा काही केल्या जात नव्हता. आता त्या दोघांनीही आपआपल्या वयाची ५०शी ओलांडली होती. तरी देखील तो आपल्या मुलांच्या सुनाच्या देखत तिला संशय घेऊन मारहाण करीत शिवी गाळ करीत होता. या प्रकाराने तिची मान खाली जात होती. त्याच्या स्वभावात काहीच फरक पडत नव्हता. तो दररोज दारू पिवून येऊन तिला मारहाण करणे एवढेच काम करीत होता. मुले ही मोठी झाली असल्याने त्याना बापाचे वागणे खटकत होते. काय करावे हे त्याना ही समजत नव्हते. त्यानी याबाबत बापाला समजावून ही सांगितले होते. पण तरीही त्याचे वागणे म्हणजे पालथ्या घडयावर पाणी असेच होते. गावात घर, शेती असुन बापाच्या अशा वागण्याने त्याना अपमान झाल्यासारखे वाटत होते. या वयात आपला बाप आपल्या आईला चारित्र्याच्या संशयाने मारहाण करतो म्हणतो म्हणून त्याची मान खाली जात होती. तिने आता पर्यत नेटाने संसार केला होता. तो मार्गस्थ लावलेला होता. पण तो मात्र या वयात म्हातारचळ लागल्यागंत तिच्यावर संशय घेऊन तिला नको नको तशा शिव्या देत होता. म्हणून त्याचा मोठा मुलगा निवास याने यावरती मार्ग काढून गेल्या काही वर्षापूर्वी आई सावित्रीबाई हिला आपल्याबरोबर पुण्याला घेऊन गेला होता. ती त्याच्याबरोबरच सुन, नातवंडा बरोबर पुण्याला राहत होती. गावात दिवशी बुद्रुक येथे उत्तम हा एकटाच राहत होता.

मार्च महिन्यापासून देशात कोरोनाचा संर्सग वाढु लागल्याने लॉकडाऊन करण्यात आले होते. म्हणून निवास हा गेल्या काही दिवसापुर्वी लॉकडाऊन उठविल्यावर आपल्या गावाकडे आई बायको मुलासह गावाकडे राहयला आला होता. तो त्याची आई बायको मुले हे गावातील लक्ष्मीनगर वस्तीतील घरात राहत होते. त्या घराकडे ही उत्तम याचे येणे जाणे हे होतेच. बायको गावाकडे राहयला आल्याने उत्तम याला परत भांडणाचा चेव चढला होता. तो सारखे लक्ष्मीनगर येथील घरात जावून सावित्रीबरोबर भांडण काढून तिच्यावर संशय घेत होता. तुझा यजमान कोण आहे. त्याच्याकडेच जा. म्हणून भांडण करून तिला मारहाण करीत होता. या कारणाने मुलगा उत्तम याने ही त्याला मारहाण केलेली होती. म्हणून तुम्ही माय लेक सुना नातवंडे एकच आहेसा तु तुझ्या आईची बाजू घेऊन मला मारतोस काय असे म्हणून त्याने निवास याला देखील दमदाटी देत तुला आणि तुझ्या आईला ठेवत नाही असे म्हणून धमकावले होते. तो मनातून जास्तच बायकोवर चिडला होता. तिला बघितले की त्याच्या रागाचा पारा चढत होता. तो जास्तच दारु पित होता.दिवसभर दारू पिवून बायको मुलाबरोबर भांडण काढणे हाच त्याचा एकमेव उदयोग झाला होता. त्याच्या अशा विचित्र वागण्याने त्यांच्या ३५ वर्षाच्या संसाराला ग्रहण लागलेले होते. सोमवारी दिवसभर तो दारू पिऊन टल्लय्या होता. त्या रात्री त्याने जेवण न करताच तो झोपला होता. दिवस आणि रात्रभर त्याने बायको मुलाबरोबर भांडण काढले होते. सोमवारी रात्री तो गावातील घरात भांडण काढून झोपायला गेला होता. तर सावित्रीबाई मुलगा निवास आणि सुन आणि नातू हे सगळे लक्ष्मीनगर घरात झोपले होते. पहाटे पहाटे दिवस उजेडायच्या आत तो तसाच लक्ष्मीनगर येथे आला होता. तो दारूच्या नशेत होता. आधीच त्याच्या डोक्यात भांडणाचा राग होता. मनातुन तो बायकोवर चरफडतच होता. बाहेरच्या खोलीचे दार त्याने जरासे लोटून तो आत आला होता. अजुन तांबडे फुटले नव्हते. आजुबाजुचे भावकीतील लोक अजुनही झोपलेले होते. बाहेरच्या खोलीत त्याची पत्नी सावित्रीबाई ही एका कुशीवर गाढ झोपली होती. तर दुसऱ्या खोलीत मुलगा आणि सून झोपले होते. त्याने आजुबाजुचा अंदाज घेतला आणि बाजुलाच पडलेली कुऱ्हाडा उचलून गाढ झोपेत असलेली पत्नी सावित्रीच्या डोक्यात दोन तीनवेळा घातली. त्या कुऱ्हाडीच्या घावासरशी तिच्या तोडातुन मोठयाने किचांळी निघाली होती. त्या सरशी त्याचा मुलगा निवास ही झोपतुन हडबडून जागा झाला होता. बाहेर येऊन बघतो तर बापाच्या हातात रक्तातंन माखलेली कुऱ्हाड होती. तर समोरच आई सावित्री ही रक्ताच्या थारोळ्यात पडलेली होती. हे बघुन त्याने आरडा ओरडा करायला सुरवात केली. त्याच्या ओरडण्याने बाजुला असलेले भावकीतील लोक ही जागे होऊन त्याच्या घराकडे आले होते. त्याचा बाप उत्तम हा मी सावीला मारले. एकदाचे संपवून टाकले म्हणून बडबडतच गावात गेला होता. सकाळ सकाळी तो गावात तसे बडबडत असताना बघून अनेकांना शंका आली होती. त्यांनी घटनास्थळी धाव घेतली होती. गंभीर जखमी असलेल्या आपल्या आईला निवास याने भावकीतील लोकांच्या मदत्तीने कऱ्हाड येथील संह्याद्री हॉस्पिटल येथे उपचारासाठी एका चार चाकी गाडीतून नेले होते. परंतु सध्या कोरोना रुग्णांच्या संख्येत वाढ झाल्याने त्या हॉस्पिटलमध्ये बेडची कमतरता होती. म्हणून तेथील डॉक्टरांनी तिला न तपासताच दुसऱ्या खाजगी दवाखान्यात घेऊन जाण्यास सांगितले. खाजगी दवाखान्यात तिला नेले असता. तेथील डॉक्टरांनी तिचा उपचारापुर्वीच मृत्यू झाला असल्याचे सांगितले. या घटनेची माहिती पाटण पोलीसांना मिळाल्यावर पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले होते. त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा करून या घटनेची माहिती घेतली होती. ही घटना कोणत्या कारणातून घडली आहे याची कल्पना पोलीसांनी आली असल्याने त्यांनी या घटनेतील संशयीत आरोपी उत्तम महापुरे याचा शोध घेण्यास सुरूवात केली. तो या घटनेनंतर गावात मी सावीचा खून केला असे बडबडतच फिरत होता. पोलीसांनी त्याला ताब्यात घेऊन पोलीस स्टेशनला आणून त्यांच्याकडे या घटनेची चौकशी केली असता. त्याने कोणतेही आडेवडे न घेता आपला गुन्हा कबुल करून तो का आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना दिली. त्या पुर्वी पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून घटनास्थळावर पडलेली रक्ताने माखलेली कुऱ्हाड ताब्यात घेतली होती. या घटनेची फिर्याद मुलगा निवास उत्तम महापुरे (वय ३२) याने पाटण पोलीसात दिल्याने पोलीसांनी त्याच्या फिर्यादीवरून सावित्री महापूरे (वय ५५) हिच्या खून प्रकरणी उत्तम सखाराम महापुरे (वय ६०) याच्या विरोधात भा.दं.वी.कलम ३०२ प्रमाणे गुन्हा नोंद करून त्याला कऱ्हाड येथील प्रथमवर्ग न्यायालयात उभे केले असता. मा.न्यायालयाने त्याला चार दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. या घटनेचा पुढील तपास पाटण पोलीस स्टेशनचे प्रभारी स.पो.नि.एम एस.भावीकट्टी हे करीत आहेत. केवळ संशयाने अनेकांचे संसार विस्कटले मोडले तरी ही यातून कुणीच बोध घेत नाही. दारूच्या नशेत त्याना त्या संशयाला जास्तच वाव मिळत असतो. परंतु उत्तम महापुरे सारखी मंडळी ही वयाची ५०शी ओलांडली तरी विचित्र वागत असतात. त्यातुन त्याचा संयम सुटतो आणि त्याच्या हातून खूनसारखी अघटित अशी घटना घडते.म्हणून माणसाच्या स्वाभावाला आणि वागण्याला औषध नसते असे म्हणतात ते बरोबरच आहे.

### पोलिसांचा खबरी असल्याचा संशय ...

त्याच्या पत्नीला समजला होता. त्यामुळे पती पत्नीच्या वादात अजुनच भर पडत होती. पत्नीला पर्याय म्हणून रईसखा जवळ प्रेयसी होती. त्यामुळे एके दिवशी पत्नी व मुलांना सोडून तो सावदा येथे त्याच्या प्रेयसीकडे राहण्यास आला. त्याचे प्रेयसीसोबत मन रमले. त्याचा स्वभाव खुशालचेंडू असल्यामुळे चार वर्ष उलटले तरी तो सावदा येथे प्रेयसीसोबतच रहात होता. रईसखा काही प्रमाणात गुन्हेगारी वृत्तीचा देखील होता. त्याच्या नावे मध्यप्रदेशातील बुरहानपूरच्या लालबाग पोलिस स्टेशनला काही गुन्हे दाखल असल्याचे समजते. केळी विकून आलेल्या पैशात तो प्रेयसीचे लाड पुर्ण करत होता. अशा प्रकारे त्याचे जीवनमान सुरु होते. धावत्या रेल्वेत व्यवसाय करणा-या व्यावसायीकांचा संबध गुन्हेगारी वृत्तीच्या लोकांशी कमी अधिक प्रमाणात येतच असतो. धावत्या रेल्वेत केळी विक्री करणा-या रईसखा याचा संबंध अजहरखान अयुबखान, शराजुशहा दाउदशहा आणि शाहरुखखान कलीमखान यांच्यासोबत येत असे. त्याचे कारण म्हणजे हे तिघे गुन्हेगारी वृत्तीचे मित्र सावदा येथेच रहात होते. रईसखा देखील सावदा येथे प्रेयसीसोबत रहात होता. हे तिघे मित्र देखील रेल्वेशी संबंधीत होते. रईसखा धावत्या रेल्वेत केळी विकत असे तर हे तिघे मित्र धावत्या रेल्वेत चो-या करत असत. केळी विक्रेता रईसखा आपले चोरीचे धंदे पोलिसांना सांगत असल्याचा तिघा मित्रांना नेहमी संशय येत असे. काही दिवसांपुर्वी भुसावळ रेल्वे पोलिसांनी या तिघांना एका चोरीच्या प्रकरणात अटक केली होती. आपल्याबद्दल रईसखा हाच रेल्वे पोलीसांना माहिती देत असल्याचा त्यांना संशय येत होता त्या संशयातून त्यांचा रईसखावर राग होता. रईसखा हा देखील काही धुतल्या तांदळाचा नव्हता. त्याच्यावर देखील मध्यप्रदेशातील बुरहानपुर येथील लालबाग पोलिस स्टेशला काही गुन्हे दाखल असल्याचे सांगीतले जाते. या संशयातून तिघा जणांनी दहा ते बारा वेळा रईसखा सोबत वाद घातला होता. तिघांनी आपल्यासोबत संशयातून वाद घातला असल्याचे त्याने त्याचा रावेर येथील भाऊ शरीफ खा दिलदार खा यास सांगितले होते. या वादामुळे रईसखा वैतागला होता. आपल्या जिवीताला या तिघांकडून धोका असल्याचे रईसला वाटत होते. गेल्या वर्षी शाहरुख खान कलीम खान याचा रईससोबत वाद झाला होता. या वादात शाहरुख याने रईस याच्या डोक्यात लोखंडी आसारी मारुन त्याला जखमी केले होते. या घटनेची सावदा पोलिस स्टेशनला नोंद घेण्यात आली होती. २० ऑगस्ट रोजी पुर्ववैमनस्यातून तिघा जणांनी एकत्र येत रईसखा याचा कायमचा काटा काढण्याचे ठरवले. या दिवशी सायंकाळी पाच वाजता रईस सावदा शहरातील मरिमाता मंदिर परिसराच्या मागील बाजूस उभा होता. त्यावेळी टपून बसलेल्या तिघांनी त्याच्यावर हल्लाबोल केला. तिघांच्या हातात लोखंडी पाईप होते. त्या पाईपांनी त्यांनी बेसावध रईसखा याच्यावर जोरदार हल्ला केला. या हल्लयात रईसखा जवळच असलेल्या चिखलात पडला. त्याच्या डोक्यातून रक्त निघाले. ते रक्त वाहू लागल्याने रईसखा जागीच ठार झाला. रईस खा जिवानिशी गेल्याचे समजताच तिघा हल्लेखोरांनी तेथून पळ काढला. या घटनेमुळे परिसरात एकच हल्लकल्लोळ माजला. परिसरात दहशत माजली. या घटनेची माहिती मिळताच सावदा पोलिस स्टेशनचे स.पो,नि.राहुल वाघ आपले सहकारी पोलिस उप निरिक्षक राजेंद्र पवार, रविंद्र मोरे, संजय चौधरी व इतर कर्मचारी वर्गासह घटनास्थळी दाखल झाले. मयत रईस खा याच्या मृतदेहाचा पंचनामा करण्यात आला. मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयात रवाना करण्यात आला. मयत रईसखा ज्या महिलेसोबत रहात होता ती महिला घटनेच्या वेळी तेथे हजर होती. तिने हा घटनाक्रम पाहिलेला होता. काही वेळाने मयत रईस खा याचा रावेर येथील भाऊ शरीफ खा दिलदार खा तेथे हजर झाला. त्याला त्या महिलेकडून सर्व प्रकार समजला. शरीफ खा दिलदार खा याच्या फिर्यादीनुसार सावदा पोलिस स्टेशनला फरार झालेल्या तिघांविरुद्ध खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हा भाग ५ गु.र.न.३३/२० भा.द.वि.३०२, ३४, १२०(ब) नुसार दाखल करण्यात आला. सावदा पोलिस स्टेशनचे सहायक पोलिस निरिक्षक राहुल वाघ यांनी आपल्या सहका-यांच्या मदतीने तपासाची चक्रे वेगाने फिरवण्यास सुरुवात केली. घटनेनंतर काही तासातच फरार झालेल्या अजहरखान अयुबखान, राजुशहा दाउदशहा, शहारुख खान कलीमखान या तिघांना अटक करण्यात यश मिळवले. तिघा आरोपींना न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने तिघांना सुरुवातीला पोलिस कोठडी सुनावली. तिघे सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत. या गुन्ह्याचा पुढील तपास स.पो.नि. राहुल वाघ व त्यांचे सहकारी पोलिस उप निरिक्षक राजेंद्र पवार, पोलिस नाईक देवा पाटील, बाळू मराठे, रविंद्र मोरे, संजय चौधरी आदी करत आहेत.

### संशयाने मारली मैत्रीला लात...

रात्री ९ वाजता जेवून पब्जी खेळत असताना त्याला त्याचा मित्र अबुझार सिद्दिकी (१९) याने बाहेर बोलावून घेतले आणि त्याला गंगोत्री हॉटेलच्या मैदानात नेवून त्याची गळा दाबून हत्या केली. यावेळी त्याच्या सोबत त्याचा मित्र आरिफ खान हा सुद्धा होता. शिवमला ठार मारल्यानंतर मृतदेह बाजूच्या झाडीत टाकून पोबारा केला. त्यानंतर बराच वेळ शिवम घरी परतला नाही म्हणून त्याची शोधाशोध सुरु झाली. यावेळी शिवामचा खून करणारा त्याचा मित्र अबुझार हा सुद्धा शिवामच्या कुटुंबासोबत शोधायला पुढे पुढे होता. मात्र त्याचा हा बनाव कुणाच्याही लक्षात आला नाही. २६ ऑगस्टला शिवमचा मृतदेह मिळताच खळबळ माजली. त्यानंतर तपास सुरु झाला. अबुझारची सुद्धा चौकशी करण्यात आली. पण त्याने पोलिसांची दिशाभूल करण्यासाठी एक वेगळेच प्रकरण पुढे केले. शिवमच्या मृत्यू पूर्वी तीन दिवस अगोदर त्याचे स्कूटरच्या छोट्याशा अपघातावरून दुसऱ्या समाजाच्या मुलांशी भांडण झाले होते. यावेळी दोन्ही समाजाच्या मुलांची मारामारी झाली. त्यात अबुझारने मध्यस्ती करून ते प्रकरण मिटवले. त्यामुळे त्या दुसऱ्या समाजाच्या मुलांनी शिवमची हत्या केली असावी असे भासवण्याचा त्याने प्रयत्न केला. पण पोलिसांच्या चाणाक्ष नजरेतून त्याची लबाडी सुटू शकली नाही आणि अखेर त्याला त्याचा गुन्हा कबुल करावाच लागला. अबुझार हा शिवामचा मित्र असला तरी त्याला संशय होता कि त्याचे प्रेम संबंध तो उघडकीस आणील. कारण मुलीच्या बापाने अबुझारला आपल्या मुलीला भेटलास तर तुला किंवा मुलीला ठार मारीन अशी धमकी दिली होती. त्यामुळे खरोखरच जर शिवमने आपल्या प्रेयसीच्या बापाला आपल्या प्रेमसंबंधाबाबत सांगितले तर आपली प्रेयसी आपल्यापासून दूर जाईल. कदाचित शिवमचा तिच्यावर डोळा असल्याने तो असे करतोय असा त्याला संशय होता. म्हणून त्याने मित्राच्या मदतीने शिवमला ठार मारले. या प्रकरणाच्या तपासात वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रदीप कसबे, उप निरीक्षक आहोष पाटील, पोलीस शिपाई वैभव, जमादार देवा पाटील, वाघचौरे, हवालदार मरदे यांच्या मदतीने गुन्ह्याचा छडा लावण्यात आला.

### सव्वा लाख घेताना गजाआड झाली...

जळगावातच अशोक सादरे नामक पोलिस अधिकाऱ्याने आत्महत्या केल्याचे प्रकरण घडले. महसुल मंत्र्यांपर्यत उठ बस असल्याचे दाखवणाऱ्यांनी या जिल्हयात अधिकाऱ्यांमधे देखील कार्यकर्ता म्हणून आपल्या कामगिरीची चांगलीच दहशत निर्माण केल्याचे तेव्हा दिसून आले. एवढे होवून देखील जळगाव जिल्हयातील अशाच एका हायप्रोफाईल लाचखोरीच्या प्रकरणात दस्तुरखुद्द जिल्हाधिकारी आपल्याच कार्यक्षेत्रातील प्रांताधिकारी - तहसीलदार यांचा भ्रष्टाचारात सहभाग असल्याच्या आरोपांची चौकशी करण्याची गरज नाही अशा शब्दात वासलात लावतात. त्यामुळे भ्रष्टाचाराच्या खेळातील तलाठी ते तहसीलदार, प्रांत-अप्पर जिल्हाधिकारी पदापर्यतच्या यंत्रणेला रान मोकळे करुन देत जिल्हाधिकारी नामानिराळे राहतात काय? त्यांना तसे अभय - कवच मंत्री पातळीवरुन बहाल करण्यात आले काय? असे प्रश्न लोकचर्चेत आले आहेत. आता सन २०२० च्या जानेवारी महिन्यात वाळू व्यावसायीक अजय बढे यांनी पाच लाख रुपयांच्या खंडणी प्रकरणात गुन्हा नोंदवला. पत्रकार परिषद घेवून पाचोरा प्रांताधिकारी व तहसीलदार यांच्या कार्यक्षेत्रात मध्यस्थांमार्फत व्यवहार होत असल्याचे सांगून एक व्हिडीओ सोशल मिडीयावर व्हायरल केला होता. सुमारे २५ हजार ब्रास वाळू साठा कुठे दडवला ते सांगत तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांनी कारवाईची मागणी केली होती. सिंचन विभागातील भ्रष्टाचारावर देखील यावेळी बोट ठेवण्यात आले. महिनाभरातच एका सिंचन अधिकाऱ्याने तातडीने स्वत:ची बदली मॅनेज केली. तर जिल्हाधिकाऱ्यांनी महसुल अधिकाऱ्यांच्या चौकशीचा बॉल टोलवला. परंतू यावेळच्या गंभीर वाळू प्रकरणाच्या आरोपातील सत्य शोधनावर पांघरुण टाकले. विशेष म्हणजे सन २०१९ मधे जामनेरला जातांना उमाळे परिसरात त्यांनीच घातलेल्या वाळू छापा प्रकरणात पोकलेन मशीन जप्तीसह किती वाळू साठा जप्त झाला? त्याची आकडेवारी जाहीर न झाल्यामुळे यात देखील हेराफेरीचा आरोप होता. यंदाच्या मार्च महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात लॉकडाऊन जाहीर झाले. तरीदेखील वाळू उपसा प्रकरणे गाजत होतीच. त्यातच तहसीलदार आणी प्रांताधिकारी यांच्यावर काही आरोप झालेत. तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांनी तहसीलदारांना काही दिवस सक्तीच्या रजेवर पाठवले. परंतू हाकेच्या अंतरावर असणारी महिला प्रांताधिकारी वाळू प्रकरणात ब्लॅकमेलर्सची चिंता करते. माहीती अधिकार कार्यकर्त्याला माहिती विचारते. त्यांच्या संरक्षणाची मागणी पोलिस महासंचालक, आयुक्त, मुख्यमंत्र्यांपर्यत जाते हा सारा प्रकार वृत्तपत्रातून गाजत होता. असे असतांना प्रांताधिकाऱ्यास जाब विचारला जात नाही, या प्रकाराला काय म्हणावे? कनिष्ठ अधिकाऱ्यांनी शिस्तीत रहावे, लिखीत अलिखीत संकेत व नियम पाळावे असा साळसुदपणाचा आव आणून त्यांनी कोरोना संकटाने बहाल केलेल्या अधिकाराचा दांडपट्टा चालवण्यात धन्यता मानली. जात पडताळणीत गेलेल्या माजी अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यास कोविड यंत्रणेत आणून जनकल्याणाच्या नावे लोकसहभाग विषयक हिरवे मळे पिकवले असे म्हणतात. मे महिन्यात जळगाव जिल्हयात वाळूच्या बनावट पावत्यांचा मुद्दा गाजू लागला. वाळूच्या मलाईदार धंद्यात पोलिस प्रशासनातील काही महाभाग सक्रीय दिसून आले. एकाच पावतीच्या झेरॉक्स अनेक वाहनांना वापरुन लाखो करोडाचा सरकारी महसूल बुडवल्याच्या तक्रारी माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी केल्या. काही महसुल अधिकारी वाळू व्यावसायीक, हस्तक यांच्या मोबाईलचे सिडीआर तपासण्याची मागणी झाली. सरकारी कामाच्या बांधकामासाठी राखीव वाळू गटाची वाळू त्या कामावर वापरण्याएवजी संबधीताने ती काळ्या बाजारात विकल्याचा आरोप झाला. तरीदेखील प्रशासन मख्खपणे पहात बसले. तेव्हाच आरोपकर्त्यांच्या म्हणण्यानुसार अधिकाऱ्यांचे मोबाईल सिडीआर तपासले असते तर नवे जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांच्या ताज्या दमाच्या वाटचालीत त्यांच्यात आवारात प्रांताधिकारी अँटीकरप्शनने पकडण्याचा कलंक लागला नसता. जिल्हाधिकारी दालनाशेजारी पुरवठा विभागात रेशन प्रकरणात एका महिला कारकुनाने चाळीस हजार रुपयांची लाच घेतली. त्यामुळे जळगाव जिल्हयाचे महसूल प्रशासन लाचखोरीचा अड्डा बनल्याचे उघड उघड बोलले जात आहे. तसेही अँटीकरप्शनच्या राज्यस्तरीय रेकॉर्ड मधे लाचखोरीत पोलिस आणि महसुल खाते यांच्यात क्रमांक गाठण्याची स्पर्धा सांगितली जाते. ताज्या लाच प्रकरणात पकडल्या गेलेल्या प्रांताधिकारी दिपमाला चौरे यांच्या घरझडतीत दिड लाख रुपये रोकड, १५ तोळे सोने, ४५ लाखाच्या फ्लॅटची कागदपत्रे, कार, दुचाकी वाहने आढळली. त्या सन २०१० मधे नाशिक जिल्हयात भुसंपादन विभागात सेवेत आल्याचे सांगितले जाते. म्हणजे नोकरीच्या दहा वर्षात त्यांची दिसून आलेली ही कमाई. उघडकीस न आलेल्या मालमत्तेबद्दल बोलणे नको. जळगाव जिल्हयात प्रचंड पैसे खाता येतात असे मंत्रालयात बोलले जाते. त्यामुळे येथेच पोस्टींग विकत घेण्यासाठी अधिकारी वर्गात बोली लागते. त्याचे टेंडर मिळवून देणारे दलाल-हस्तकांचा एक वर्ग आहे. आपण मंत्र्याच्या जवळचे असल्याचे दाखवण्यासाठी अधिका-यांचे वाढदिवसाचे केक घेवून धावपळ करणारे आहेत. कार्यकर्ता बनून अधिकाऱ्यांना निवेदनाची कागद देणारी चमको मंडळी आहे. लोकप्रतिनिधींचे नातेवाईक असल्याचे सांगणारे आहेत. अधिकाऱ्यांच्या हफ्तेखोरीची कॅश गोळा करणारे हवाला रॅकेटर्स आहेत. अधिकाऱ्यांना भरित पार्ट्या, कोंबडा पार्ट्या देणारे आहेत. अधिकारी मंडळींच्या सौभाग्यवतींचे गुणगाण इशस्तवनाप्रमाणे गाणारे आहेत. शेवटी हा भ्रष्टाचाराचा बाजार म्हटला जातो. त्यात बिचारा तलाठी, तहसीलदार, प्रांताधिकारी, अप्पर जिल्हाधिकारी पदानुरुप केवळ दहा रुपयांच्या नोटेपासून ते लाख, पाच पन्नास लाख ते कोटी रुपयांपर्यत घेणारा पकडला जातो. परंतू कधीकाळी जिल्हाधिकारी पदावरील उच्च पदस्थ मात्र अँटीकरप्शनच्या ट्रॅप पासून वेगळा का राहतो? असा भाबडा प्रश्न साध्याभोळ्या कमी शिकलेल्या किंवा निरक्षर लोकांना पडू लागल्याचे समजते. भारतीय प्रशासन सेवेतील सर्वोच्च अधिकारी उच्च शिक्षीत-प्रामाणीक असतात असा राज्यकर्त्यांचा (अर्थात सत्तारुढ) समज आहे. ही कुशाग्र बुद्धिमत्तेची मंडळी हिच प्रशासनाची मास्टर की असल्याने त्यांच्या बळावरच १५ कोटी लोकसख्या असलेल्या वजनदार महाराष्ट्राचा गाडा ओढला जातो. या गाड्याखाली काही अभागे चिरडले गेले तरी त्याची फिकीर कुणाला? ते त्यांचे नशीब. नाही तरी आता कोणता बुलडोझर, रणगाडा कुणाच्या अंगावर घालायचा याचेच आवाज टीव्हीद्वारे कानांवर आदळ आपट करत आहेत.

31 AUGUST TO 06 SEPTEMBER 2020 - Page 3 (CRIME SANDHYA):Layout 1 29/08/2020 8:47 PM Page 1



# वाडा तालुक्यात मंदिरांबाहेर भाजपाचा घंटानाद आंदोलन



**वाडा/प्रतिनिधी**

कुंभकर्णी निद्रेत असलले राज्य सरकार अजूनही मंदिरे उघडे करण्यास नकार देत आहे, एकीकडे सरकारची तिजोरी भरण्यासाठी बियर बार, वाईन शॉपी, सूरु केले मात्र भावीक, भक्तांचे श्रद्धेचे स्थान असलेली मंदिरे मात्र बंद आहेत. ही मंदिरे खुली करण्यासाठी वाडा तालुक्यातील महत्वाच्या मंदिरांबाहेर भाजपा वाडा तालुक्याच्या वतीने शनिवारी घंटानाद आंदोलन करण्यात आले.

वाडा तालुक्यातील सर्व जिल्हा परिषद गटात घंटानाद आंदोलन करण्यात आले वाडा शहरातील राम मंदिर, तिळसा येथील तीळशेश्वर, पाली येथील गणेश मंदिर, साईदेवली, अंबिसते येथील गणेश मंदिर, चिंचघर येथील चिंतामणी मयुरेश मंदिर तर गारगाव येथील मंदिराच्या आवारात सोशल डिस्टन्सिंगच्या नियमांचे पालन करून घंटानाद करून महाआरती घेण्यात आली. उद्धव ठाकरे सरकारला जागे करण्या करिता पूर्ण महाराष्ट्रा मध्ये भारतीय जनता पक्षाच्या वतीने घंटानाद आंदोलन करण्यात आले.

वाड्यातील या घंटानाद आंदोलना मध्ये भाजपाचे राष्ट्रीय सदस्य बाबाजी काठोले, जिल्हा अध्यक्ष नंदकुमार पाटील, उप जिल्हाध्यक्ष संदीप पवार, मनीष देहेरकर, तालुका अध्यक्ष मंगेश पाटील, भाजप युवा मोर्चाचे कुणाल साळवी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# वीज कामगारांचे प्रश्न मार्गी लागणार

## ऊर्जामंत्री डॉ.नितीन राऊत यांनी दिले वीज कर्मचारी संघटनांना आश्वासन



**मुंबई/प्रतिनिधी**

विविध विद्युत कर्मचारी संघटनांच्या प्रतिनिधींशी त्यांच्या समस्या व प्रश्नांबाबत ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी आमदार भाई जगताप यांच्यासह आज बैठक घेतली. या बैठकीत डॉ. राऊत यांनी सर्व संघटनांच्या प्रतिनिधींच्या सूचना व समस्या ऐकून घेत त्यावर सकारात्मक विचार करण्यात येईलअसे आश्वासनयावेळी दिले.

कोरोनामुळे महावितरणच्या महसुलात मोठया प्रमाणात घट झाली आहे. कोरोना काळात वीज कर्मचारी कोरोना योद्धे बनून वीज पुरवठा करण्यासाठी अहोरात्र झटत असल्याचा मला सार्थ अभिमान आहे, अशा शब्दांत वीज कर्मचाऱ्यांचे डॉ. राऊत यांनी कौतुक केले. तसेच सर्व वीज कर्मचारी संघटनांनी या बैठकीत जे मुद्दे मांडले त्याचा सर्व समावेशक विचार करुन अडचणी सोडवण्याची ग्वाही डॉ. राऊत यांनी यावेळी दिली. मागासवर्गीयांचा आरक्षणाचा अनुशेष, बदली धोरण, मयत कर्मचाऱ्यांच्या वारसदारांना अनुकंपा तत्त्वावर नोकरी, फ्रँचाईझी धोरण, कंत्राटी कामगार, पदोन्नती, वीज कायदा सुधारणा, वीज चोरी रोखण्यासाठी भरारी पथकांची संख्या वाढवणे, निवृत्तीधारकांचा प्रश्न सोडवणे इत्यादी विषयांवर विविध कामगार संघटनेच्या वतीने चर्चा व मागणी करण्यात आली. यावर लवकरच तोडगा काढण्याचे आश्वासन उर्जामंत्र्यांनी यावेळी दिले.

कोरोना कालावधीत सर्व वीज कर्मचाऱ्यांनी जीव धोक्यात टाकून २४ तास अहोरात्र सेवा दिली. त्या सर्व कोविड योद्धांचे आमदार भाई जगताप यांनी कौतुक केले. तसेच निसर्ग चक्रीवादळाच्या दुसऱ्या दिवशी स्वतः डॉ. राऊत यांनी चक्रीवादळाचा फटका बसलेल्या ठिकाणी जाऊन प्रत्यक्ष पाहणी करून तातडीने वीज पुरवठा सुरळीत करण्यासाठी मार्गदर्शन केल्याबद्दल भाई जगताप यांनी डॉ. राऊत यांचे आभार मानले. महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक दिनेश वाघमारे, महावितरणचे संचालक (मानव संसाधन) तथा सेवानिवृत्त ब्रिगेडियर पवन कुमार गंजु व विविध संघटनेचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

# शिवसेवक समिती व्यापारी असोसिएशन अध्यक्षपदी बालाजी सूर्यवंशी यांची निवड

**औसा/प्रतिनिधी**



शिवसेवक समिती महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने औसा व्यापारी असोशिएनच्या अध्यक्षपदी बालाजी सुर्यवंशी यांची एकमुखाने निवड करण्यात आली. या निवडीबद्दल बालाजी सुर्यवंशी यांचे सर्व स्तरातून स्वागत करणयात येत आहे. शिवसेवक समितीचे संस्थापक आबासाहेब पाटील यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी-शेतमजूर, व्यापारी उद्योग, शिक्षण क्षेत्रासह विद्यार्थी व इतर घटकांच्या प्रश्नाची सोडवणूक करण्याचे कार्य चालू आहे. संघटनेच्या माध्यमातून समाजाचे सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक मागासलेपण दूर करून सर्वसामान्य घटकांना सुद्धा विकासाच्या प्रवाहात आणले जात आहे. संघटनेचे संस्थापक आबासाहेब पाटील यांच्या नेतृत्वाखाली ३ शिवसेवक समिती पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. यावेळी व्यापारी असोसिएशनच्या औसा तालुका अध्यक्षपदी बालाजी विष्णू सूर्यवंशी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मान्यवरांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करून भावी कार्यास शुभेच्छा दिल्या. त्यांच्या निवडीबद्दल संघटनेचे तालुका अध्यक्ष आकाश पाटील, संघटक ऋषिकेश मोरे, उप अध्यक्ष श्रीहरी उत्के, राहुल मोरे, हरिदास चव्हाण, विजयकुमार पवार यांच्यासह सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# पिक कर्जासंदर्भात चालणारी दलाली बंद करण्यासाठी बँक शाखा व्यवस्थापकला निवेदन

**देवणी/प्रतिनिधी**

देवणी येथील स्टेट बँक ऑफ इंडिया शाखेत पीककर्ज मिळवून देतो म्हणणाऱ्या दलालांची टोळी मोठ्या प्रमाणात सक्रिय झालेली आहे. दलालांनी शेतकऱ्यांकडून शाखा व्यवस्थापकाला पैसे द्यावे लागतात म्हणून २००० ते ५००० रुपयापर्यंतची रक्कम घेऊन तात्काळ कर्ज मिळवून देतो म्हणून शेतकऱ्याची आर्थिक लुबाडणूक होत आहे. एकीकडे पूर्ण देशभरात मार्च महिन्यापासून कोरोना महामारीचे संकट असताना काही शेतकऱ्यांनी आत्महत्या केली तर काही मजूर बेरोजगार झाले. केंद्र शासनाने शेतकऱ्यांसाठी व बेरोजगारांसाठी शासन स्तरावरून विविध योजना काढल्या. त्यातच शेतकऱ्यासाठी पीककर्ज योजना तर बेरोजगारांना व्यवसायाठी कर्ज योजना अशा विविध योजना काढल्या व संबंधित शाखा व्यवस्थपकाना सर्व शेतकऱ्यांना व बेरोजगारांना सहकार्य करण्याचे आदेश दिलेले असताना देवणी येथे मात्र या आदेशाला पूर्णपणे हरताळ फासून काही दलालामार्फत शाखा व्यवस्थपाकच्या नावाने शेतकऱ्याकडून पैसे काढून आर्थिक पिळवणून करत आहेत. याला त्वरित आळा घालून १५ दिवसात हे सर्व धंदे थांबवावे अन्यथा बँकेला टाळे घालण्याचा इशारा देण्याचे निवेदन शाखा व्यवस्थापक स्टेट बँक ऑफ इंडिया देवणी यांना देण्यात आले आहे. याची प्रत म्हणून मुख्यमंत्री कार्यालय, सहकार मंत्री कार्यालय, गृहमंत्री कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय लातूर, तहसील कार्यालय देवणी याना देण्यात आले आहे. या निवेदनावर काँग्रेस पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष मालबा घोणसे, नामदेव मुराळे व सचिन गवळी यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# उर्जा कार्यक्षमता हे एक ध्येय -खमितकर

**औसा/प्रतिनिधी**

औसा येथील हिंदुस्थान एज्युकेशन सोसायटी संचालित अज़ीम व्यावसायिक ज्युनिअर कॉलेज आणि पीसीआरए यांच्या संयुक्त विद्यमाने ऑनलाईन संस्थागत औद्योगिक प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ऊर्जा कार्यक्षमता हे एक ध्येय आहे असे मत पीसीआरए व्याख्याता केदार खमितकर (एनर्जी ऑडिटर) यांनी व्यक्त केले. यावेळी प्राचार्य निज़ामुद्दीन शेख, विभाग प्रमुख सैयद कादिर, संयोजक विठ्ठल पत्तेवार, खराडे सर, शेटे सर, नजीर सर, मोमीन सर व पीसीआरएच्या राज्य प्रादेशिक अधिकारी स्वाती कुमारी मॅडम आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. मुख्य मार्गदर्शक म्हणून पीसीआरए व्याख्याता केदार खमितकर(एनर्जी ऑडिटर) हे होते. या वेळी विद्युत, इलेक्ट्रॉनिक, यांत्रिकी, निर्माण, चिकित्सा प्रयोगशाला व्यावसायिक अभ्यासक्रमाचे विद्यार्थी सहभागी झाले. ऊर्जावान देशांशी स्पर्धा करण्यासाठी भारताने जीवाश्म इंधनाचा वापर कमी करण्याच्या दृष्टीने वाढीवर आणि उर्जेच्या कार्यकुशलतेवर कोणतीही तडजोड न करता कार्य करणे अत्यंत आवश्यक आहे. या प्रशिक्षणात ऊर्जा कार्यक्षमता ब्यूरो चे नॅशनल मिशन फॉर एनर्जी एफिशियन्सीच्या विकसित केलेल्या कार्यक्षमतेबद्दल चर्चा करण्यात आले ज्याची तयारी औद्योगिक क्षेत्रात काम करणारया विद्यार्थ्यांसाठी अतिशय उपयुक्त ठरणार आहे. पेट्रोलियम कॉन्झर्वेशन रिसर्च असोसिएशन (पीसीआरए) ही भारत सरकारच्या पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या संयुक्त विद्यमाने स्थापन केलेली सोसायटी आहे. 'ऊर्जेच्या क्षेत्रात आत्मनिर्भर भारत' अभियान अंतर्गत लोकजागृती करण्यात येत असल्याची माहिती केदार खमितकर यांनी या वेळी दिली.

# सुवर्ण शक्ती संघटनेतर्फे अमृता पांचाळचा सत्कार



**लातूर/प्रतिनिधी**

जिल्हा परिषद आयोजित१ ते १५ ऑगस्ट या कालावधीमध्ये राबवलेल्या गंदगी मुक्त मेरा भारत या अभियानाअंतर्गत जिल्हा स्तरीय निबंध स्पर्धा आयोजित केली होती . गंदगी मुक्त मेरा भारत या विषयावर घेतलेल्या निबंध स्पर्धेत हरंगुळ जिल्हा परिषद प्रशालेतील इ.१० विद्यार्थ्यांनी अमृता नंदकिशोरां पाचाळ हिने तालुक्यात व जिल्हास्तरीय निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावून दुहेरी यश संपादन केल्या बद्दल सुवर्ण शक्ती सोनार (पांचाळ) संघटनेच्याा वतीने जिल्हा परिषदेचे स्वि. सदस्य तथा शिक्षक संसदेनचे जिल्हाध्यक्ष मंगेश सुवर्णकार याच्या हस्ते मार्गदर्शक शिक्षक प्रकाश जाधव व अमृता यांचा सत्कार करून गौरव केला.यावेळी मंगेश सुवर्णकार यांनी जि.प. प्रशाला हरंगूळचे कौतुक करून शाळेच्या स्टाफकला शुभेच्छा दिल्या. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनीही प्रशालेच्या विविध उपक्रमाची माहिती घेतली आणि या यशाबद्दल अभिनंदन केले. त्याचबरोबर मागील दोन वर्षात प्रशालेने अनेक स्पर्धेत बक्षिसे मिळवली त्याचे कौतुक जि.प.अध्यक्ष व उपाध्यक्ष यांनी केल्याचे आवर्जून सांगितले. तसेच सर्व शिक्षकांचा गुणगौरव केला. प्रशालेस माननीय जि प अध्यक्ष व उपाध्यक्ष यांना घेऊन येऊ व प्रशालेच्या अडचणी सोडवू असे आश्वासन त्यांनी याप्रसंगी दिले. सुवर्ण शक्तीचे मराठवाडा संपर्क प्रमुख सुदर्शन बोराडे, विश्वकर्मा संघटनेचे जिल्हाध्यक्ष अनिल पांचाळ, आदर्श शिक्षिका सुरेखा चंदेले, ओबीसी पिछडा संघटनेचे उपाध्यक्ष नंदकिशोर पांचाळ, शिक्षक संसदेचे जिल्हा कार्याध्यक्ष धनराज नांगेवार आदी उपस्थित होते.


# वृक्षारोपण करून केला वाढदिवस साजरा



**देवणी/प्रतिनिधी**

देवणी तालुक्यातील जवळगा येथील बालाजी दत्तात्रय बिरादार यांनी आपला ५०वा वाढदिवस जवळगा येथील रामलिंग देवस्तनाच्या परिसरात व सटवाई देवीच्या परिसरात वृक्षारोपण करून वाढदिवस अनोख्या पद्धतीने साजरा केला. वाढदिवसानिमित्त पंचतारीक हॉटेल मध्यें किंवा इतर ठिकाणी पार्टी करून फटाक्यांची आतिषबाजी मोठे मोठे बॅनर लावून केलेली आपण बघत असतो. पैशाची उधळण करत असतात, पण यासर्व गोष्टीना फाटा देऊन जवळगा येथील वृक्षप्रेमी बालाजी बिरादार (मुख्याध्यापक सुशीलाबाई माध्यमिक विद्यालय, तपसे चिंचोली औसा यांनी आपला वाढदिवस शुक्रवार दिनांक २८ ऑगस्ट रोजी वृक्षारोपण करून साजरा केला. या वेळी आदर्श ग्राम समिती जवळगा यांच्या वतीने बालाजी बिरादार यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी जवळगा सज्जाचे तलाठी अतिष बनसोडे,सचिन गुणाले,दत्ता पुरी, किशोर बिरादार, हणमंत बिरादार, नितीन व्हराडे, संभाजी बोडके, नागेश बिरादार, धैर्यशील बिरादार, गोविंद पाटील, ह.भ.प.माधव पटवारी, किरण बिरादार ,संतोष पाटील उपस्थित होते यावेळी बालाजी बिरादार यांच्या वतीने आदर्श ग्राम समितीला वर्षारोपन करण्यासाठी ११०० रुपयांची मदत केली.


# बार्शी शहरात राहत्या घरी गळफास घेऊन डॉक्टरची आत्महत्या



**सोलापूर/प्रतिनिधी**

सोलापूर जिल्ह्यातील बार्शी शहरात एका डॉक्टराने स्वतःच्या राहत्या घरी बेडरूममध्ये पंख्यास दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. ही घटना बुधवारी रात्री बारा नंतरच्या सुमारास घडली आहे. डॉ पंकज ऊर्फ राहुल नानासाहेब आवारे (वय ३८) असे गळफास घेतलेल्या डॉक्टराचे नाव आहे. बार्शी येथील डॉ.पंकज नानासाहेब आवारे यांनी आपल्या स्वतःच्या बेडरूम मधील छतास असलेल्या पंख्यास दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. ही घटना बुधवारी रात्री बारा ते एक वाजण्याच्या सुमारास घडली असून याबाबत डॉक्टराचें मेव्हणे महारुद्र विष्णू जाधव (४२) यांनी बार्शी पोलीस ठाण्यात खबर दिली आहे. सकाळी सर्वजण उठल्यावर डॉ.अजून इतका वेळ होऊन देखील का उठले नाहीत आणि दार ही उघडले नाही. त्यामुळे दरवाजा तोडून पाहताच त्यांनी गळफास घेतल्याचे दिसून आले. त्यांनी आजपर्यत येथील खाजगी दवाखान्यात वैद्यकीय सेवा केली आहे. बार्शी तालुक्यातील काही प्राथमिक आरोग्य केंद्रात सेवा देत असताना त्यांची बारामती येथील प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण सुरू होते. त्यांच्या पश्चात पत्नी, आई, वडील, दोन मुले असा परिवार आहे. आत्महत्येचे नेमके कारण काय असावे याबद्दल पोलिसांनी शोध घेत आहेत. बार्शी शहर पोलीस ठाणे येथे ५३ /२०२० सीआरपीसी १७४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आली आहे. त्या दृष्टीने तपास सुरू असल्याचे सांगितले. पुढील तपास बार्शी पोलीस ठाण्याचे पोलीस हेड कॉन्स्टेबल अरुण माळी करीत आहेत.

# सेवानिवृत्त तहसिलदार डी.ए. चौंधरी यांचे निधन



**वाडा/प्रतिनिधी**

वाडा तालुक्यातील मौजे कुडूस येथील रहिवासी व सेवानिवृत्त तहसिलदार दिनेश आबा चौधरी उर्फ डी.ए.चौधरी यांचे आज सकाळी बुधवार दि.२६ ऑगस्ट रोजी दिर्घ आजाराने दु:खद निधन झाले. ते ७९ वर्षाचे होते. डी.ए.चौधरी हे शासकीय सेवेत असतानाही त्यांचे सामाजिक कार्यात फार मोठे योगदान होते. वाडा, विक्रमगड तालुक्यातील कुणबी युवक मंडळाची स्थापना त्यांनी केली. ते अनेक वर्षे वाडा तालुका सुर्यवंशी कुणबी समाज मंडळाचे अध्यक्ष होते. त्यांच्या प्रयत्नाने कुडूस येथे पाटबंधारे विभागाचा मोठा बंधारा तसेच हनुमान मंदिर संस्था सुरु करण्यात आली. त्यांनी तहसीलदार म्हणून पालघर, मुरबाड, वाडा तालुक्यात उत्कृष्ट काम केले होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी व नातवंडे असा परिवार आहे.

# थोडक्यात वृत्तांत

## सोयाबीन पिकावर फवारणी करण्याचे आवाहन

लातूर : पोळयानंतर आलेल्या सततच्या पावसामुळे सोयाबीन पिकात काही ठिकाणी अतिरीक्त वाढ झाल्याचे आढळून येत आहे.मागील १० दिवसात झालेल्या संततधार पावसामूळे शेतात वापसा नसल्यामुळे सोयाबीनच्या खालच्या भागात आदृता वाढवून काही बूरशीजन्य रोग जसे शेंगावरील करपा, पानावरील बुरशीजन्य रोगाच्या प्रार्दूभावाबरोबर खोड माशी, स्पोडोप्टेरा आणि शेंगा पोखरणाऱ्या आळीचा प्रार्दूभाव वाढत आहे. सध्या सोयाबीन पिके ५५-६० दिवसाचे असून शेंगामध्ये दाणे भरण्याच्या अवस्थेत आहे.अशा परिस्थितीमध्ये पूढील दिलेल्या किटकनाशकआणि बूरशीनाशकापैकी एका बूरशीनाशकाची निवड करुन तात्काळ फवारणी घेतली असता किडीचे आणि बूरशीजन्य शेंगाचे नियंत्रण होऊन चांगल्या प्रकारे शेंगाना दाणा भरण्यास मदत होईल. फवारणी करत असताना पायात गमचे शूज वापरावेत त्याच बरोबर नाक व तोंड स्वच्छ कापडानेच झाकण्याबरोबरच संरक्षणात्मक किटचा वापर करावा असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी लातूर व विस्तार कृषी अधिकारी लातूर यांनी केले आहे. किटकनाशके : क्लोरॅनट्रिनीलीप्रोल (कोराजन) १८.५ टक्के, ०३ मिली. पल्यूबेंडमाईड (फेम) ३९.३५ टक्के, २.५ मिली प्रति १० लि पाणी. बुरशीनाशेके- टेब्यूकोनॅझोल+ सल्फर (स्वाधीन)-२० ग्रॅम, मॅनकोझेब+ कार्बेन्डॅझीम (साफ) -२० ग्रॅम, पायरोक्लोस्ट्रॉबीन २० टक्के (हेडलाईन)-२० ग्रॅम, टेब्यूकोनॅझोल २५.९ टक्के फॉलीक्यूअर -१५ ग्रॅम प्रति १० लि पाणी.वरील किटकनाशके व बूरशीनाशकाचे प्रमाण चार्जीगच्या पंपासाठी दुप्पट तर पेट्रोलपंपासाठी तिप्पट करावे.असे ही प्रसिध्दी पत्रकात नमूद केले आहे.

## रघुनाथ सूर्यवंशी यांचे निधन



देवणी : येथील सेवानिवृत्त शिक्षक रघुनाथ झेटींगराव सूर्यवंशी वय वर्ष ८३ यांचे अल्पशा आजाराने गुरुवार दि. २७ ऑगस्ट रोजी रात्री निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर शुक्रवारी दुपारी सार्वजनिक स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

## सुमेध कांबळे यांना पीएच.डी प्रदान

लातूर : लातूर येथील सुमेध भरतराव कांबळे यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडने व्यवस्थान शास्त्रविषयात पी.एचडी पदवी बहाल केली आहे. सुमेध कांबळे यांनी लातूरच्या दयानंद महाविद्यालयातील प्रा.डॉ.ब्रिजमोहन दायमा यांच्या मार्गदर्शनाखाली मराठवाड्यातील अनुसूचीत जातीतील उद्योजकांचा शासकीय योजनेमार्फत झालेला विकासः एक अभ्यास (ए स्टडी ऑफ शेड्युल्ड कास्ट इंटरप्रिनर्स डेव्हलपमेंट थ्रु गव्हर्नमेंट्स स्कीम इन मराठवाडा रिजन) या शिर्षकाखाली स्वारातीम विद्यापीठाकडे शोध प्रबंध सादर केला होता.तो स्वीकृत करुन विद्यापीठाने सुमेध भरतराव कांबळे यांस व्यवस्थापन शास्त्र या विषयात,दि.३१ जुलै २०२० रोजी पीएच.डी.बहाल केली आहे. सुमेश कांबळे यांनी मिळविलेल्या यशाबद्दल प्रा.देवेंद्रनाथ मिश्रा, डॉ.राजेश शिंदे, डॉ.ज्योती शेट्टी, डॉ.भोसले, डॉ.ब्रिजमोहन दायमा, डॉ.सचिन प्रयाग, बसवराज गिलचे,शरद सुरवसे,प्रा.प्रवीण सोनवळकर, राजकुमार मस्के,यशपाल कांबळे, अमोल कारंजे आदिंनी अभिनंदन केले आहे.

## जेईई, निट परीक्षा रद्द करण्याची मागणी

लातूर : जेईई, निट परीक्षा घेण्याचा केंद्र सरकारने घेतलेल्या निर्णया विरोधात लातूर जिल्हा काँग्रेस व लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटी च्या वतीने निदर्शने करीत या परीक्षा रद्द करण्यात याव्यात अशी मागणी करण्यात आली असून या मागणी संदर्भात जिल्हाधिकारी लातूर यांना लातूर जिल्हा काँग्रेस कमिटी व लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटी कडून निवेदन सादर करण्यात आले. कोवीड -१९ साथ रोगामुळे निर्माण झालेली सध्याची परिस्थिती लक्षात घेता JEE/NEET या परीक्षा घेणे योग्य ठरत नाही या परीक्षांना उपस्थित राहण्यासाठी विद्यार्थ्यांसमोर असंख्य अडचणी आहेत, विधार्थांच्या आरोग्याचा प्रश्न्न निर्माण होणार आहे मात्र तरीही अशा गंभीर परिस्थितीत केंद्रातील मोदी सरकार या परीक्षा घेण्यावर ठाम आहे. यामुळे शुक्रवार दिनांक २८ ऑगस्ट २०२० रोजी केंद्र शासनाच्या या निर्णयाच्या विरोधात लातूर येथे लातूर जिल्हा काँग्रेस कमिटी आणि लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटी यांच्या वतीने निदर्शने करण्यात आली, तसेच या परीक्षा रद्द करण्यात याव्यात अशी मागणी करीत मागणीचे निवेदन मा. जिल्हाधिकारी लातूर यांना देण्यात आले.याप्रसंगी लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्रीशेल उटगे लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष ॲड.किरण जाधव, लातूर महानगरपालिकेचे महापौर विक्रांत गोजमगुंडे, लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे व्हाईस चेअरमन पृथ्वीराज शिरसाठ, अभय साळूंके, लातूर जिल्हा महिला काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षा सुनितातार्इ आरळीकर, अल्पसंख्यांक लातूर शहर जिल्हाध्यक्ष फारूक शेख, लातूर जिल्हा काँग्रेस सेवादल अध्यक्ष बिरबल देवकते, जिल्हा काँग्रेस सेवादल अध्यक्ष सुपर्ण जगताप, लातूर शहर युवक काँग्रेस अध्यक्ष मोहन सुरवसे, संभाजी सूळ, प्रभाकर बंडगर, रेणापूर बाजार समिती चे सभापती रमेश सूर्यवंशी, प्रवीण पाटील, सिकंदर पटेल, छडणख चे शरद देशमुख , सोशल मीडिया अध्यक्ष प्रवीण सूर्यवंशी, मीनाक्षी शेटे, रघुनाथ शिंदे, अनुसूचित जाती सेल प्रमुख सचिन गंगावणे, ज्ञानेश्वर सागावे, ॲड.प्रदीपसिंह गंगणे, तबरेज तांबोळी, अभिषेक पतंगे, प्रवीण कांबळे, ॲड. देविदास बोरुळे पाटील , ॲड. दीपक बोरगावकर आदी उपस्थित होते.

C M Y K

# बोगस मीडिया ट्रायल!

प्रसार माध्यमांना लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणतात. पण आज काल या क्षेत्रात काही बोगस आणि काही अर्ध्या हळकुंडाने पिवळ्या होणाऱ्या लोकांनी प्रवेश केल्यामुळे या क्षेत्राची अक्षरशः वाट लागलीय. खास करून इलेक्ट्रॉनिक मीडियामुळे तर प्रसारमाध्यमांची विश्वासार्हताच धुळीला मिळाली आहे. जो खरा पत्रकार असतो, त्याला कोणत्या गोष्टीला किती महत्त्व द्यायचे याची अक्कल असावी लागते. पण आज इलेक्ट्रॉनिक मीडिया व्यापाऱ्यांच्या हातात गेलेला असल्याने ते आपल्या चॅनलचा धंद्याच्या हिशोबाने वापर करीत आहेत. त्यामुळे अशा चॅनलसाठी बुद्धीजीवींची आवश्यकता नसते, तर मालकाची मर्जी राखून काम करणारा कुणीही घरगडी तिथे संपादक म्हणून काम करू शकतो. अशा लोकांची योग्यता काय आहे ते सर्वांना ठावूक आहे. त्यामुळे त्यांच्याकडून चांगले व जनतेच्या दैनंदिनी जीवनाशी संबंधित असलेल्या विषयावरील बातम्या किंवा डिबेट (चर्चासत्र)ची अपेक्षा नाही. मुळात राजकारण, समाजकारण, भाषा, अर्थकारण याविषयी अर्धवट माहिती असलेल्या लोकांचा न्यूज चॅनलमध्ये भरणा असल्याने चांगले विषय आणि लोकांच्या ज्वलंत समस्या त्यांना त्यांच्या न्यूज चॅनलच्या माध्यमातून मांडताच येत नाहीत. वास्तविक आज कोरोनाच्या जीवघेण्या संकटात कोरोनाशी संबंधित असलेले अनेक विषय, अनेक समस्या लोकांच्या समोर आहेत. पण त्या त्यांना महत्व देण्याऐवजी कोण कुठला सुशांतसिंग राजपूत जो बायकांवर पैसे उडवून कंगाल झाला आणि त्यातून त्याला नैराश्य आल्याने त्याने आत्महत्या केली. त्या प्रकरणाला या मूर्ख चॅनलवाल्यांनी राष्ट्रीय मुद्दा बनवलाय आणि सतत तेच दाखवत आहेत. सुशांतचा बाप कोण होता? रीयाची आई कोण होती? सुशांतचे किती जर्णीसोबत संबंध होते? रीयाचे कोण कोण यार होते? अरे लोकांना यांच्याशी काय घेणं देणं आहे. बॉलिवूडमध्ये अभिनेते, अभिनेत्री, दिग्दर्शक, निर्माते, फायनांसर यांची अय्याशी सर्वश्रुत आहे. एखाद्या सुंदर आणि टंच पोरीवर पैसे उडवणे आणि तिला काही दिवस रखेल म्हणून वापरणे या गोष्टी तिथे नव्या नाहीत किंवा चित्रपटात काम देण्याचे आमिष दाखवून त्यांचे लैंगिक शोषण करणे हा बॉलिवूडच्या दैनंदिनी कामकाजाचाच एक भाग आहे. त्यामुळे अशा व्याभिचारी लोकांच्या मागे धावणे आणि दिवसभर त्यांनीच लफडी दाखवणे ही लोकांची फसवणूक नाही का? मग लोकांची अशी फसवणूक करणाऱ्या या न्यूज चॅनलवाल्यांना लोकांनी का महत्व द्यावे? आणि यात सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे एखाद्या गंभीर प्रकरणाचा सीबीआयसारखी मोठी यंत्रणा तपास करीत असताना आरोपींना चौकशी नंतर बाहेर आल्यावर घेरणे, त्यांच्यावर जबरदस्तीने प्रश्नांचा भडीमार करणे, हे कितपत योग्य आहे. कारण तपास सुरू असताना आरोपी किंवा तपास यंत्रणांमध्ये काम करणारे अधिकारी यांनी जर त्यांच्याकडील काही गुप्त माहिती प्रसारमाध्यमांना शेअर केली तर त्याचा तपासावर मोठा परिणाम होऊ शकतो. रिया आणि तिच्या कुटुंबीयांची जेंव्हा ईडी आणि सीबीआयकडून चौकशी केली जात होती, तेंव्हा या इलेक्ट्रॉनिक मिडियावाल्यांनी रिया आणि तिच्या कुटुंबीयांना हैराण करून सोडले. त्यांच्यावर प्रश्नांची सरबती केली. त्यामुळे चौकशीला सामोरे जाताना आणि चौकशी आटोपल्यावर बाहेर पडताना बाहेर इलेक्ट्रिक मीडियावाल्यांनी जो तमाशा केला तो संतापजनक होता. कोणत्याही प्रकरणातील आरोपीला जबरदस्तीने प्रश्न विचारण्याचा किंवा कोणताही पुरावा नसताना त्या आरोपीच्या विरूद्ध मीडिया ट्रायल चालवण्याचा यांना कोणी अधिकार दिला. एखाद्या आरोपीला अशा प्रकारे त्रास देऊन त्याचे मानसिक संतुलन बिघडवणे हा सुद्धा एक गंभीर गुन्हाच आहे. आणि असा गुन्हा करणाऱ्या इलेक्ट्रॉनिक मिडीयाला सुद्धा न्यायालयात खेचायला हवे. टीआरपीसाठी त्यांची जी घाणेरडी आणि जीवघेणी रस्सीखेच सुरू आहे ती चीड आणणारी आहे. नाही तर सरळ असे करा सुशांत सिंह राजपूत आत्महत्या प्रकरणाचा तपास सरळ इलेक्ट्रिकल मीडियाकडेच द्यावा, त्यांनीच तपास अधिकारी बनावे, त्यांच्या रिपोर्टने वकील बनावे, अँकरने न्यायाधीश बनावे आणि त्यांनीच खटला चालवावा. या देशात सध्या चाललंय काय? इलेक्ट्रॉनिक मीडियावाले का सरकारच्या डोक्यावर बसलेत आणि सरकार त्यांना गुन्ह्याच्या तपासात नाक खुपसण्याचा का परवाना देतेय. सगळ्यात भयंकर म्हणजे आज काल न्यूज चॅनलवाले भारत-पाक, भारत-चीन सीमेवर सुद्धा पोहचले आणि तिथे भारताच्या बाजूने काय सुरक्षेची व्यवस्था आहे, किती तयारी झालीय, एअर बेसवर किती आणि कोणकोणत्या जातीची लढाऊ विमाने तैनात आहेत. या सगळ्या गोष्टी न्यूज चॅनलवाले दाखवत आहेत. त्यामुळे शत्रू राष्ट्राला बसल्या जागी सगळी माहिती मिळतेय. परिणामी देशाची सुरक्षा धोक्यात आलीय. अशा प्रकारे इलेक्ट्रॉनिक मीडियावाले जर देशाच्या अंतर्गत आणि बाह्य सुरक्षा व्यवस्थेची माहिती लोकांसमोर आणि लागले तर हा प्रकार किती गंभीर आहे याची सरकारला कल्पना असायला हवी होती मग सरकार गप्प का? इलेक्ट्रॉनिक मीडियाला जर राष्ट्रपती, पंतप्रधान आणि सर्वोच्च न्यायालया इतके महत्त्व दिले जात असेल तर भविष्यात आणखी गंभीर परिस्थिती निर्माण होऊ शकते. म्हणूनच आता इलेक्ट्रॉनिक मीडियावर मर्यादा घालणे गरजेचे आहे. सरकारने याचा आता तरी गांभीर्याने विचार करावा.

# आता बॉलिवूड मधल्या गर्दुल्यांचे काय करणार?



बॉलिवूडची श्रीमंती आणि झगमगाट जितका माणसाचे डोळे दिपवणारी आहे, तितकीच तिथली क्रृष्क्रृत्य सुद्धा अंगावर शहारे आणणारी आहेत. सुशांत सिंग राजपूतच्या प्रकरणात ड्रग्जचा अँगल तपास यंत्रणांच्या समोर आल्यानंतर यात नारकोटिक्स ब्यूरोची सुद्धा एन्ट्री झाली आहे आणि नर्कोटीक्स ब्युरोने केलेल्या प्राथमिक तपासात काही ड्रग्ज सप्लायर सुद्धा तपास यंत्रणांच्या रडारवर आलेत. पण बॉलिवूड आणि ड्रग्ज यांचे नाते काही नवीन नाही.

बॉलिवूड मधील अनेक अभिनेते गर्दुल्ले आहेत, तर काही अभिनेत्रीही सेक्स पॉवर वाढवण्यासाठी गर्द घेतात असे बोलले जाते आणि यापूर्वी काही लोकांना ड्रग्जसह पकडलेही आहे. मग त्यावेळी ड्रग्ज प्रकरणात बॉलिवूड आणि ड्रग्ज माफियांच्या कनेक्शनची चौकशी का झाली नाही. जगात अमली पदार्थांचा व्यापार कोट्यवधी डॉलर्सचा आहे आणि त्याचे जाळे जगभर पसरले आहे. ड्रग्ज माफिया लोकांचे पॉलिटिकल कनेक्शन मजबूत असल्यामुळे त्यांच्यावर कारवाई होत नाही. आता सुद्धा सुशांतच्या आत्महत्या प्रकरणात नर्कोटिक्स ब्युरोने किती जरी कसून तपास केला तरी सुशांत किंवा रिया हिला ड्रग्ज पुरवणाऱ्या ड्रग्ज माफियांचा बाल सुद्धा बाका होणार नाही. तपासा दरम्यान ड्रग्जचा हा अँगल कुठल्या कुठे लुप्त होईल आणि ड्रग्ज सप्लायर लोकांना क्लिनचीट मिळेल. कारण तसे केले नाही तर बॉलिवूड मधील अनेक बड्या धेंडांचे मुखवटे गळून पडतील आणि त्यांचा खरा गर्दुल्ला चेहरा त्यांच्या चाहात्यांसमोर उघडा पडेल आणि बॉलिवूड मधील बड्या हस्ती तसेच ड्रग्ज माफिया तसे होऊ देणार नाहीत. कारण या रॅकेटची पाळेमुळे राजकीय वर्तुळापर्यंत घट्ट रुजली आहेत, ती मुळासकट उखडून काढणे वाटते तितके सोपे नाही. अमली पदार्थांच्या सप्लायाची चेन खूप मोठी आहे. त्यामुळे ती कुणीही तोडू शकत नाही. पण त्याच बरोबर ही चेन तोडली नाही, तर या देशातली तरुण पिढी कायमची उध्वस्त होवू शकते. कारण आजकाल ड्रग्जची सप्लाय थेट शाळा, कॉलेजपर्यंत पोहचली आहे. नववी, दहावीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना सुद्धा गर्दचे व्यसन लागलेय. गर्दने भारतातील तरुण पिढीचे काय हाल करून ठेवले हे 'उडता पंजाब' या चित्रपटात दाखवले आहे. त्यामुळे अमली पदार्थांच्या तस्करांच्या विरोधात आता निर्णायक भूमिका घेण्याची पाळी आली आहे आणि त्याची सुरुवात बॉलिवूड पासून करायला हवी. कारण बॉलिवूडमध्येच ड्रग्जमाफियांचे सर्वाधिक ग्राहक आहेत आणि हे ग्राहक कोण आहेत याचा तपशील नर्कोटिक्स ब्युरोकडे नाही असे होऊच शकत नाही. पण एनसीबी अर्थात नारकोटिक्स ब्युरोकडून कारवाई होणार नाही.

कारण अबकारी विभागातील अधिकाऱ्यांच्या प्रमाणे दारू माफियांचे हप्ते बांधलेले असतात तसेच नार्कोटिक्स विभागातील अधिकारी आणि ड्रग्ज माफियांच्या आर्थिक सतेलोटे आहेत. त्यामुळेच अमली पदार्थांचा व्यापार भारतात राजरोसपणे सुरू आहे. नार्कोटीक्स विभाग मात्र दोन चार नायजेरियन निग्रोंना पकडून ड्रग्ज माफियांवर मोठी कारवाई केल्याचे चित्र देशासमोर उभे करीत असतो. पोलिस किंवा नार्कोटिक्स विभागाचे लोक पुलाखाली बसून गर्द पिणाऱ्या घाणेरड्या गर्दुल्ल्यांना ज्या तत्परतेने पकडतात तीच तत्परता त्यांनी बॉलिवूडच्या गर्दुल्ल्यांन बाबत दाखवली तर निश्चितपणे अमली पदार्थांचे खरे सप्लायर आणि बॉलिवूड मधले त्यांचे ग्राहक यांच्या पर्दाफाश होईल आणि तो व्हायलाच पाहिजे. जर बॉलिवूड मधल्या गर्दुल्यांवर कारवाई झाली, तर ड्रग्ज माफियांना दणका बसेल आणि त्यांची भारतातील सप्लाय थांबेल.

**संध्या स्ट्रोक**
**सोनू जाधव**


कारण बॉलिवूड हे त्यांचे मोठे ग्राहक आहे. त्यामुळे बॉलीवुड मधल्या गर्दुल्यांना ड्रग्ज सप्लाय करणारे जर तपास यंत्रणांच्या जाळ्यात सापडले, तर परदेशातील मुख्य सप्लायर सापडू शकतील आणि त्यांच्यापर्यंत जर तपास यंत्रणा पोहचली तर काही प्रमाणात का होईना ड्रग्ज सप्लायरच्या चेनला कुठे तरी कात्री लागू शकेल आणि त्यासाठी अर्थातच सरकारच्या सकारात्मक भूमिकेची आवश्यकता आहे. तरच परदेशातून भारतात येणारे आणि तरुण पिढीला बरबाद करणारे हे रॅकेट उध्वस्त होऊ शकेल.

त्यामुळे सुशांत प्रकरणातून एक छोटीशी जी लिंक मिळाली आहे त्यातून बॉलिवूडला ड्रग्ज सप्लाय करणारे कोण आणि बॉलिवूड मधले पांढरपेशे गर्दुल्ले कोण हे लोकांना कळेल. अमली पदार्थांची नशा हि इतर सर्व व्यास्नापेक्षा भयंकर असते. ती माणसाचे केवळ शरीरच नव्हे तर मन आणि आत्माही पोखरून टाकते. त्यामुळे हे विष भारतात येत नये अशी भूमिका अगदी सुरवातीपासूनच केंद्र सरकारने घेतली होती आणि त्यासाठीच नार्कोटिक्स विभागाची स्थापना करण्यात आली होती. पण अजून पर्यत तरी भारतातून हे विष कायमचे नष्ट करण्यात आणि ड्रग्ज माफियांचे नेटवर्क उध्वस्त करण्यात नार्कोटिक्स विभागाला यश आलेले नाही. कारण याची पाळेमुळे उच्च वर्गीय समाजात घट्ट रुजलेली आहेत. बॉलीवूड, उद्योगजगत, राजकीय मंडळी अशा लोकांमध्ये अमली पदार्थांचे ग्राहक असल्याने या देशातून अमली पदार्थांचे जाले नष्ट होऊ शकत नाही. मात्र तरुण पिढी बरबाद होत आहे आणि तिला वाचवण्याची आवश्यकता सध्या तरी कुणालाही वाटत नाही असेच दिसतेय.

**(मोबाईल नंबर : ७०२१४७६१५३)**

# डीएनए पासून आता कृत्रिम मनुष्यनिर्मिती

**दिशायन**



करोना विषाणूने जगभरात थैमान घातले आहे. हा विषाणू नेमका कुठून आला याबाबत अनेक तज्ज्ञांनी उहापोह केला आहे. हा विषाणू नैसर्गिकरीत्या उत्पन्न झाला नसून, चीनचमधील वुहान शहरातल्या प्रयोगशाळेत हा विषाणू तयार केल्याचे आरोप अनेकांनी केले, याबाबत तार्किक पुरावेही देण्यात आले. मात्र यावर अजूनही संशोधन सुरू आहे. हे सर्व प्रकरण ताजे असतानाच नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या संशोधननानुसार समोर आले आहे की प्रयोग शाळेत बनवलेल्या संसर्गजन्य विषाणू मानवी शरीरात गेल्यावर त्या व्यक्तीचा अनुवंशिक कोड अर्थात डीएनए कोड चोरी करतात. या कोडचा वापर करून हायब्रिड किंवा कृत्रिम मानव बनविण्याच्या शास्त्र प्राथमिक स्तरावर यशस्वी झाले आहे.

**डीएनए म्हणजे काय?**

डीएनए म्हणजेच "डीओक्सिरिबो न्यूक्लिक ॲसिड" होय. हे प्रत्येक सजीवाच्या शरीराच्या पेशीत असलेले आम्ल आहे. याला शरीरातील मूलभूत अनुवांशिक सामग्री असेही म्हणतात. हा डीएनए आपल्या गुणदोषांसहीत एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे अनुवंशिकतेने जात असतो. आपण डीएनएचा वापर पुराव्याच्या रुपात पोलीस, न्यायालय मोठ्या प्रमाणात करताना पाहिले आहे.

डीएनए एखाद्या विशिष्ट शरीराशी समान किंवा मेळ साधणारा असतो. तसेच व्यक्तीचा डीएनए संपूर्ण शरीरात सारखाच असतो. म्हणूनच पोलिसांना पुरावे शोधण्यासाठी मदत मिळते. डीएनए रक्त, त्वचा, हाडे, केसांची मुळे, वीर्य, योनी किंवा गुदाशय इत्यादींच्या पेशींमध्ये असते. मात्र शरीरात डीएनएचे कोडींग आणि नॉन कोडींग असे दोन प्रकारचे क्रम असतात. त्यापैकी नॉन कोडींगचा क्रम प्रत्येकाचा वेगळा असतो. त्यावरुनच व्यक्तीचे वेगळेपण दिसून येते.

स्त्री आणि पुरुषाच्या संयोगातून मूल जन्माला येते. त्या बाळाला त्याच्या माता-पित्याकडून २३ गुणसूत्रे अर्थात जनुके (जीन्स) मिळतात. यात बुद्धिमत्ता, त्वचा, डोळे, रुप, बांधा, शरीराचा रंग इत्यादी गुण असतात. म्हणजेच बाळाची सर्व वैशिष्ट्य माता-पित्याच्या जनुकांवर अवलंबून असतात. मात्र तरी बाळात अनेक वेगळे गुण असतात, त्याचे स्वत:चेही अनेक वेगळे वैशिष्ट्य असतात. हे वैशिष्ट्य त्याच्यात त्याच्या शरीरात असलेल्या पेशींमधील डीएनएच्या नॉन कोडींग क्रमामुळे येतात. हेच कोडींग कृत्रिम विषाणूमार्फत मानवी शरीरातून चोरले जातात. याच्याच आधाराने हायब्रिड किंवा कृत्रिम मानव बनवण्याचे शास्त्र विकसित होत आहे, हे संशोधन पत्र सेल रिसर्च' या विज्ञानविषयक मासिकात नुकतेच छापून आले आहे. हे संशोधन न्यूयॉर्कमधील इकाह्न स्कूल ऑफ मेडिसिन, ग्लोबल हेल्थ अँड पॅथोजेन इस्टीट्यूट आणि इंग्लंडमधील एमआरसी युनिव्हर्सिटी ऑफ ग्लास्गोव सेंटर फॉर व्हायरस रिसर्च या संस्था करत आहेत.

डीएनएमधले कोडींग आणि नॉन कोडींग क्रम म्हणजे एकप्रकारची शिडीच असते. मात्र ही शिडी साधी-सरळ नसून खूपच गुंतागुंतीची असते. यातील मूलभूत घटक हे साखर, फॉस्फेट आणि नायट्रोजन असतात. ॲडेनिन, थामाइन, ग्वानिन आणि सायटोसिन इत्यादी मिळूनच डीएनए बनते. या घटकांच्या जोड्यांनी शिडी बनते. शिडीची प्रत्येक पायरी म्हणजे क्रम होय. या जोड्यांच्या अनुक्रमावरुनच संबंधित व्यक्ती किंवा व्यक्ती व्यक्तींशी असलेले संबंध शास्त्रीयदृष्ट्या सिद्ध केले जातात. यामुळे जगभरातील अनेक कौटुंबिक, वाशिंक आणि गुन्ह्यांची कायदेशीर प्रकरणे सोडविण्यात मदत झाली आहे.

अलिकडच्या वर्षामध्ये डीएनए एक शक्तिशाली शोध साधन किंवा पोलीस आणि न्यायालयासाठी शास्त्रीय पुरावे गोळा करण्याचे साध म्हणून उदयास आले आहे. पितृत्व - मातृत्व विवाद, बदललेल्या बाळांची प्रकरणे, वंश किंवा घराणेवाद, अवैध लैंगिक संबंधाविषयीची प्रकरणे, प्रॉपर्टीमधील वारसा हक्क इत्यादी प्रकरणांचा छडा लावण्यासाठी डीएनएच्या पुराव्यांची मदत मिळते. तसेच बलात्कार आणि खून या प्रकरणांमध्ये जीवशास्त्रीय गोष्टी गुंतलेल्या असतात. असे पुरावे गुन्ह्याच्या ठिकाणी सापडतात, ते पीडित किंवा गुन्हेगाराचे असतात. हे डीएनएशी निगडीत पुरावे गुन्हेगाराची ओळख पटवण्यास मदत करतात. हे डीएनएचे पुरावे प्रामुख्याने रक्त, वीर्य, केस, लाळ, मूत्र, अश्रू, घाम इत्यादींद्वारे घेतले जातात. गरज भासल्यास शरीराच्या इतर भागातील पेशींमधले डीएनएचे नमुनेही घेतले जातात. डीएनए हा एक महत्त्वाचा पुरावा आहे, परंतु डीएनए पुरावे संवेदनशील असल्याने तपास अधिकारी किंवा घटनास्थळी उपस्थित असललेल्या पहिल्या अधिकाऱ्याने ते व्यवस्थित हाताळणे गरजेचे असते. अन्यथा पुरावे तात्काळ नष्ट होतात किंवा दुषित होतात.

**असा लागला डिएनएचा शोध**

जगात पहिल्यांदा युरोपीयन संघराज्यात डीएनएच्या पुराव्यामुळे १९८६ मध्ये दोन बलात्काराची प्रकरणे सोडविण्यात आली. डॉ. जेफ्री यांनी याबाबत तपास केला होता. डिएनएचा शोध १८६९ मध्ये स्वीडिश फिजिशिअन आणि रसायन शास्त्रज्ञ फ्रायड्रिच माईस्चर यांनी लावला. रुग्णावर उपचार करताना सर्जिकल बँडेजमधील पू आणि रक्त यामध्ये त्यांना एक सूक्ष्म पदार्थ दिसला. तो पदार्थ पेशीच्या न्युक्लिअसमधून वेगळा केला. त्याचे अस्तित्त्व न्यूक्लिअसमध्ये होते म्हणून त्याला 'न्युक्लेईन' असे नाव दिले गेले. हेच न्यूक्लेइन आज जगभरात डीएनए म्हणून ओळखले जाते.

पुरावे शोधण्याच्या पलिकडे अनुवंशिक रोग, विकार, विकृती यांची माहिती नवजात बालकाच्या जन्माआधी समजण्यास डीएनए चाचणीटी मदत होते. त्यामुळे डॉक्टरांना यावर वेळीच योग्य उपचार करता येतात. डीएनए चाचणीचा वापर करून बी-बियाणांची, पीकांच्या वाढीची माहिती घेता येते. त्यामुळे शेती उत्पादकांना मदत मिळते. तसेच विक्रीसाठी ठेवले मांस, मशरूमसारखे पदार्थ यांचा दर्जा तपासता येतो. डीएनए चाचणीवरून स्थलांतरित प्राण्याचे वा वनस्पतीचे मूळ स्थान ओळखता येते. हे सर्व आज आपल्याला शोधता येते याचे श्रेय, अमेरिक आण्विक जीवशास्त्रज्ञ आणि अनुवशशास्त्रज्ञ जेम्स वॉटसन यांना जाते. त्यांनी १९५३ मध्ये 'डबल हेलिक्स' ही डीएनएची रचना शोधली. या संशोधनावरुन आज आपण डीएनएद्वारे इतक्या गोष्टी समजू शकतो. या शोधासाठी १९६२ चे नोबेल पारितोषिकदेखील मिळाले. म्हणूनच त्यांना डीएनएचे पितामह म्हटले जाते.

**कृत्रिम मानव बनविण्याच्या दिशेने...**

आज डीएनएचा वापर आणखी कशा-कशासाठी करता येईल यावर शोध सुरू आहे. त्यापैकीच एक म्हणजे हायब्रिड किंवा कृत्रिम मानवाची निर्मिती करणे. हे बनवण्याची प्रेरणा शास्त्रज्ञांना महामानव किंवा एलियन्सकडून मिळाली. जगभरात अनेक आश्चर्यकारक प्रत्यक्ष पुरावे आहेत. ज्यावरुन असे काही अंशी सिद्ध होते की परग्रहावरील व्यक्ती म्हणजे महामानव किंवा एलियन्स पृथ्वीवर आले होते. त्यांनी येथील काही महान व्यक्तींना ज्ञान दिले, इथे काही गोष्टी बनविल्या. मात्र आज ते मानवाच्या संपर्कात आहेत का? गेल्या दोन दशकांमध्ये काही घडामोडींवरुन एलियन्स आपल्या आयुष्यात ढवळाढवळ करत असल्याचे दिसले.

१९७७ मध्ये अमेरिकेत ओहिओ स्टेट विद्यापीठात आलेला 'वाव' संदेश किंवा लहरी या परग्रहावरुन आल्या होत्या. असे गेल्या काही वर्षामधील संशोधक सांगतात. यावरुन या शोधकार्याला मोठी चालना मिळाली. अमेरिकेतील एका व्यक्तीचा गूढरीत्या मृत्यू होतो. त्या एका व्यक्तीच्या घरात एका लहान देशाकडे जेवढी शस्त्रास्त्रे असतात, तेवढी शस्त्रास्त्रे सापडतात. त्या व्यक्तीचे फिंगरप्रिंटस नष्ट झालेले असतात. खरेतर मृत माणसाचे फिंगरप्रिंट सर्वात शेवटी नष्ट होतात. त्यांची मैत्रिण सांगते की तो एक हायब्रिड अर्थात कृत्रिम मानव होता.

अमेरीकेतील अनेक डॉक्टर असा दावा करतात की त्यांचे एलियन्सद्वारे अपहरण करण्यात आले. अपहरण झालेल्या व्यक्तींमध्ये विषाणू सोडून त्यांचे डीएनए चोरण्यात आले आहेत. त्यापासून हायब्रिड किंवा कृत्रिम मानव बनवण्यात आले आहेत. ते कृत्रिम मानव आज आपल्यासोबत राहत असल्याचा दावा केला जात आहे. तर रशियाची एक शासकीय वृत्त वाहिनी रशियाच्या शासकीय प्रमुखांची मुलाखत घेत असताना, कॅमेरामागे अधिकारी दुसऱ्या व्यक्तीशी कामाबाबत बोलत असताना, समोरील गोपनीय फाईल आणि त्यांच्या बोलण्यानुसार फाईलमधील कागदपत्रे देशातील हायब्रिड किंवा कृत्रिम मानवांबाबतची होती. हे घडले त्यावेळी मुलाखत सुरू नव्हती. मात्र कॅमेरा सुरू होता. काही वर्षांनी ही व्हिडीओ क्लिप प्रसिद्ध झाली.

यावर अनेक उलट-सुलट चर्चा झाल्या आणि आजही होत आहेत. मात्र याची संपूर्ण सतत्या पडताळणी सुरू आहे. मात्र यावरुन डीएनएद्वारे कृत्रिम मानव घडू शकतो. या गोष्टीला चालना मिळाली आणि संशोधक याचा शोध करू लागले. या शोधाच्या पहिल्या टप्प्याला यशही आले आहे. या मानवांचा समाजासाठी नेमका काय फायदा होऊ शकतो हे आपल्याला भविष्यात समजेल.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून काशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

क्राईम संध्या सोमवार दि. ३१ ऑगस्ट २०२० ते रविवार दि. ०६ सप्टेंबर २०२० लातूर/मुंबई/पालघर www.crimesandhya.com ५

# राज्यातील सफाई कामगारांसाठी स्वतंत्र कार्यासनाची निर्मिती विचाराधीन –धनंजय मुंडे



**मुंबई/प्रतिनिधी**

सफाई कामगारांचे विविध प्रश्न व समस्या सोडविण्यासाठी सामाजिक न्याय विभागात स्वतंत्र कार्यासनाची निर्मिती विचाराधीन असल्याचे प्रतिपादन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री धनंजय मुंडे यांनी केले. सफाई कामगारांच्या विविध मागण्यांसंदर्भात मंत्रालयात आयोजित बैठकीत धनंजय मुंडे बोलत होते. यावेळी सामाजिक न्याय विभागाचे सचिव श्याम तागडे, समाजकल्याण आयुक्त प्रवीण दराडे, सामाजिक न्याय विभागाचे सहसचिव दिनेश डिंगळे, सफाई कामगार संघटनेचे गोविंदभाई परमार, विविध सफाई कामगार संघटनेचे प्रतिनिधी आणि सामाजिक न्याय, वैद्यकीय शिक्षण, सार्वजनिक आरोग्य, नगरविकास विभागाचे अधिकारी उपस्थित होते. मुंडे म्हणाले, सफाई कामगारांबाबतचा लाड–पागे समितीचा अहवाल व सद्यस्थिती यांचा समन्वय साधून योग्य निर्णय घेतला जाईल. कामगारांच्या निवाराचा प्रश्न सोडविण्यासाठी विभागामार्फत विशेष प्रयत्न केले जातील. सफाई कामगारांच्या वारसा हक्क नियुक्ती देण्यासंदर्भात प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करणार तसेच नियुक्ती बाबतीत शैक्षणिक अर्हता बाब तपासणार. सफाई कामगारांचा सामाजिक आर्थिक स्तर उंचावण्यासाठी सतत प्रयत्न करणार असल्याचेही धनंजय मुंडे यांनी यावेळी सांगितले.

# सर्वोच्च न्यायालयाच्या परीक्षेसंदर्भातील निर्णयाचा आदर करून राज्य शासन अंतिम वर्षाच्या परीक्षेबाबत निर्णय घेईल –उदय सामंत

**मुंबई/प्रतिनिधी**





मा.सर्वोच्च न्यायालयाने परीक्षेसंदर्भात जो निर्णय दिला आहे, त्या निर्णयाचा आदर करून विद्यार्थ्यांच्या आरोग्याची पूर्णपणे काळजी घेऊन राज्य शासन अंतिम वर्षाच्या परीक्षेबाबत निर्णय घेईल, असे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी सांगितले. आज परीक्षेसंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिल्यानंतर उच्च व तंत्र शिक्षण मंत्री श्री. सामंत यांनी पत्रकारांशी संवाद साधला, त्यावेळी बोलत होते.

सामंत म्हणाले, सर्व अकृषी विद्यापीठांना प्रत्यक्ष भेट देऊन कुलगुरू, जिल्हाधिकारी आणि स्थानिक प्रशासन यांच्याशी सविस्तर चर्चा करून विद्यार्थ्यांच्या आरोग्याची पूर्णपणे काळजी घेत परीक्षेचे नियोजन करण्यात येईल. तसेच मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, राज्य आपत्ती व्यवस्थापन समिती, मंत्रिमंडळातील सर्व सदस्य यांच्याशी सुद्धा याबद्दल सविस्तरपणे चर्चा करून विद्यार्थ्यांची मानसिकता लक्षात घेऊन त्यांचे कसलेही खच्चीकरण होणार नाही, आणि शैक्षणिक नुकसान होणार नाही याची दक्षता घेऊन राज्य शासन निर्णय घेईल असेही सामंत यांनी संगितले. सामंत म्हणाले, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा आम्ही आदर करतो. सर्वोच्च न्यायालयात राज्य शासनाकडून राज्यातील कोविड–१९ चा वाढता प्रादुर्भाव, विद्यार्थी, पालक यांची मानसिकता, कुलगुरू यांच्या सूचना आणि काही शैक्षणिक संघटनांचे निवेदन अशा सर्वांगीण परिस्थितीचा विचार करूनच परिक्षेसंदर्भात बाजू मांडण्यात आली होती. तसेच या वर्षापासून माननीय उच्च न्यायालयाने आदेशित केल्याप्रमाणे सीजीपीए (CGP) पद्धतीने निकाल जाहीर करून पदवी देण्यासंदर्भात निर्णय घेतला होता.

राज्य शासनाने घेतलेला निर्णय हा विद्यार्थ्यांचे हित, त्यांची मानसिक आणि राज्यातील कोविड–१९ चा वाढता प्रादुर्भाव याच पार्श्वभूमीवर घेतला होता. सामंत म्हणाले, परिक्षेसंदर्भातील कार्यपद्धतीमध्ये समाविष्ट असलेले सर्व अधिकारी, कर्मचारी, प्राचार्य, प्राध्यापक, पोलीस व इतर सर्व संबंधित अधिकारी यांच्याशी चर्चा करून केंद्र शासनाने कोविड – १९ संदर्भात दिलेल्या सर्व सुरक्षिततेचा प्रोटोकॉल व नियमांचे पालन करुन परीक्षा कशा घेता येतील याबाबत सर्व कुलगुरू यांच्याशी चर्चा करून राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण समवेत सर्वांगीण विचार करून परीक्षा कधी, कशा व कोणत्या पद्धतीने विद्यापीठ परीक्षा घेईल या संदर्भात निर्णय घेण्यात येईल असेही सामंत यांनी यावेळी संगितले.

# उस्मानाबाद् येथे शासकीय महाविद्यालय व संलग्न रुग्णालय उभारणीला तत्वत: मान्यता

**उस्मानाबाद/प्रतिनिधी**

उस्मानाबाद येथे शासकीय महाविद्यालय आणि संलग्न रुग्णालय उभारणीला तत्वतः मान्यता देण्यात आली असून, वैद्यकीय शिक्षण विभागाच्या वतीने तातडीने पुढील कार्यवाही करण्यात येणार असल्याचे वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्य मंत्री ना. अमित विलासराव देशमुख यांनी सांगितले आहे. २६ ऑगस्ट रोजी मुंबई येथील सह्याद्री अतिथीगृह उस्मानाबाद येथे नव्याने उभारावयाच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि संलग्न रुग्णालयाच्या संदर्भाने आढावा बैठक झाली.

या बैठकीस पर्यावरण तथा राज्य शिष्टाचार मंत्री ना. आदित्य ठाकरे, उस्मानाबादचे खासदार ओमराजे निंबाळकर आणि आमदार कैलास पाटील आदी उपस्थित होते.उस्मानाबाद येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्याबाबत गुरूवारी मुंबईतील सह्याद्री अतिथीगृह येथे आढावा बैठक घेण्यात आली हे महाविद्यालय सुरू करण्याच्या दृष्टीने सर्वेष चर्चा झाली. या संदर्भातील कार्यवाहीचा आढावा घेणेत येऊन वैद्यकीय शिक्षण विभागामार्फत तत्वतः मान्यता देण्यात आली. आता यापूढील कार्यवाही वैदयकीय शिक्षण विभागाने तातडीने पुर्ण करावी अशा सुचना वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्य मंत्री ना. अमित विलासराव देशमुख यांनी संबंधितांना यावेळी दिल्या आहेत.या बैठकीच्या दरम्यानच उस्मानाबाद जिल्हयातील कोवीड१९ प्रादूर्भाव नियंत्रणात आणण्यासाठी शासना मार्फत करण्यात येत असलेल्या उपाययोजनांचा आढावाही घेण्यात आला. सध्या कोविड–१९ च्या पार्श्र्वभूमीवर उस्मानाबाद येथे वैद्यकीय अधिकारी आणि या क्षेत्रातील तज्ज्ञांची कमतरता जाणवत आहे. यामुळे वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्य मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अमित विलासराव देशमुख यांनी जिल्ह्यातील सामान्य जनता आणि रुग्णांची गैरसोय होऊ नये यासाठी अन्य जिल्ह्यातून तात्पुरत्या स्वरूपात उधार उसनवार तत्वावर ते उपलब्ध करून देण्याबाबत वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव सौरभ विजय यांना निर्देश देण्यात आले आहेत.

# गणेश मूर्तींचे विसर्जन घरातच करावे!

**लातूर/प्रतिनिधी**

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर खबरदारीचा उपाय म्हणून शहरातील नागरिकांनी यावर्षी घरी स्थापन केलेल्या गणरायाचे घरातच विसर्जन करावे, असे आवाहन महापौर विक्रांत गोजमगुंडे यांनी केले आहे. लातूर शहरात कोरोना संदर्भातील सर्व निकष पाळून आनंदात गणेशोत्सव साजरा केला जात आहे. नागरिकांनी या कालावधीत संयम बाळगला. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनीही खबरदारीच्या सर्व उपाययोजना केल्या, याबद्दल महापौरांनी शहरवासियांचे आभार मानले. स्वतःला आणि शहरातील नागरिकांना कोरोनाच्या संसर्गापासून दूर ठेवण्यासाठी प्रत्येकाने काळजी घेण्याची गरज आहे. लातूरकर सुसंस्कृत आहेत. सामाजिक भान जपणारे आहेत. मागील वर्षी दुष्काळी स्थिती पाहता गणेश मूर्तींचे विसर्जन पाण्यात न करण्याचा मुर्ती दान करण्याच्या आवाहनाला लातूरकरांनी भरभरून प्रतिसाद दिला होता. प्रत्येक नागरिकाने आपल्या लाडक्या गणरायाला निरोप देताना काळजी घ्यावी. स्वतःला कोरोनाचा संसर्ग होऊ नये किंवा त्याचा प्रसार होऊ नये यासाठी सार्वजनिक ठिकाणी येऊन गणेश विसर्जन टाळावे. विसर्जनाच्या दिवशी मोठ्या संख्येने नागरिक एकत्रित आले तर त्यातून संसर्ग वाढू शकतो. ते टाळण्यासाठी घरातच गणेशमूर्तींचे विसर्जन करावे. आपण स्वतः देखील घरीच गणरायाचे विसर्जन करणार असल्याचे ते म्हणाले. महापौरांनी सांगितले की, ज्या नागरिकांना घरात गणेश विसर्जन करणे अशक्य आहे अशांसाठी महानगरपालिकेच्या वतीने व्यवस्था केली जाणार आहे. काही ठिकाणी गणेशमूर्ती संकलन केंद्र उभारली जाणार आहेत. सार्वजनिक गणेश मंडळांनीहीयाच केंद्रांवर मुर्ती दान करावयाच्या आहेत.येथे संकलित होणाऱ्या मुर्तींचे महापालिकेच्या वतीने विधिवत विसर्जन केले जाणार आहे.

# समाजातील शिक्षणाचा टक्का वाढण्याची गरज – रामभाऊ गुंडिले



**देवणी/प्रतिनिधी**

उदगीर तालुक्यातील माळेवाडी येथे रविवारी मातंग समाजाचा छोटासा मेळावा घेण्यात आला. यावेळी माजि आमदार रामभाऊ गुंडीले मार्गदर्शन करताना म्हणाले कि अनुसूचित जातीत मातंग समाज हा दुसऱ्या स्थानी आहे या समाजात असलेली अंधश्रद्धा ही शिक्षणातुनच हद्दपार होईल, त्यासाठी समाजातील शिक्षणाचा टक्का दिवसेंदिवस वाढण्याची गरज आहे व मी समाजात जन्माला आलो आहे. समाजातील कोणतीही जबाबदारी पेलन्याची ताकत आहे असे प्रतिपादन माजी आमदार रामभाऊ गुंडिले यांनी व्यक्त केले. अध्यक्षस्थानी माजी आमदार टि. पी. कांबळे, ॲड. टी.एन.कांबळे, माजी सभापती, बंडेवार मामा नांदेडकर व्यंकट शिदे, डॉ पांडुरंग कंलबकर, डि.आर. जाधव, ज्ञानेश्वर सुर्यवशी, बापुराव अंबेगावे, डि.एल.कांबळे, वंसत कांबळे, नामदेव कांबळे, नरसिंग सुर्यवंशी, प्रल्हाद थोरे, मनोहर सुर्यवशी, हुसेन धोत्रे, रणदिवे लक्ष्मण, मारोती सुर्यवशी, सुधाकर कांबळे, माधव कांबळे, गजानन गायकवाड, प्रभु गायकवाड, शेषराव करकेलीकर, सुनील कांबळे, शिवदास गायकवाड यांच्या सह मातंग समाजातील अनेकांची उपस्थिती होती. मान्यवरांच्या वतीने यावेळी लहुजी वस्ताद, साहित्यरत्न लोकशाहिर आण्णा भाऊ साठे, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, बाबासाहेब गोपले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन देविदास गायकवाड व आभार बालाजी गोटमुखले यांनी मानले.

# उजाड माळरानावर अंध शेतकरी रोकडेंची पाचशे वृक्षांची डोळस लागवड व जोपासना



औद्योगिकरणाच्या मागे लागून माणसाने प्रचंड वृक्षतोड केली, यंत्रांची अनगिनत निर्मिती केली, याची परिणती पृथ्वीवरचे पर्यावरण बदलात झाले. सातत्याने तापमानात वाढ होतेय आणि पावसाचे प्रमाणही कमालीचे कमी होत गेले, होते आहे आणि माणूस नवनवीन आजारांना बळी पडतो आहे. हे सर्व आता पुन्हा पूर्वपदावर न्यायचे असेल तर आता प्रत्येकाने आपापल्या परिसरात वाढणारे वृक्ष लागवड करुन, त्याचे संगोपण करणे जिकीरीचे झाले आहे, याची नाडीपरीक्षक, वनौषधी जाणकार, वृक्षप्रेमी, दोन्ही डोळ्यांनी अंध–शेतकरी तुकाराम बाबूराव रोकडे (मो.नं.९४२०४३४६७१) यांना जाणीव असल्याने, त्यांनी अनेक अडचणींवर मात करत करत, आपल्या उस्मानाबाद जिल्ह्यातील, तुळजापूर तालुक्यातील आपसिंगा येथील डोंगरपायथ्यावरील उजाड माळरानावरील सुमारे तीन एकर शेतीत गेली वर्षभरात आंबा, चिंच, बेल, जांभळ, सिताफळ, आवळा, करंज, साग, कवट, कन्हेरी, नारळ, सागरगोटा, पिंपळ, वड आदी ५०० वृक्षांच्या रोपांची लागवड आणि संगोपण करुन भांबावलेल्या शेतकऱ्यांसमोर एक डोळस आदर्श निर्माण केला आहे.

समाज आणि शासनाने या धडपडीची आस्थेने दखल घेवून, त्यांना अधिक चालना देण्याची गरज आहे. पडीकचा शिक्का मिटवला तुकाराम बाबुराव रोकडे हे मुळचे आपसिंगा, ता.तुळजापूर येथील रहिवासी असून, बाभळगाव रोड लातूरच्या म्हाडामध्ये राहतात. ते वनौषधींचे जाणकार असून, नाडीपरिक्षण करुन, जुन्यासह अगदी कॅन्सरवर वनौषधींने मात करता येते असा दावा करतात. आजारासाठी औषधं लागतात, त्यासाठी वनौषधी लागतात, यामुळे ते झाडांशी अधिक जवळ गेले. घराचे अंगण असो माळवद त्यावर ते लहानमोठ्या वृक्षांची लागवड करत असतात. त्यांची आपसिंगाच्या पश्चिमेकडील वरवटी–आपसिगा रोडवर, उजाळ डोंगर पायथ्याला साडेचार एक वडिलोपार्जित शेती आहे. त्या माळाच्या पायथ्याशी आलेल्या समतल शेतीत त्यांनी पंचायत समितीच्या योजनेतून विहीर घेतली. त्याला चाळीस फुटावर चांगले पाणी लागले, त्यावर मोटार बसवून पाचशे मीटरचे पाईपलाईन केली. माळ व उतारावरील अधीर्र शेती अनेक वर्षांपासून पडीकच होती. जसे शेजाऱ्यांचीआहे तशी. पहिल्या वर्षी दोनशे रोपटे लावली. रोकडे यांना रेडिओ ऐकण्याची आवड असून, ती ऐकता ऐकता त्यांना वनीकरणाकडून वृक्षाची लागवड, संगोपणासाठी अनुदान मिळते असे समजले तेव्हा पासून ते झपाटून कामाला लागले, आता त्यांना आपले माळरान खुणावू लागले आणि त्यांनी तिकडे धाव घेतली. लातूरहून धडपडत एसटी च्या बसने कधी, ऑटोरिक्षा करुन ते आपसिंगाला जावू लागले. जून–जुलै २०१९ मध्ये त्यांनी तुळजापूर सामाजिक वनीकरण खात्याकडे रोपांसाठी पाठपुरावा केला. खा.ओमराज निंबाळकर यांच्या मदतीने गतवर्षी वनीकरणाकडून दोनशे झाडांची रोपटी मिळवली. रेंजर मनोहर पुंड यांनी याकामी मदत केली. पांडुरंग चौगुले यांच्या जेसीबीने जवळपास दोन एकरावर त्यांनी अडीच बाय अडीच बाय अडीच चौरस फुटांचे खड्डे घेतले. प्रा.डॉ.सुरेश सोनोने यांच्या सहाय्याने, शेजारी बाळू बिडवे, माजी वनीकरण अधिकारी विलास म्हेत्रे, लिंबाजी सरडे, लक्ष्मण रोकडे यांच्या मदतीने आंबा, चिंच, पिंपळ, जांभळ, वड, आवळा, साग, करंज आदींच्या या रोपट्याची लागवड केली. एकदाची फुट–दोन फुटांची झाडे लावली, आता तिचे संगोपन करणे, पाणी घालण्याचा प्रश्न होता.शेतीत विहीर आणि पाणी. मात्र, अर्धवट पाईपलाईन मुळे या झाडांना पाणी देता येत नाही आणि पाईपलाईनसाठी पैसा नाही. मग त्यांनी रोडलगत एक हौद बांधून घेतला. त्यात टँकरने पाणी साठवायचे. वनीकरणाकडून काही अनुदान मिळत गेले. ते अधिक काही पदरमोड करत त्यांनी गेली वर्षभर रोजगारी लावून या झाडांना पाणी दिले. हा हा म्हणता या रोपट्यांनी जीव धरला.. ती खड्ड्याबाहेर डोकावू लागली, त्यांची तुकारामांना माहिती झाली.. त्यांना अधिक आणखी दोनशे रोपट्यांची लागवड गतवर्षी केलेली धडपड कामी आली. लावलेली झाडे जगली, जगवली आता उरलेल्या पडीक जमिनीवरही झाडे लावण्याचा रोकडेंनी निर्धार केला. कृषी राज्यमंत्री बच्चू कडू, पर्यावरण राज्यमंत्री संजय बनसोडे यांच्याशी पत्रव्यवहार केला. पुन्हा मग सामाजिक वनीकरणाकडे पाठपुरावा सुरु झाला. कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे राज्यात मार्चपासून लॉकडाऊन होते, घराबाहेर पडणेही अवघड पण मनात केलेला निर्धार रोकडेंना बसू देत नव्हता, कधी नातलग, कधी मित्राची मोटारसायकल तर कधी ऑटोरिक्षा करुन त्यांनी लातूर–तुळजापूर–आपसिंगा–उस्मानाबाद असा प्रवास करत राहिले, अर्थात यासाठी अधिक पैसाही खर्च करावा लागला. आर्थिक चणचण होतीच. सेवानिवृत्त कर्मचारी कुंडलिक गोरे यांनी उसनवारीचा हातभार दिला, जुलै २०२० अखेर जेसीबीने आणखी दोनशे खड्डे पाडून घेतले., रेंजर पुंड यांच्याकडून ऑगस्ट २०२० च्या पहिल्याच आठवड्यात आणखी दोनशे रोपटे मिळवली. रोपटी तर आली... पण लावण करण्यासाठी लॉकडाऊनमुळे लातूरहून आपसिंगाला जाणे –येणे अवघड झाले. दुसरा आठवड पावसाने ओढ दिली. आता कशी लागवड करायची, पैसा नाही तो प्रश्न त्यांना सतावू लागला पण धडपडणार्यांच्या मदतीला कोणीतरी धावून येतो तसे माजी वनअधिकारी विलास म्हेत्रे यांनी आपल्या पाईपलाईनने रोकडेंच्या हौदात पाणी भरुन दिले आणि लिंबाजी सरडे, बाळू बिडवे, लक्ष्मण रोकडे यांनी झाडे लावून घेतली. गतवर्षींची आणि यंदाही जवळपास पाचशे झाडे पुढील दोनतीन वर्षात बहरली तर या माळरानावर एक आदर्श वृक्ष लागवडीचा नमुना पहायला मिळणार आहे. पण मेहनत आहे.. ती रोकडे करतील, संबंधित खात्यानेही, शासनानेही त्यांना मदत द्यायला हवी. गेल्या आठवडाभरात गायब झालेला पाऊस तिसर्या आठवड्यात फिरुन आला. या नव्या रोपट्यांना तो एकप्रकारे वरदानच ठरला. रोकडेंचा आनंद गगणात मावेना, जून पासून रोकडेंनी मला त्यांच्या शेतात त्यांनी केलेल्या, धडपडीचं झालेलं चिज बघायला चला, असा लकडा लावला होता.अखेर १६ ऑगस्टला मी वेळ काढला. बाराशे रुपये भाड्याचा एक ऑटोरिक्षा करुन आम्ही बार्शी रोडने निघालो पावसाची रिपरिप सुरु होतीच. वाटेने मी अनेक जागी थांबून वैद्यराज तुकाराम रोकडेंना झाडे, वेलींची माहिती विचारत असे.. उस्मानाबादहून सात किलोमीटर अंतरावरील त्यांच्या चोहोबाजूंनी डोंगर आणि आतत्या घाटमाथ्यावरील शेतीत दाखल झालो. त्यांच्या अंध सुनिता पत्नीने पहाटे तीन वाजता उठून करुन दिलेल्या भाकरी,सुकी मसूर डाळ, शेंगदाण्याची चटणी, लोणच्याचा मनसोक्त आस्वाद घेतला.भिरभिर पाऊस चालूच होता.. मग लक्ष्मण रोकडे, दत्ता गोरेसह जुने आणि नवीन झाडांची लागवड पाहात निघालो. गतवर्षींची झाडे गुडघ्याएवढी आलेली आहेत. पूर्वेला समतल जमिनीत सोयाबीन डोलत होता. विहीरीत काळेशार पाणी खुणावत होतं. बांधावर लावलेली चाफा,जटाशंकरच्या वेलीला रोकडे चाचपून पाहात होते. पूर्ण शेतीला आमची चक्कर झाली.या भागात घेवडा, लोखंडी, घुटबोर, टणटणी, जखमजोडी ,तालीमखाना, रानतिळवण, वाकळ, मुकणी, तरवटा,दुधानी, पांढरफळी ,शेलवट, उन्हाळी, चारं, कावळीच्या मुळ्या,गवत अशा या भागातील रानझाडं, वेलांचं दर्शन झालं.अंध वैद्यराज तुकाराम रोडकेंची डोळस धडपड प्रत्यक्ष पाहता आली.रोकडेंनी इंदिरा आवास योजनेतून घरकुल मिळवून शेतीत उभारणी चालवलीय पैशाअभावी ती थांबलीय. माजी वन अधिकारी विलास म्हेत्रे यांची येथे भेट होवून झाडांविषयी चर्चा झाली.चार वाजेनंतर आम्ही पुन्हा ऑटोरिक्षाने तुळजापूरहून लातूरच्या दिशेने निघालो दमदार पावसांच्या सरीच्या साथीनं... पुढं चौथा आडवडाही लातूर –उस्मानाबाद जिल्ह्यात भीज पावसाने हजेरी लावून पिकांना आधार दिला. रोकडेंच्या रोपट्यांना तो अधिक लाभदायक ठरलाय. आर्थिक मदतीची गरज.. आंधळ्या तुकाराम रोकडेंनी विविध प्रकारची सुमारे पाचशे देशी झाडांची लागवड करुन संगोपणाचे अवघड काम हाती घेतले आहे, त्यामध्ये त्यांना शतावरी, अश्वगंधा, सावरी अशा औषधींचे आंतरपीक घ्यायचे आहे.त्यांची पाईपलाईन,घरकुल अर्धवट आहे, त्यासाठी जवळपास एक लाख रुपयांची नितांत गरज आहे,कोणी दानशुरांनी मदत केली वा जाणकारांनी हातउसने दिले तर त्यांचे पुढील सर्व प्रश्न मार्गी लागणार आहेत.

आर्थिक संकटं दूर होतील एकीकडे, अलिकडे मराठवाड्यातला शेतकरी कधी दुष्काळ, कधी अवर्षण, अधी अतिपावसाने, कधी बियाणे उगवलेच नाही म्हणून हतबल होतो आहे, कर्जबाजारी होवून जीवनच संपवून कुटूंबाला वार्यावर सोडत असल्याचे पहायला मिळते आहे, अशा वेळी तुकाराम रोकडेसारखा अंध माणूस डोंगर रांगांना पान्हा फोडून वृक्ष लांगवड करुन, जगण्याचा आणि जगवण्याचा आधार देत डोंगरसासाखा उभा आहे. त्यांच्या सारखी या मराठवाड्यातील शेतकर्यांनी आपल्या पिकावू, पडीक, माळरानातील जमीनीवर अशाप्रकारे वृक्ष लागवड केली तर मोठ्या प्रमाणावर फळाचे उत्पादन होईल, पैसा मिळंल. पर्यावरण रक्षणाला मोठा हातभार लागून, अवघ्या मानव जातीवर पर्यावण बदलामुळे आलेले संकट दूर व्हायला हातभार लागणार आहे एवढे निश्चित..

**– बाळ होळीकर, लातूर**

31 AUGUST TO 06 SEPTEMBER 2020 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 29/08/2020 8:49 PM Page 1



पान १ वरून...

## सरकारच्या गाईड लाईनला वरिष्ठांनी...

दोषींवर कारवाई करावी अशी मागणी केली जात आहे. कोरोनाने पालघर जिल्ह्यात आतापर्यंत ४ पोलिसांचा बळी घेतला आहे. यामध्ये किरण साळुंखे पो.ह., जितेंद्र भालेराव पो.ना., प्रभाकर खोत पो.उप.नि, दिनेश भगवान कुंवर स.फौ. त्यामुळे सरकारच्या गाईड लाईननुसार आवश्यक ती खबरदारी घेण्याची जबाबदारी पालघरच्या पोलीस अधीक्षकांपासून जिल्ह्यातील प्रत्येक पोलीस ठाण्यातील प्रभारी अधिकाऱ्यांची होती. सरकारचे परिपत्रक पालघर जिल्हा पोलीस मुख्यालयाला मिळाल्यानंतर गणेशोत्सवासाठी जिल्हा पोलीस मुख्यालयाकडून जी अधिक पोलीस कुमक सर्व पोलीस ठाण्यांना जिल्हा विशेष शाखेकडून पाठवण्यात आली होती. त्यावेळेस सर्व पोलीस ठाण्यांच्या प्रभारींना एक पत्र देण्यात आले होते. त्यात गृहखात्याच्या गाईड लाईन नुसारच पोलिसांना बंदोबस्तासाठी पाठवावे असे स्पष्ट करण्यात आले होते. त्यामुळे पालघर जिल्ह्यातील २२ पोलीस ठाण्यांच्या सर्व प्रभारींनी त्या गाईड लाईन नुसारच गणेशोत्सवासाठी बंदोबस्त पाठवायला हवा होता आणि अप्पर पोलीस अधीक्षक वेगवेगळ्या विभागातील डीवायएसपी, विभागीय पोलीस अधिकारी या सर्वांनी बंदोबस्तावर पाठवल्या जाणाऱ्या पोलीस प्रक्रियेवर लक्ष ठेवायला हवे होते. हे लोकं नेहमी पोलीस ठाण्यांच्या हद्दीत पाहणीसाठी फिरत असतात. मग गृहखात्याची गाईड लाईन डावलून ५० वर्षांचे पोलीस जे वेगवेगळ्या ठिकाणी कार्यरत होते ते या बड्या अधिकाऱ्यांना दिसले नाहीत का? या बाबत त्यांची काहीच जबाबदारी नव्हती का? आजही पालघर पोलीस ठाण्याच्या कार्यकक्षेतील २२ पोलीस ठाण्यांमध्ये ५० वर्षांच्या वरील किमान १०० पोलीस कार्यरत आहेत. त्यांना उद्या समजा कोरोनाची बाधा झाली तर त्याला जबाबदार कोण? पालघर जिल्ह्यातील वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांमध्ये समन्वय नसल्यामुळे गृह खात्याच्या गाईड लाईन मधील सूचनांकडे दुर्लक्ष केले जात आहे आणि हि परिस्थिती अशीच राहिली तर पालघरचे संपूर्ण पोलीसदलाच कोरोनाच्या विळख्यात सापडेल. तेंव्हा अजूनही वेळ गेलेली नाही. पोलीस अधीक्षक आणि इतर बड्या अधिकाऱ्यांनी पोलीस ठाण्यांना भेट देवून तिथल्या पोलीस कर्मचाऱ्यांची पाहणी करावी आणि ५० वर्षांवरील पोलीस कर्मचारी पोलीस ठाण्यात किंवा बाहेर बंदोबस्तावर असतील, तर त्यांना गाईड लाईन नुसार काम द्यावे किंवा ५५ वर्षांच्या वरील पोलिसांना होम स्टे करावे.

## सोन्याचे आमिष दाखवून लुटणे अंगाशी...

अशा तऱ्हेने शिकार करायला टपून बसलेलेच शिकार झाले आणि जीव गमावून बसले. या प्रकरणी पोलिसांनी सर्व आरोपींना अटक केली आहे. नातीक कुंज्या चव्हाण, श्रीधर कुंज्या चव्हाण, नागेश कुंज्या चव्हाण, लिंब्या हाबऱ्या काळे या चौकडीचा लोकांची लुटालुट करण्याचा उद्योग होता. नकली सोने असली सोने असल्याचे भासवून ते कमी भावात विक्री करण्याच्या बहाण्याने ही चांडाळचौकडी ग्राहकांना जाळ्यात ओढाण्याचे काम करत होती. ग्राहकांचा विश्वास संपादन करुन सावज रुपात पैसे घेवून आलेल्या ग्राहकाची लुट करणे हा या चौकडीचा उद्योग होता. या कामी त्यांची गुन्हे करण्याची एक पद्धत (मोड्स ऑपरेंडी) ठरलेली होती. ही चौकडी त्यांच्या ताब्यातील मोबाईलवरुन कोणत्याही क्रमांकावर डायल करत असत. मनाला पटेल त्या क्रमांकावर फोन केल्यानंतर मोबाईलच्या स्क्रीनवर ट्रू कॉलरच्या मदतीने पलीकडील मोबाईल धारकाचे नाव त्यांना दिसत असे. एकदा का पलीकडील मोबाईलधारकाने फोन उचलला म्हणजे या चौकडीचा गोड बोलून फसवणूकीचा उद्योग सुरु होत असे. खोदकाम करतांना आमच्या हाती सोन्याचे घबाड लागले आहे. आम्ही अडचणीत आहोत. आमच्याकडून तुम्हाला अगदी कमी भावात सोने मिळेल. तुम्ही एकदा आम्हाला भेटून आमच्याकडून सोने घ्या असा तगादा ते पलीकडून बोलणाऱ्या मोबाईल धारकाकडे लावत असत. कुणी प्रतिसाद दिला नाही तरी ही चांडाळ चौकडी त्या मोबाईल धारकाला सारखा सारखा फोन लावून सोने खरेदीसाठी भाग पाडण्याचा प्रयत्न करत असत. ग्राहक आल्यानंतर ते त्याला नकली सोन्याचा साठा दाखवत असत. त्यातील एखादे असली सोने अगदी कमी किमतीत घेण्यास भाग पाडत असत. या सोन्याची कोणत्याही सराफाकडून खात्री अर्थात परिक्षा करुन घेण्यास ते सांगत असत. पहिल्या भेटीत ते ग्राहकाला असली सोने देत असत. ते सोने खरे असल्याची खात्री झाल्यानंतर ग्राहकाचा या टोळीवर विश्वास बसत असे. एकदा विश्वास बसल्यानंतर ही चौकडी अर्थात लुटारु टोळी ग्राहक मोठ्या प्रमाणात सोने खरेदीसाठी आल्यानंतर त्याच्यावर सरळ सरळ हल्ला करुन त्याला लुटून घेत असत. मोह हे दुखा:चे कारण असते. मनुष्यप्राणी मोहाला बळी पडतो हा निसर्गाचा नियम आहे. पाच दुर्गुणापैकी मोह हा एक दुर्गुण आहे. त्या मोहाच्या बळावर बदमाश मनुष्य चांगल्या मनुष्याला बिघडवण्यासह फसवण्याचे काम करत असतो. मनुष्य मोहाला बळी पडला म्हणजे कमी अधिक प्रमाणात विनाशाच्या दिशेने दृश्य अथवा अदृश्य स्वरुपात वाटचाल करत असतो. नातीक कुंज्या चव्हाण, श्रीधर कुंज्या चव्हाण, नागेश कुंज्या चव्हाण हे तिघे भाऊबंद होते. तिघे भाऊ अहमदनगर जिल्हयाच्या श्रीगोंदा तालुक्यातील सुरेगाव येथील लहाकर मळा येथील रहिवासी होते. लिंब्या हाबऱ्या काळे हा देऊळगाव येथील रहिवासी होता. एकदा या लुटारु टोळीने असाच नेहमीच्या सरावाने एक फोन लावला. तो फोन जळगाव येथील नरेश उर्फ बाळा जगदीश सोनवणे या तरुणाला लागला. जळगाव येथील हरिविठ्ठल नगर भागात नरेश सोनवणे हा रहात होता. नेहमीच्या फसवणूक करण्याच्या सवयीने नरेश सोनवणे यास पलिकडून सांगण्यात आले की आम्हाला खोदकाम करतांना सोन्याचे दागिने सापडले आहेत. आम्ही अडचणीत असून आम्हाला हे दागिने कमी किमतीत विकायचे आहे. तुम्ही एकदा आमच्याकडे नगर जिल्हयात या आणि आमच्याकडील दागिने बघून घ्या. तुम्ही दागिने घेतलेच पाहिजे असा आमचा आग्रह नाही. मात्र एकवेळा आम्हाला भेटा आणि दागिने बघून खात्री करा. त्यानंतर या टोळीने नरेश सोनवणे यास दररोज फोन लावण्याचा सपाटा लावला. जवळपास एक महिना सोने घेण्यासाठी बोलावण्याचा फोन नरेश यास येत होता. त्यामुळे त्याने हा प्रकार गल्लीतील प्रेमराज रमेश पाटील, कल्पना किशोर सपकाळे, आशाबाई जगदीश सोनवणे आदींना सांगितला. महिलावर्गाला सोन्याचा हव्यास असतो हे सर्वश्रृत अर्थात जगजाहीर आहे. कमी किमतीत सोने मिळत असल्याचे समजताच कल्पना सपकाळे या महिलेला सोन्याचा मोठ्या प्रमाणावर मोह झाला. तिने सर्वांना कमी किमतीत सोने घेण्यासाठी जाण्यासाठी तयार केले. सर्वांना तिने लवकर सोने घेण्यासाठी चला म्हणून आग्रह सुरु केला. कल्पनाबाईच्या सततच्या आग्रहामुळे सर्वांनी मिळून भाडे तत्वावर किलोमीटरच्या हिशेबाने चारचाकी वाहनाने अहमदनगर जिल्हयात जाण्याचे ठरवले. त्यामुळे नरेश सोनवणे व आशाबाई सोनवणे या मायलेकांनी देखील जाण्यासाठी भाड्याच्या पैशांची व सोने विकत घेण्यासाठी लागणाऱ्या पैशांची जुळवाजुळव सुरु केली. सर्व जण कमी किमतीत सोने घेण्यासाठी जात असल्याचे बघून प्रेमराज पाटील याने देखील त्यांच्यासमवेत जाण्याची तयारी केली. अहमदनगर जिल्हयात सोने खरेदीसाठी योगेश मोहन ठाकुर याच्या वाहनाने जाण्यास सर्वजण गुरुवारी जाण्यास निघाले. गुरुवार हा चांगला व शुभ दिवस असल्याचे सर्वांनी मनाशी म्हणत देवाचे नाव घेत प्रवासाला सुरुवात केली. सोने ताब्यात मिळू दे, सुखरुप परत येवू दे अशी चौघांनी देवाला मनातल्या मनात विनवणी सुरु केली. आपण आपले गाव सोडून लांब पल्ल्याच्या प्रवासाला जात आहोत. तसेच परतीच्या प्रवासात आपल्याजवळ सोने राहील त्यामुळे कदाचीत आपल्यावर हल्ला होवू शकतो असा मनाशी विचार करत नरेश सोनवणे याने आपल्या कब्जात एक चाकू घेतला होता. आपले व आपल्या सोबत असणाऱ्या सर्वांचे वेळ प्रसंगी रक्षण करण्यासाठी नरेश सोनवणे याने चाकू आठवणीने सोबत घेतला होता. आज सायंकाळी सावज आपल्या जाळ्यात येणार आहे याची माहिती नातीक कुंज्या चव्हाण, श्रीधर कुंज्या चव्हाण, नागेश कुंज्या चव्हाण, लिंब्या हाबऱ्या काळे या लुटारुंना समजली होती. त्यांचे नरेश सोनवणे याच्याशी मोबाईलवरील संभाषणातून संपर्क सुरु होता. ही लुटारु टोळी अहमदनगरच्या दिशेने येणाऱ्या ग्राहक वजा सावजाचे लोकेशन घेत होती. चार लाख रुपयात पावशेर अर्थात २५० ग्रॅम सोने खरेदी विक्रीचा व्यवहार ठरला होता. त्यामुळे येत असलेल्या पार्टीकडे लाखो रुपये नक्की असणार याची खात्री अहमदनगर येथील बदमाश टोळीला होती. त्यामुळे ते त्यांना लुटण्याच्या तयारीत होते. त्यांच्या आजुबाजुला कुणाला दिसणार नाही अशा पद्धतीने त्यांचे साथीदार लपून बसलेले होते. देवून टाका देवून टाका हे वाक्य त्यांचा पासवर्ड होता. हे वाक्य म्हटल्यावर सर्वांनी मिळून जळगावहून आलेल्या सर्वांवर हल्ला करुन लुटालुट करण्याचा त्यांचा डाव होता. ठरल्यानुसार अहमदनगर जिल्हयातील श्रीगोंदा तालुक्यातील विसापूर फाट्यावर भेटून व्यवहार पार पाडण्याचे ठरले होते. या निर्जन ठिकाणी कमी किमतीत सोने घेण्यासाठी नरेश व त्याची आई आशाबाई सोनवणे, कल्पना सपकाळे, प्रेमराज पाटील व वाहन चालक योगेश ठाकुर असे सर्वजण विसापूर फाट्यावर चार वाजता दाखल झाले. आलेल्या दोघा महिला व तिघा पुरुषांजवळ रोकड असल्याची खात्री नातीक कुंज्या चव्हाण, श्रीधर कुंज्या चव्हाण, नागेश कुंज्या चव्हाण व लिंब्या हाब-या काळे यांना झाली होती. कल्पनाबाई सपकाळे हिच्या ताब्यातील २ लाख ९५ हजार रुपये मोजून घेतल्यानंतर त्यांना सोने देण्याएवजी त्यांनी देवून टाका देवून टाका हा पासवर्ड मोठ्याने बोलण्यास सुरुवात केली. देवून टाका असे दोन वेळा म्हटल्यावर आजूबाजूला दबा धरुन बसलेले त्यांचे साथीदार धावत धावत आले. दबा धरुन बसलेल्या सर्वांनी मिळून जळगाव येथून आलेल्या सर्वांवर हल्ला करण्यास सुरुवात केली. काही क्षणातच त्या जागेला रणांगणाचे स्वरुप प्राप्त झाले. आता आपण लुटले जात असल्याचे दिसताच दोन्ही महिला घाबरल्या. त्यांनी आपल्या हातातील रोख रकमेची पिशवी दोन्ही हातांनी लपवत दाबून धरण्याचा प्रयत्न सुरु केला. मात्र हल्लेखोरांनी सर्वांना मारहाण करत त्यांच्या ताब्यातील मोबाईल, रोख रक्कम व अंगावरील दागीने काढून घेतले. आता आपला जीव आणि ताब्यातील रोकड वाचवण्यासाठी नरेशने आपल्या ताब्यातील चाकू बाहेर काढला. मागचा पुढचा विचार न करता त्याने एकामागून एक असे चौघांवर चाकूचे सपासप वार सुरु केले. एकामागून एक असे नातिक, श्रीधर व नागेश हे तिघे भाऊ रक्ताच्या थारोळ्यात पडले. त्यांचा साथीदार लिंब्या काळे याच्यावर देखील नरेशने चाकूचे वार करत त्याला घायाळ केले. एकामागून एक असे चौघे जण रक्ताच्या थारोळ्यात पडल्याचे बघून इतर हल्लेखोर घाबरुन पळून गेले. आता येथून लवकरात लवकर पलायन करण्याचे सर्वांनी ठरवले. आलेल्या सर्वांनी तात्काळ जळगावचा परतीचा मार्ग धरला. त्यानंतर काही वेळातच चौघा जखमींनी आपका दम तोडला. या हल्लयादरम्यान घाईगर्दीत नरेश सोनवणे याच्या खिशातील बँकेचे एटीएम कार्ड घटनास्थळावर पडून गेले. घाईगडबडीत ते एटीएम कार्ड पडल्याचे कुणाच्याच लक्षात आले नाही कारण प्रत्येकाला आपला जीव वाचवून परतण्याची घाई झाली होती. सर्व जण घटनास्थळावरुन पळून गेल्यानंतर या घटनेची माहीती चोघा मयतांच्या नातेवाईकांना समजली. चार जणांच्या हत्येची धक्कादायक बातमी बघता बघता परिसरात समजण्यास वेळ लागला नाही. दरम्यानच्या कालावधीत नरेश सोनवणे, त्याची आई आशाबाई सोनवणे, कल्पना सपकाळे, प्रेमराज पाटील, वाहन चालक योगेश ठाकूर असे सर्वजण जळगावला रातोरात गुपचूप परत आले. जणू काही झालेच नाही असा पवित्रा सर्वांनी घेत मौन बाळगले. सोने तर मिळाले नाही मात्र फार मोठा अनर्थ घडला होता. या प्रकरणी मयत झालेल्या तिघा भावांची आई अक्षदा कुंजीलाल चव्हाण हिने बेलवंडी पोलिस स्टेशनला फिर्याद दाखल केली. अक्षदा चव्हाण हिने दिलेल्या फिर्यादीनुसार बेलवंडी पोलिस स्टेशनला भाग ५ गु.र.न. ३३१/२०२० भा.द.वि. ३०२, १४३, १४७, १४८, १४९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. दाखल करण्यात आलेल्या फिर्यादीत संशयीत आरोपी म्हणून अक्षदा चव्हाण हिने अक्षय उंबन्या काळे, मिथून उंबन्या काळे व इतर चार ते पाच अनोळखी इसम अशांची नावे दिली. जुन्या वादाच्या कारणावरुन या सर्व संशयीतांनी नातीक कुंज्या चव्हाण, श्रीधर कुंज्या चव्हाण, नागेश कुंज्या चव्हाण व लिंब्या हाबऱ्या काळे अशा चौघांची धारदार शस्त्राने छातीवर, पोटावर वार करुन हत्या केल्याचे अक्षदा चव्हाण हिने फिर्यादीत म्हटले. एकाच वेळी चार जणांची सामुहिक हत्या झाल्याची घटना अहमदनगर जिल्हयाचे पोलीस अधिक्षक अखिलेश कुमार सिंह यांनी गांभीर्याने घेतली. स्वत: पोलिस अधिक्षक अखिलेश कुमार सिंह यांनी आपले सहकारी अप्पर पोलिस अधिक्षक डॉ. सागर पाटील, कर्जत उप विभागीय पोलिस अधिकारी संजय सातव, स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. दिलीप पवार, बेलवंडी पोलिस स्टेशनचे पो.नि. दौलत जाधव अशांसह घटनास्थळी भेट देवून पाहणी केली. तपासकामी त्यांनी अधिकारी वर्गास योग्य त्या सुचना दिल्या. गुन्हा घडला त्याठिकाणी बारकाईने निरिक्षण केल्यानंतर घटनास्थळाच्या आजुबाजूला केलेल्या चौकशीत व फिर्यादी महिलेने दिलेल्या माहितीत पोलिस अधिक्षक अखिलेश कुमार सिंह यांना तफावत आढळून येत होती. फिर्यादी काहीतरी चुकीची माहिती देवून आपली दिशाभूल तर करत नाही अशी शंका उपस्थित सर्वच अधिकारी वर्गाला येत होती. या गुन्ह्याच्या पुढील तपासकामी अहमदनगर स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि.दिलीप पवार, बेलवंडी पोलिस स्टेशनचे पो.नि. अरविंद माने तसेच श्रीगोंदा पोलिस स्टेशनचे पो.नि. दौलत जाधव अशा तिघा अधिकाऱ्यांच्या निगरानीखाली वेगवेगळे तपास पथक तयार करुन ते तपासकामी रवाना करण्यात आले. तपास पथकाने विविध वेशभुषेत वेशांतर करुन आजुबाजुला कानोसा घेत तपास सुरु केला. चौकाचौकात जावून लोकांच्या चर्चेतून काही माहिती घेण्याचा प्रयत्न केला. मयताच्या इतर नातेवाईकांना विश्वासात घेवून विचारपुस करण्यात आली. त्यात पोलिस पथकाला असे समजले की सदरचे हत्याकांड हे मयत व त्यांच्या साथीदारांनी स्वस्तात सोने देण्याच्या बहाण्याने जळगावच्या महिला व पुरुषांना ग्राहक म्हणून बोलावले होते. ग्राहकांना खात्री पटण्यासाठी काही प्रमाणात खरे सोने देवून चार लाख रुपयात अडीचशे ग्रॅम सोने खरेदी विक्रीचा व्यवहार ठरला होता. ठरल्यानुसार गुरुवार २० ऑगस्ट रोजी दुपारी चार वाजेच्या सुमारास जळगाव येथील महीला व तीचे साथीदार असे सर्वजण विसापूर फाटयावर सोने खरेदी साठी आले होते. घटनेच्या वेळी मयत व सोन्याचे खरेदीदार यांच्यात झटापट झाली. मयतांनी ग्राहकांना लुटण्याचा प्रयत्न केला होता. त्यामुळे आपले दागिने, पैसे, मोबाइल व जीव वाचवण्यासाठी एकाने चाकूने मयतांना ठार केले होते. घटनास्थळावर पोलिसांना बॅंकेचे एक एटीएम कार्ड मिळाले होते. ते एटीएम कार्ड जळगावचे असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे या हत्येचा संबंध जळगावशी असल्याचे स्पष्ट झाले होते. अहमदनगर जिल्हयाचे पोलिस अधिक्षक अखिलेश कुमार सिंह यांनी जळगावचे पोलिस अधिक्षक डॉ. पंजाबराव उगले यांच्याशी संपर्क साधून याबाबतची माहिती देत सहकार्याची मागणी केली. त्यानुसार पुढील तपासकामी अहमदनगर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरिक्षक दिलीप पवार व जळगाव स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. बापू रोहोम यांच्यात संवाद झाला. दोघा पोलिस निरिक्षकांनी आपापसात केलेल्या संवादातून पुढील तपासकामाला वेग आला. जळगाव स्थानिक गुन्हे शाखेचे बापू रोहोम यांनी तांत्रीक पद्धतीने तपास केला असता २० ऑगस्ट रोजी जळगावहून अहमदनगर जिल्हयातील श्रीगोंदा तालुक्यातील विसावा फाट्यावर गेलेले सर्व जण हे जळगाव शहरातील हरिविठ्ठल नगरातील रहिवासी असल्याची माहिती पुढे आली. अहमदनगर जिल्हयातून श्रीगोंदा पोलिस स्टेशनचे स.पो.नि.राजेंद्र सानप, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस उप निरिक्षक गणेश इंगळे, बेलवंडी पोलिस स्टेशनचे उप निरिक्षक बोराडे, पो.हे.कॉ. सुनिल चव्हाण, अंकूश ढवळे, विजयकुमार वेठेकर, बाळासाहेब मुळीक, पोलिस नाईक संदीप पवार, संतोष लोढे, विशाल दळवी, रवि सोनटक्के, विश्वास बेरड, पो.कॉ.संदीप दरंदले, विजय घनेधर, मच्छिन्द्र बर्डे, कमलेश पाथरुट, शिवाजी ढाकणे, रविन्द्र धुंगासे, रोहीत मिसाळ, महिला पोलिस नाईक सिरसेना काळे, चालक पो.हे.कॉ. संभाजी कोतकर, बाळासाहेब भोपळे, देविदास काळे, भगवान धुळे आदींचे पथक जळगावला दाखल झाले. त्यांनी सर्वप्रथम पोलिस अधिक्षक डॉ. पंजाबराव उगले यांची भेट घेतली. त्यानंतर डॉ. उगले यांच्या माध्यमातून त्यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. बापू रोहोम यांची भेट घेतली. पो.नि. बापू रोहोम यांनी आपले अनुभवी व शहराची चांगल्या प्रकारे माहिती असलेले माहितगार सहकारी एकत्र बोलावले. त्यात सुधाकर अंभोरे, अश्रफ शेख, संजय सपकाळे, विजयसिंग पाटील, जितेंद्र पाटील, अलका शिंदे यांचा समावेश केला. या सर्व पथकाच्या सोबत अहमदनगर जिल्ह्यातून आलेल्या पथकाला तपासकामी रवाना केले. या पथकाने तहानभुक विसरुन दिवसभर तपासकामी हरिविठ्ठल नगर परिसर पिंजून काढला. दिवसभर शोध मोहीम राबवून नरेश सोनवणे, आशाबाई सोनवणे, कल्पना सपकाळे, प्रेमराज पाटील व योगेश ठाकुर यांना ताब्यात घेतले. आम्ही सोने विकत घेण्यासाठी अहमदनगर जिल्ह्यात गेलो होतो मात्र खून आम्ही केला नाही असा पाढा त्यांनी वाचण्यास सुरुवात केली. मात्र पोलिसी खाक्या दाखवल्यानंतर सर्वांनी आपला गुन्हा कबुल करत सर्व घटनाक्रम कथन केला. अहमदनगर येथून आलेल्या पथकाच्या ताब्यात सर्व पाचही संशयीत आरोपींना देण्यात आले. त्या पाचही जणांना घेवून अहमदनगरच्या पथकाने त्यांना तेथील पोलिस अधिक्षक अखिलेश कुमार सिंह यांच्या समोर हजर केले. तेथे पुन्हा त्यांची सखोल चौकशी करण्यात आली. २० ऑगस्ट रोजी दुपारी जळगाव येथून पाचही जण अहमदनगर जिल्हयाच्या श्रीगोंदा तालुक्यातील विसापूर फाटयाजवळ गेले होते. स्वस्तात सोने खरेदीच्या लालसेने सर्व जण गेले होते. मात्र त्याठीकाणी त्यांची लुटमार झाली तसेच त्यांच्यावर जीवघेणा हल्ला झाला. या हल्लयात हल्लेखोर तिघे भाऊ आणि त्यांचा सहकारी असे चौघे जण जखमी व मृत्युमुखी पडले. सोन्याचा मोह अटक करण्यात आलेल्या पाचही जणांना जसा महागात पडला तसा हल्लयात मरण पावलेल्या चौघांना तर चांगलाच महाग पडला. त्यांना तर थेट यमसदनी जावे लागले. मयत चौघे जण व त्यांचे नातेवाईक तसेच फिर्यादी अक्षदा यांनी कल्पना सपकाळे या महिलेकडून २,९५,००० रुपये मोजून घेतल्यानंतर चौघा मयतांनी मोठ्याने देवून टाका, देवून टाका असे ओरडण्यास सुरुवात केली. देवून टाका असे म्हटल्याबरोबर लपून बसलेले इतर सर्वांनी जळगावच्या सर्वांवर हल्ला करण्यास सुरुवात केली. दोन्ही बाजूच्या हल्लयात नातीक, श्रीधर, नागेश व लिंब्या असे चौघे मृत्यूमुखी पडले. या गुन्ह्यातील मुख्य हल्लेखोर नरेश जगदिश सोनवणे, कल्पना किशोर सपकाळे, आशाबाई जगदिश सोनवणे, प्रेमराज रमेश पाटील सर्व रा. सिध्दार्थ सोसायटी, तडवी गल्ली, हरी विठ्ठल नगर यांना अटक करण्यात आली. त्यांना न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्यांना सुरुवातीला पोलिस कोठडी सुनावली. या गुन्ह्याचा पुढील तपास कर्जत उप विभागाचे उप विभागीय पोलिस अधिकारी संजय सातव हे करत आहेत. स्वस्तात सोने देण्याचे आमिष दाखवून बोलावून जवळची रोख रक्कम, सोन्याचे दागिने असा एकूण ३ लाख १५ हजार रुपयांचा एवज दरोडा टाकून चोरुन नेल्याप्रकरणी बेलवंडी पोलिस स्टेशनला स्वतंत्रपणे नोंदवण्यात आली. सदर फिर्याद बेलवंडी पोलिस स्टेशनला कल्पना सपकाळे या महिलेच्या फिर्यादीनुसार गु.र.नं. ३४१/२०२०, भा.द.वि. कलम ३९५ नुसार दाखल करण्यात आली. या गुन्ह्याचा पुढील तपास बेलवंडी पोलिस स्टेशनचे पो.नि.अरविंद माने करत आहेत. अहमदनगर पोलिस अधिक्षक अखिलेश कुमार सिंह यांचे मार्गदर्शनाखाली अप्पर पोलिस अधिक्षक डॉ. सागर पाटील, कर्जत उप विभागीय पोलिस अधिकारी संजय सातव, स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि.दिलीप पवार, बेलवंडी पोलिस स्टेशनचे पो.नि. अरविंद माने, श्रीगोंदा पोलिस स्टेशनचे पो.नि. दौलत जाधव यांनी हा तपास पुर्ण केला. मात्र त्यांची ही कारवाई जळगाव स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. बापू रोहोम व त्यांच्या सहकार्याने पुर्णत्वाला गेली. या पथकात पो.हे.कॉ.सुधाकर अंभोरे. अश्रफ शेख, संजय सपकाळे, विजयसिंग पाटील, शरद भालेराव, जितेंद्र पाटील, महिला पोलिस नाईक अलका शिंदे यांच्या अनमोल परिश्रमाने फळाला लागली. स्वस्तात सोने विक्री बाबत कोणत्याही व्यक्तीचा फोन आल्यास तात्काळ त्या क्रमांकाची माहीती पोलीसांना द्यावी. तसेच सोने खरेदीस बळी पडू नये असे आवाहन पोलिस दलाकडून या निमीत्ताने करण्यात आले आहे.

## शेतीचा वाद प्राणावर बेतला...

झाली होती. या गट नबंर ५२चा वाद हा न्यायालयात जाऊन पोहचला होता. गोपीनाथ आणि सीताराम हे दोघे ही या गटनंबरच्या कागदपत्राच्या अधारे आपला हक्क सांगत होते. त्यातच तसे या गटनंबरमध्ये काहीच येत नव्हते.ते पडीकच होते. त्यात गवत उगवत होते. ते गवत कधी गोपीनाथ तर कधी सीताराम याचे कुंटूंब काढून नेत होते. त्यांची उर्वरीत शेतजमीन ही ऊस पिकाची असल्याने त्यातून त्याना उत्पन्न मिळत होते.त्याची शेतजमीन ही भोगावती नदी काठाला असल्याने त्याना पाण्याची काही कमतरता नव्हती. ऊसाच्या नगदी पिकामुळे त्याची अर्थिक परिस्थीती ही सधन बनली होती. त्यामुळे वाकरेकर कुटूंबियांना गावात मान होता. त्याच्या शब्दाला किंमत होती. परंतु त्याच्याही भाऊबंदात गट नंबर ५२च्या शेतीच्या हिस्सायावरून वाद विवाद होत होता. त्याचा वाद काही केल्या मिटत नव्हात. सीताराम वाकरेकर आणि गोपीनाथ वाकरेकर यांच्या कुटुंबातील सदस्यांच्या संख्या जास्त होती. त्यामुळे त्या दोन्ही कुंटुंबात खुन्नसीपणा वाढला होता. त्याच्या या शेत जमीनीचा वाद कोल्हापूर येथील कोर्टात वर्षानु वर्ष चालु होता.हा वाद न्यायालयाच्या कक्षेत ही अजून मिटलेला नव्हता. कोर्टाच्या तारखेला त्या दोघांच्या कुटुंबातील सीताराम वाकरेकर आणि गोपीनाथ वाकरेकर हे कुंटूंब प्रमुख म्हणून जात होते. त्या दोघांच्या ही कागदपत्रात गट नं.५२चा हिस्सा हा वडिलोपार्जीत असल्याचे दाखविण्यात आले होते.त्यात त्या दोघाची ही नांवे दिसत होती. परंतु पुढे त्या कागदपत्रात फेरफार झाल्याने मुळ कागदपत्रात तफावत दिसून येत होती. त्याच्या पिढीने तोंडीच हिस्सेवारी करून वाटणी केलेली होती. परंतु ती वाटणी दोघांच्याही मनासारखे झाली नव्हती. दोघेही त्या जमीनीवरती आपआपल्या कडील कागदपत्रावरून आपला हक्क सांगत होते. त्यातूनच हा वाद न्यायालयात गेला होता. तेथे ही अजून त्यावर तोडगा निघालेला नव्हता.गट नं.५२मधील शेतजमीनीत दोघांच्याही कुंटूंबाची वहिवाट होती. त्यातूनच ते तेथील गवत काढत होते. सीताराम आणि गोपीनाथ हे दोघे ही आता वयस्कर झाले असल्याने त्याच्या पुढच्या पिढीत हा वाद विकोपाला गेला होता. या कारणातूनच त्याच्यातील महिलांच्यात ही सारखे भांडणे होत होती. दोन्ही कुंटूंबातील महिला गप्प बसत नव्हत्या. चालु वर्षी ऑगस्ट महिन्यात पावसाचा जोर पश्चिम महाराष्ट्रात वाढला होता. त्या पावसाने गवत ही जास्तच उगवले होते. रविवार नेहमी प्रमाणे दुपारच्या सुमारास गोपीनाथचा मुलगा आदिनाथ हा त्या वादग्रस्त शेतजमीनीतील गवत कापण्यासाठी गेला होता. तेथे सिताराम वाकरेकर हे पत्नी सरिता वाकरेकरसह तेथे आले होते. त्या दोघांनी ही तेथे गवत कापत असलेल्या आदिनाथ याला दाब देऊन यातील गवत कापू नकोस. हे गवत आमच्या वाटणीचे आहे. असे म्हणून वाद घालु लागले. त्यावेळी आदिनाथच्या हातात गवत कापण्याचा विळा होता. तो विळा घेऊन नात्याने काका काकु लागत असलेल्या सिताराम आणि सरिता याच्या अंगावर धावून जाऊ लागला.त्यावेळी सिताराम याच्या बाजुकडील अजित वाकरेकर, अकुंश वाकरेकर, कृष्णांत वाकरेकर, देवाजी वाकरेकर, विष्णु वाकरेकर, विक्रम वाकरेकर, सरिता वाकरेकर आणि शारदा वाकरेकर यांनी आदिनाथ याला आपल्याकडील काठयांनी मारहाण करायला सुरूवात केली होती. आपल्या मुलाला सिताराम वाकरेकर आणि त्याच्या भावकीतील लोक मारहाण करत असल्याचे बघुन गोपीनाथ वाकरेकर आणि महिपती वाकरेकर, ज्ञानु वाकरेकर, नामदेव वाकरेकर, साहिल वाकरेकर, भरत वाकरेकर, गोपीनाथची बायको वालुबाई वाकरेकर, छाया वाकरेकर सुनंदा वाकरेकर, शरद वाकरेकर, गोपीनाथचे सांगरूळ येथील जावाई लवटे आणि नंदावाळ येथील अनिल हे ही धावत पळत आले होते. त्याच्या ही हातात काठया होत्या. ते येत असल्याचे बघुन सिताराम वाकरेकर कडील लोक ही जास्तच आक्रमक झाले होते. त्यांनी आदिनाथ याला जास्तच मारहाण करायला सुरूवात केली होती. ते येईपर्यत त्यांनी आदिनाथ च्या डोक्यावर,पाठीवर काठयांनी मारहाण करून त्याला खाली पाडले होते. त्याच्या मारहाणीने तो आपल्या हातातील विळा बाजुला टाकून जमीनीवर निपचिप पडला होता. हे बघुन गोपीनाथचे लोक ही आपला एक इंच ही हिस्सा सोडायचा नाही, त्यासाठी रक्ताचे पाट वाहिले तरी चालतील त्याना सोडु नका असे म्हणत गोपीनाथ वाकरेकरच्या कडील लोक ही त्याच्यावर तुटून पडले होते. शेतात धुमश्चक्री चालली होती.प्रत्येकजण दिसेल त्याला आपल्या हातातील काठीने मारहाण करत होता. त्यात महिलांचा ही सहभाग होता.त्या ही एकमेकींवर तुटून पडल्या होत्या. शिव्यांची लाखोली वाहिली जात होती. कुणाचे कुणाला काहीच समजत नव्हते. तर बाजुलाच रक्तबंबाळ अवस्थेत आदिनाथ पडला होता. तो पाणी, पाणी म्हणत होता. त्याची गंभीर अवस्था बघून सितारामच्या कडील लोक बघुन घेण्याची भाषा करत आणि शिव्या देत तेथून त्यांनी काढता पाय घेतला होता. काही वेळाने गोपीनाथ वाकरेकरकडच्या लोकांनी गावातील एक गाडी बोलवून गंभीर जखमी असलेल्या आदिनाथला उचलून कोल्हापूर येथील एका खाजगी दवाखान्यात आणले होते. त्यांची गंभीर अवस्था बघुन त्या डॉक्टरांनी त्याच्यावर उपचार सुरू केले होते. परंतु त्याचा उपचाराला प्रतिसाद मिळत नव्हता. उपचारा दरम्यानच त्याचा मृत्यु झाला होता. या घटनेची माहिती करवीर पोलीस स्टेशनला देण्यात आली होती. पोलीसांनी या घटनेची गंभीर दखल घेऊन दोन्ही कडच्या गटातील संशयीत लोकांना ताब्यात घेतले होते. या घटनेची परस्पर फिर्याद करवीर पोलीस स्टेशनला दाखल करण्यात आली होती. आदिनाथ वाकरेकर याच्या खून प्रकरणी फिर्यादी गोपीनाथ वाकरेकर याच्या फिर्यादीवरून पोलीसांनी सिताराम वाकरेकर, अजित वाकरेकर, अकुंश वाकरेकर, कृष्णात वाकरेकर, विलास वाकरेकर, देवाजी वाकरेकर विष्णु वाकरेकर, विक्रम वाकरेकर, अरूण वाकरेकर, सरिता सिताराम वाकरेकर आणि शारदा वाकरेकर याच्या विरोधात भा.दं.वी.कलम ३०२ प्रमाणे आणि इतर कलमा प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला. पोलीसांनी त्याना ताब्यात घेऊन त्याच्यकडे या गुन्हयाची चौकशी केली असता त्यांनी आपला गुन्हा मान्य करून तो का आणि कशासाठी केला याची माहिती देऊन त्यांनी गोपीनाथ वाकरेकर, काशिनाथ वाकरेकर, ज्ञानु वाकरेकर, नामदेव वाकरेकर, साहिल वाकरेकर, भरत वाकरेकर, वालुबाई वाकरेकर, शरद वाकरेकर छाया वाकरेकर, सुनंदा वाकरेकर, जावाई लवटे आणि अनिल याच्या विरोधात ही गुन्हा दाखल केला. या घटनेत दोन्ही गटातील ८जण गंभीर जखमी झाले होते.सिताराम वाकरेकर याच्या फिर्यादीवरून करवीर पोलीसानी या सर्वाच्या विरोधात कलम ३०७ प्रमाणे गुन्हा दाखल करून परस्पर विरोध गुन्हा दाखल झालेल्या या संशयीतांना ताब्यात घेऊन अटक करण्यात आले होते. पोलीसांनी त्याना कोल्हापूर येथील मा.कोर्टासमोर उभे केले असता. मा.न्यायालयाने या सर्वाना पोलीस कोठडी सुनावली होती.पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेल्या काठया आणि विळा जप्त केले होते. तसेच घटनास्थळी जावून पाहणी केली होती. या घटनेने आरेवाडी गावातील वातावरण चिघळले होते. म्हणून करवीर पोलीसांनी गावात चोख बंदोबस्त लावला होता. या घटनेचा पुढील तपास करवीर पोलीस करत आहेत.शेतजमीनचा वाद हा विकोपला गेली की तो वेगळे वळण घेत असतो. त्यातून अशा गंभीर घटना घडत असतात. खरे तर हा वाद न्याय प्रविष्ट असल्याने दोन्ही कडच्या लोकांनी सयंम दाखविणे गरजचे होते परंतु त्या शेत जमीनीतील एक इंच ही कुणाला सोडायचे नसल्याने ते जास्तच आक्रमक झाले होते.एकमेकांना बघुन घेण्याची भाषा आणि संपविण्याचे आव्हान करत होते. त्यातून नेमके रविवारी सकाळी गवत कापायला गेलेल्या आदिनाथला संपविण्याची संधी सिताराम याच्याकडील लोकाना सांगून आली. आणि त्यांनी त्या संधीचा फायदा घेत या वादातून खूनासारखी घटना जाणून बजून घडवून आणली होती. म्हणूनच संयम दाखवून यातून मार्ग काढता आला तर तो काढायलाच हवा नाही तर शेतजमीनीच्या वादातून अशा प्रकारच्या खूनासारख्या घटना घडत राहतील यात काही शंका नाही.

पान ८ वरून...

## औद्योगिक क्षेत्रांमधील रुग्णांसाठी बोईसर...

औद्योगिक सुरक्षा व आरोग्य वसई, उपायुक्त कामगार बोईसर, उप अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ बोईसर, उपप्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ तारापूर -१ व २ तसेच विराज प्रोफाइल प्रा. लि. टाटा स्टील प्रा. लि. जेएसडब्ल्यू प्रा.लि., लुपिन लिमिटेड बोईसर, निऑन फाउंडेशन पालघर, आरती ड्रग्स कम्पनी, अध्यक्ष, तारापूर औद्योगिक व्यवस्थापन असोसिएशन (टिमा) इत्यादी सहभागी झाले होते. सदरच्या सुविधा निर्माण करण्यासाठी उपविभागीय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. औद्योगिक व्यवस्थापनाने या सुविधा निर्माण करावयाच्या असून संपूर्ण सहकार्य करण्याबाबत जिल्हाधिकारी यांनी आवाहन केले आहे. त्याच बरोबर औद्योगिक व्यवस्थापनाकडे असणाऱ्या म्बुलन्स कोव्हीड रुग्णांच्या सेवेसाठी बोईसर येथे उपलब्ध करून द्याव्यात, अशी सूचनाही यावेळी जिल्हाधिकारी डॉ. कैलास शिंदे यांनी केली. यावेळी उपजिल्हाधिकारी डॉ.किरण महाजन, जिल्हा शल्य चिकित्सक कांचन वानेरे व इतर अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

## देवणी तहसिल कार्यालयात दहावी...

गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आर.पी.जाधव यांनी तर आभार राजेंद्र वजनम यांनी मानले. कार्यक्रमास विद्यार्थी, पालक, शाळेचे पदाधिकारी उपस्थित होते. दरम्यान सत्कार कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना तहसिलदार सुरेश घोळवे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी प्रामाणिक प्रयत्न केल्यास यशाचे शिखर निश्चितच गाठता येते. शैक्षणिक शिक्षणाबरोबरच स्पर्धा परिक्षेची तयारी करणे गरजेचे असल्याचे सांगितले.

31 AUGUST TO 06 SEPTEMBER 2020 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 29/08/2020 8:50 PM Page 1



# सोलापूरमध्ये पोलिसांचा मटक्याच्या अड्ड्यावर छापा

## ● पळून जाताना इमारतीवरुन पडून कामगाराचा मृत्यू ● नगरसेवक सुनील कामाठीसह पोलिसांवरही गुन्हा दाखल

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर शहरात पाच्छा पेठ भागातील अशोक चौक परिसरात मटका जुगाराच्या कंपनीवर छापा टाकण्यास आलेल्या सोलापूर शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांसमोर मटका कंपनीत काम करणाऱ्याने पळून जाण्यासाठी इमारतीवरून उडी मारली. त्यात तो मरण पावला. नगरसेवक सुनील कामाठी व एका पोलिसासह ४० जणांवर जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला परवेझ नुरूद्दीन इनामदार (वय ४२, रा. साईनाथ नगर भाग १, नई जिंदगी, सोलापूर) असे मरण पावलेल्या तरुणाचे नाव आहे. इनामदार हा मटका कंपनीत चिठ्या (बुकी) गोळा करून त्याचा हिशेब ठेवण्याचे काम करीत होता.



सोमवारी दुपारी साडेतीनच्या सुमारास कोंचीकोरवे गल्ली भागात मातृछाया या दुमजली घरामध्ये मोबाइलद्वारे मटका कंपनी सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार सोलापूर शहर गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजय जगताप यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांचे पथक छापा टाकण्यासाठी तिथे गेले. इमारतीजवळ पोलीस पोहोचल्याची चाहूल लागली. त्यावेळी इमारतीतील हॉलमध्ये काहीजण जुगार खेळत होते, तर हिशेब घेत असलेल्या काहीजणांनी हॉलचा पाठीमागील दरवाजा उघडून तेथून उड्या मारुन पळ काढला. त्यावेळी इनामदार यानेही इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरून उडी मारली. इमारतीच्या बाजूला असलेल्या पत्राशेडमुळे तो गंभीर जखमी झाला. ही बाब पाहिल्यानंतर पोलिसांनी व त्याचा साथीदार केदार बोरामणी यांनी त्यास उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले; परंतु उपचारापूर्वीच डॉक्टरांनी त्यास मृत घोषित केले.

सोलापूर शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांसमोरच इनामदार याने उडी मारल्याने नेमके तेथे काय घडले याबाबत काहीच समजू शकले नाही. न्यू पाच्छा पेठ हा परिसर जेलरोड आणि सदर बझार पोलीस ठाण्याच्या हद्दीत येतो. त्यामुळे घटनास्थळ नेमके कोणत्या पोलीस ठाण्याच्या हद्दीत आहे हे न समजल्याने गुन्हे शाखेच्या पोलिसांनी दोन्ही पोलीस ठाण्याच्या पोलिसांना घटनेची माहिती कळवली. घटनेची माहिती मिळताच पोलीस उपायुक्त बापू बांगर, सहायक पोलीस आयुक्त कमलाकर ताकवले, अभय डोंगरे आदी वरिष्ठ अधिकाऱ्यासह जेलरोड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जाफर मोगल आणि त्यांचे अधिकारी कर्मचारी तसेच सदर बझार पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बजरंग साळुंखे आणि इतर अधिकारी कर्मचारी घटनास्थळी हजर झाले; परंतु घटना घडलेली इमारत ही जेलरोड पोलीस ठाण्याच्या हद्दीत येते समजल्याने जेलरोड पोलिसांनी तातडीने पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयाकडे पाठवला. दरम्यान, याप्रकरणी जेलरोड पोलीस ठाण्यात आकस्मिक मयत अशी नोंद करण्यात आली आहे. मटकाप्रकरणी नगरसेवक सुनील कामाठी तसेच पोलीस कर्मचारी स्टीफन स्वामी यांच्यासह ४० जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईच्यावेळी पोलिसांनी २२ जणांना ताब्यात घेतले आहे. घटनास्थळावरून पोलिसांनी मोबाइल हॅन्डसेट,हिशेबाच्या २०० नोंद वह्या, मोटारसायकली असा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला आहे . तर १६ ते १८ जणांनी पलायन केले आहे.

### मटक्यामध्ये पोलीस कर्मचारीही पार्टनर?

**सोलापूर शहर गुन्हे शाखेने मटक्यावर छापा टाकून ४० जणांवर गुन्हा दाखल केला. यामध्ये पोलीस कर्मचारी स्टीफन स्वामी याचाही सहभाग आहे. या मटका व्यवसायामध्ये तो पार्टनर असल्याची शक्यता गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजय जगताप यांनी व्यक्त केली आहे.**

# देवणी तालुक्याचा सुपुत्र आंतरराष्ट्रीय उद्यन्मुख तारा निखळला



**देवणी/प्रतिनिधी**

तालुक्यातील तळेगांव येथील रहिवासी असलेला महाराष्ट्रातील सर्वधिक प्रतिष्ठेचा शिवछत्रपती पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेला आंतरराष्ट्रीय खेळाडू आदित्य तळेगांवकर(कांबळे) यांचे अल्पशा आजाराने वयाच्या (२५) वर्षी निधन झाले. आदित्य अंकुशराव तळेगावकर (कांबळे) याने जागतिक एरोबिक्स स्पर्धेत सहभागी होऊन अनेक देशावर विजय मिळवून भारतीय तिरंगा फडकविला आहे. आदित्य यांनी राष्ट्रीय व जागतिक एरोबिक्स जिम्नॅस्टिक स्पर्धेत आपला विशेष ठसा उमटवला शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त प्रतिभावान जिम्नॅस्ट खेळाडू होता त्यांच्या अकाली जाण्याने क्रीडा क्षेत्रावर शोककळा पसरली आहे.

आदित्य तळेगावकर यांना २०१७ -२०१८ मध्ये शिवछत्रपती पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. आदित्य यांना न्यूमोनिया झाला होता. त्यांना खाजगी रुग्णालयात उपचार सुरू होते परंतु रविवारी त्यांची तब्बेत अचानक खालावली अनेक जीवनसत्वाचा अभाव व वजनही अतिशय कमी झाल्याने त्यांचे शरीर उपचारांना प्रतिसाद देत नव्हते अखेर त्यांची प्राणज्योत मालवली. जगावर अधिराज्य गाजवू पाहणारा उमदा आंतरराष्ट्रीय खेळाडूने अखेर जगाचा निरोप घेतला. अंकुश तळेगांवकर हा मूळचा तळेगाव ता देवणी येथील सर्वसामान्य मंजूर कुटूंबात जन्म झालेला त्यांनी आपल्या मुलाच्या शिक्षणासाठी घर सोडून औरंगाबाद येथे वास्तव्यास गेले त्यांनी मोल मजूरी करीत करीत आदित्य त्याच्या भविष्यासाठी अनेक कष्ट घेतले. रात्रंदिवस ऑटोरिक्षा चालवून आदित्य यांचे शिक्षण पूर्ण केले. आदित्य यांना क्रीडा क्षेत्रात आवड असल्याने अंकुशराव तळेगांवकर यांनी कसल्याच प्रकारे त्यांना काहीच कमी पडू दिले नाही त्यांनी ऑटोरिक्षा चालवून आदित्य यांचा छंद जोपासला होता यांची जाणीव ठेवून आदित्यने आपल्या वडिलांचे महाराष्ट्राचे भारत देशाचे नाव जगाच्या इतिहासात नोंदविले त्या तळेगावकराची भावपूर्ण श्रद्धांजली.

# कृषी क्षेत्रात संशोधनासाठी संस्था निर्माण होणे गरजेचे

## महाराष्ट्रात पिकेल ते विकेल या धर्तीवर शेतीक्षेत्रात काम सुरु

### केंद्रीय कृषीमंत्र्यांसमवेतच्या बैठकीत मुख्यमंत्र्यांची माहिती



**मुंबई/प्रतिनिधी**

कृषीप्रधान देशात शेती ही आपली संपत्ती आहे. तिचे संवर्धन करण्याची आपली जबाबदारी असून शेतकऱ्याला सन्मान देतानाच कृषी क्षेत्रात संशोधन करणाऱ्या संस्था निर्माण करण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. महाराष्ट्रात पिकेल ते विकेल या धर्तीवर शेती क्षेत्रात काम सुरू असल्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आज येथे सांगितले.

केंद्र शासनाने शेती क्षेत्रामध्ये हाती घेतलेल्या सुधारणांबाबत आढावा घेण्यासाठी केंद्रीय कृषीमंत्री नरेंद्र सिंग तोमर यांनी आज व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे विविध राज्यातील मुख्यमंत्री, कृषीमंत्री यांच्याशी संवाद साधला. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, कृषीमंत्री दादाजी भुसे त्यामध्ये सहभागी झाले होते. मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव आशिष कुमार सिंह, प्रधान सचिव विकास खारगे, कृषी विभागाचे सचिव एकनाथ डवले आदी यावेळी उपस्थित होते. शेती क्षेत्राच्या सुधारणेसाठी केंद्र शासनाने आणलेल्या नविन अध्यादेशाचे स्वागत करून मुख्यमंत्री श्री. ठाकरे म्हणाले, शेती आणि शेतकरी आपली संपत्ती आहे. कृषी क्षेत्रातील सुधारणांच्या माध्यमातून शेतकरी कल्याणाचे स्वप्न प्रत्यक्षात साकारण्यास मदत होईल. प्रधानमंत्री पीक विमा योजनेसाठी राज्याचा हिस्सा पूर्वीप्रमाणे ५० टक्के करण्यात यावा अशी मागणी मुख्यमंत्र्यांनी यावेळी केली. विमा कंपन्यांची जिल्हास्तरावर कार्यालये असावीत जेणेकरून शेतकऱ्याला विमा प्रतिनीधीशी संपर्क साधता येईल. बँकांकडून शेतकऱ्यांना वेळेवर कर्जपुरवठा होण्यासाठी केंद्र शासनाने उपाययोजना करण्याची मागणी यावेळी मुख्यमंत्र्यांनी केली.

बाजारपेठेचे सर्वेक्षण करून ज्या मालाला बाजारपेठ आहे त्याचे उत्पादन घेण्यासाठी शेतकऱ्यांना प्रवृत्त करण्यासाठी पिकेल ते विकेल या धोरणानुसार राज्यात काम सुरू असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. राज्यात कृषी विद्यापीठे आहेत मात्र कृषीआधारीत संशोधनासाठी संस्था निर्माण करण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. नाफेड मार्फत कडधान्य आणि डाळींच्या खरेदीसाठीची २५ टक्क्यांच्या मर्यादेची अट रद्द करावी अशी मागणीही त्यांनी यावेळी केली.

### कृषी क्षेत्रात पायाभूत सुविधांसाठी १ टक्का व्याजदराने कर्ज द्यावे- कृषीमंत्री भुसे



कृषी क्षेत्रात पायाभूत सुविधांसाठी शेतकऱ्यांना, शेतकरी उत्पादक कंपन्यांना आणि शेतकरी गटांना १ टक्का व्याज दराने कर्ज देण्याची मागणी कृषीमंत्री दादाजी भुसे यांनी यावेळी केली. राज्य शासनाने फळपिक विम्याचा सुधारीत प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविला आहे त्याला मान्यता देण्यात यावी, अशी मागणीही भुसे यांनी केली.

# कोंकण विभागीय आयुक्तपदी अण्णासाहेब मिसाळ

**नवी मुंबई/प्रतिनिधी**



महाराष्ट्र शासनाने आज काढलेल्या भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांच्या बदलीच्या आदेशात कोंकण विभागाच्या विभागीय आयुक्त (महसूल) पदावर अण्णासाहेब मिसाळ (भाप्रसे) यांची बदली करण्यात आली आहे. अण्णासाहेब मिसाळ यांनी आज रोजी कोंकण विभागीय आयुक्त (महसूल) पदाचा कार्यभार स्वीकराला आहे. मिसाळ हे यापूर्वी नवीमुंबई महानगरपालिका आयुक्त म्हणून कार्यरत होते. अण्णासाहेब मिसाळ यांचा जन्म १३ जून १९६१ साली झाला असून त्यांनी मराठवाडा विद्यापीठातून बीएससी (ग्रीकल्चर) व एमएसी (ग्रीकल्चर) केले आहे. श्री मिसाळ यांनी हेगच्या इन्टिट्यूट ऑफ सोशल स्टडीज कडून डेव्हलपमेंट स्टडीज ची पदवी प्राप्त केली आहे. २००४ सालच्या भाप्रसे बॅचमधून अधिकारी झाल्यानंतर उप आयुक्त (महसूल) कोकण विभाग या पदाचा कार्यभार त्यांनी सांभाळला. २०१४ ते २०१६ या कालावधीत त्यांनी जिल्हाधिकारी धुळे या पदावर उत्कृष्ट काम केले. मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ या पदावर ते २०१६ ते २०१९ या कालावधीत ते कार्यरत होते. आज मिसाळ यांनी विभागीय आयुक्त पदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर कोकण विभागात पर्यटन, पर्यावरण,फलोत्पादन, आणि मत्स्यव्यवसाय याकडे भर असेल असे त्यानी सांगितले.

## थोडक्यात वृत्तांत

### देवणीत देशी दारूच्या बॉक्सचा साठा जप्त; पोलीस उपअधिक्षकांची कारवाई

देवणी : तालुक्यातील इस्मालवाडी येथे पोलीस उपविभागीय अधिकारी निलंगा निलेश देशमुख यांच्यासह टीमने छापा टाकून ३ लाख ४६ हजार ९४४ रुपये किमत असलेले १३९ देशी दारूच्या बॉक्सचा साठा जप्त करुन देवणी पोलीस ठाण्यात दोघांवर गुन्हा नोंद केल्याची घटना बुधवार दि. २६ ऑगस्ट रोजी रात्री साडेनऊ वाजण्याच्या सुमारास घडली आहे. याबाबत पोलीसांकडून मिळालेली माहिती अशी की देवणी तालुक्यातील इस्मालवाडी येथे पोलीस उप विभागीय पोलीस अधिकारी निलेश देशमुख यांनी टाकलेल्या छाप्यात ज्ञानेश्वर बिरादार यांच्या मालकी पत्राच्या शेडमध्ये संत्रा देशी दारू ११९ बॉक्स व भिंगरी देशी दारू २० बॉक्स मिळून आले ज्याची बाजारी किम्मत ३ लाख ४६ हजार ९४४ रुपये इतका मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलीस उपनिरीक्षक मारोती नाटकरे निलंगा यांच्या फिर्यादीवरून देवणी पोलीस ठाण्यात आरोपी पांडुरंग शिवाजी बिरादार रा. वलांडी व रोहिदास सुर्यवंशी रा.कवठाळ या दोंघावर गुन्हा नोंद झाला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक पी.जी. शिनगारे हे करीत आहेत.

### राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार प्राप्त खेळाडूंचे मुख्यमंत्री ठाकरे यांच्याकडून अभिनंदन

मुंबई : क्रीडा क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीसाठी राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार प्राप्त खेळाडुंचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी अभिनंदन केले आहे. तसेच हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांना जयंती निमित्त अभिवादन करतानाच, राज्यातील क्रीडा जगताला राष्ट्रीय क्रीडा दिनाच्याही शुभेच्छा दिल्या आहेत. केंद्रीय युवा कल्याण आणि क्रीडा मंत्रालयाच्यावतीने जाहीर करण्यात आलेल्या या पुरस्कारांचे आज भारताचे राष्ट्रपती राम नाथ कोविंद यांच्या हस्ते राष्ट्रपती भवन येथून दूरदृश्य प्रणालीद्वारे वितरण करण्यात आले.यात राजीव गांधी खेलरत्न पुरस्कार क्रिकेटपटू रोहित शर्मा, महिला कुस्तीपटू विनेश फोगाट, टेबल टेनिसपटू मनिका बत्रा, पॅरालिम्पिकपटू एम. थंगवेलू, हॉकीपटू रानी रामपाल यांना देण्यात आला. विविध क्रीडा प्रकारातील पुरस्कार प्राप्त महाराष्ट्रातील खेळाडू असे - अर्जुन पुरस्कार-अजय सावंत (घोडेस्वारी), राहूल आवारे (कुस्ती), सारिका काळे (खो खो), दत्तू भोकनाळ (नौकानयन), मधुरिका पाटकर (टेबल टेनिस), सुयश जाधव (पॅरास्विमिंग) आणि ध्यानचंद पुरस्कार प्रदीप गंधे (बॅडमिंटन), तृप्ती मुरगुंडे (बॅडमिंटन). तर लक्ष्य इन्स्टिट्यूट (पुणे) आणि इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ स्पोर्टस् मॅनेजमेंट (मुंबई) यांना राष्ट्रीय खेल प्रोत्साहन पुरस्कार मिळाला आहे. महाराष्ट्रातील या खेळाडू आणि संस्थांनी आपल्या उत्कृष्ट क्रीडा कामगिरीने राज्याच्या क्रीडा गौरवात अभिमानास्पद भर घातली आहे, असे नमूद करून मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी या सर्वांचे तसेच देशातील अन्य राज्यातील द्रोणाचार्य पुरस्कार प्राप्त प्रशिक्षक, अर्जुन पुरस्कार, ध्यानचंद पुरस्कार आणि तेनसिंग नॉरगे राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार प्राप्त खेळाडूंचेही अभिनंदन केले आहे.

### माढ्यात महिलेच्या अंगावर पेट्रोल ओतून पेटवले, आठ जणांना अटक

सोलापूर : सोलापूर जिल्ह्यातील माढा शहरात लाकडाच्या काठीने मारहाण करीत अंगावर पेट्रोल ओतून पेटवून देऊन एका महिलेचे मृत्यू झाल्याप्रकरणी माढा पोलिसांनी आठ जणांना अटक केली आहे. अविदा जब्बार शिंदे (वय ५०) असे मरण पावलेल्या मृत महिलेचे नाव आहे. मंगळवारी सकाळी सुमा सुभाष शिंदे यांच्या घरासमोर बाजाराला जात असताना सदर महिलेच्या अंगावर पेट्रोल टाकून तिला जाळून मारण्याचा प्रयत्न केला होता. यात ती गंभीर भाजल्याने तिला उपचारासाठी बार्शी येथील एका हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. उपचारा दरम्यान तिचा मृत्यू झाला. सुरवातीला जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी माढा पोलीस ठाण्यात ३०७ कलमान्वये गुन्हा दाखल झाला होता. नंतर त्यामध्ये ३०२ कलमांची वाढ करण्यात आली होती. माळशिरसचे लोकांना बोलावून घेऊन आम्हाला शिवीगाळ का केली? या कारणावरून ही घटना घडल्याचे मृत महिलेचा पती जब्बार भानुदास शिंदे (वय ५५) यांनी दिलेल्या फिर्यादीत सांगितले आहे. आरोपी संजय नबड्या काळे, अरविंद संजय काळे, श्रीकांत सुभाष शिंदे, सुभाष भानुदास शिंदे, मिनाबाई संजय काळे, मंगल अजय पवार, श्रीदेवी अरविंद काळे, पूजा श्रीकांत भोसले, लताबाई सुभाष शिंदे, अजय भालचंद्र पवार तसेच अविनाश परबत शिंदे, भीमा अविनाश शिंदे, रविंद्र जगदीश भोसले यांच्या विरोधात माढा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाले आहे. यातील आठ जणांना अटक करण्यात आली आहे. २६९ /२०२० भादंवि ३०७, १४३, १४७, १४८, १४९, ३२४, ३२३, ५०४, ५०६ बी पी ऍक्ट १३५ प्रमाणे माढा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आली आहे. या घटनेचा अधिक तपास माढा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अमूल कादबाने करीत आहेत.

# टेंभुर्णी पोलिसांनी दहा किलो गांजा पकडला; चौघांना अटक

**सोलापूर/प्रतिनिधी**

सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यातील टेंभुर्णी येथे अवैधरित्या गांजा जवळ बाळगून तो विक्री करण्याकरिता स्विफ्ट कार मधून घेऊन जात असताना टेंभुर्णी पोलिसांनी दहा किलो गांजा कारसह ६ लाख १७ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आली आहे. चार जणांना ताब्यात घेतले आहे. ही कारवाई गुरुवारी २७ ऑगस्ट रोजी कुर्डुवाडी रस्त्यावर ब्रीजखाली करण्यात आली. सर्व आरोपींना माढा न्यायालयाने सहा दिवस पोलीस कोठडी सुनावली आहे. प्रशांत बिभीषण उकरंडे (वय २३), अविनाश चंद्रकांत हलकारे (वय ३०), समाधान दिलीप हलकारे (वय ३०), जासम महम्मद शेख (वय २२, सर्वजण रा. तेरखेडा जि उस्मानाबाद) अशी पोलीस कोठडी मिळालेल्या आरोपीची नांवे आहेत. याबाबत सविस्तर माहिती अशी की टेंभुर्णी पोलिसांना मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी टेंभुर्णी कुर्डुवाडी रोडवर ब्रीजखाली सापळा रचून संबंधित स्विफ्ट कार एम एच ०६ सी बी ३५७३ अडवून कार मधील वरील चार जणांना ताब्यात घेतले. तसेच कारची झडती घेतली असता कारच्या डिक्कीत पोलिसांना प्लास्टिक पिशवी मध्ये ठेवलेल्या ९९ हजार ९५० रुपये किंमतीचा ९ किलो ९५० ग्रॅम गांजा मिळून आला आहे. पोलिसांनी तो जप्त करुन गांजासह पाच लाख रुपये किंमतीचा कार, पंधरा हजार रुपये किंमतीचे तीन मोबाईल हॅंडसेट व दोन हजार सहाशे दहा रुपये रोख रक्कम असा एकूण सहा लाख सतरा हजार एकशे दहा रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केली आहे. आरोपी हा गांजा मुंबई येथे विक्री करण्यासाठी घेऊन जात असल्याचे तपासात समोर आली आहे. ही कारवाई टेंभुर्णी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजकुमार केंद्रे, सहाय्यक पोलीस फौजदार अभिमान गुटाळ, पो हे कॉ भारत नरसाळे, पो ना धनाजी शेळके, पो ना दत्तात्रय वजाळे, चालक पठाण यांनी पार पाडली. टेंभुर्णी मार्गे पुणे, मुंबई व इतर शहरात गांजा, गुटखा यासह अंमली पदार्थ वाहतूक केली जात असून पोलिसांनी याचा कसून तपास करावा अशी मागणी होत आहे. सर्व आरोपींना माढा न्यायालयाचे प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी एस एम काझी यांनी व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे तीन सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला आहे. या गुन्ह्यांचा अधिक तपास टेंभुर्णी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजकुमार केंद्रे करीत आहेत.




# यूपीएससी परीक्षेतील यशस्वी उमेदवारांचा विधानमंडळातर्फे गौरव

**मुंबई/प्रतिनिधी**

केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या नागरी सेवा परीक्षा- २०१९ मध्ये महाराष्ट्रातून यशस्वी झालेल्या उमेदवारांचा महाराष्ट्र विधानमंडळाच्या वतीने गौरव समारंभ आयोजित करण्यात आला आहे. मंगळवार, दिनांक २५ ऑगस्ट रोजी सायंकाळी ४ वाजता विधानभवनातील मध्यवर्ती सभागृहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती रामराजे नाईक-निंबाळकर, विधानसभा अध्यक्ष नाना पटोले, मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजित पवार, विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, महसूलमंत्री बाळासाहेब थोरात, संसदीय कार्यमंत्री ड. अनिल परब, विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते प्रविण दरेकर, विधानसभेचे विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांच्यासह महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष सतिश गवई, आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. बुद्धिमत्ता, ध्येय, एकाग्रता, अभ्यासू वृत्ती आणि कठोर परिश्रमाच्या बळावर प्रशासकीय सेवेतील सर्वोच्च समजल्या जाणाऱ्या केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा परीक्षेत उज्ज्वल यश मिळवणाऱ्या या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव विधानसभा अध्यक्ष नाना पटोले यांच्या संकल्पनेनुसार महाराष्ट्र विधानमंडळातर्फे प्रथमच करण्यात येत आहे. यावर्षी जवळपास ८० उमेदवारांनी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या या परीक्षेत सुयश प्राप्त करुन महाराष्ट्र राज्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे. विधानमंडळाकडून या यशस्वी उमेदवारांचा गौरव म्हणजे स्वजनाकडून त्यांच्या कर्तृत्वाला दिलेली कौतुकाची दाद असून त्यांच्या भावी उज्ज्वल कारकिर्दीकरिता शुभेच्छा आहेत. या कार्यक्रमासाठी यशस्वी उमेदवार व त्यांच्या कुटुंबियांना निमंत्रित करण्यात आले असून कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे आरोग्य विषयक सूचनांचे पालन करण्यात येईल, अशी माहिती विधानमंडळाचे सचिव (कार्यभार) राजेंद्र भागवत यांनी दिली.

31 AUGUST TO 06 SEPTEMBER 2020 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 29/08/2020 8:50 PM Page 1



# ग्रामीण भागात घरकुल मंजुरीची अफवा!

## आधार प्रमाणीकरणाच्या नावाखाली आर्थिक लूट

**औसा/शिवाजी मोरे**

सध्या औसा तालुक्यात पंतप्रधान घरकुल आवास योजने अंतर्गत ड प्रमाणपत्र भरून आधार कार्ड प्रमाणीकरण करण्याच्या याद्या ग्राम पंचायत कार्यालयामध्ये लावण्यात आल्या होत्या, परंतु त्याचा गैरफायदा घेत तालुक्यात अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात नागरिकाकडून लूट केली जात असल्याचाची चर्चा सध्या सुरू आहे.

याबाबत अधिक माहीती अशी की, प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत ड प्रमाणपत्राचे आधार प्रमाणीकरण करण्यासाठी पंचायत समिती स्तरावरून तसे आदेश प्रत्येक ग्रामपंचायतीला देण्यात आले होते यादीमध्ये नावे असणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला घरातील कुटुंबातील सर्व सदस्यांचे आधार प्रमाणीकरण करणे गरजेचे होते त्यासाठी आधार प्रमाणीकरण करणे हे मुख्य उद्देश होता तो उद्देश बाजूला सारत तालुक्यातील अनेक गावात आधार प्रमाणीकरणाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात लूट केली असल्याचे चित्र दिसून येत असून आधार प्रमाणीकरण करण्यासाठी १०० ते २००रु पये विना पावती फीस घेतल्याची चर्चा सध्या तालुक्यात सुरू आहे. तसेच प्रधानमंत्री आवास योजनेच्या लावण्यात आलेल्या याद्या कशाच्या आहेत व ग्रामपंचायतीला का पाठवण्यात आल्या याबद्दल नागरिकांना व्यवस्थित माहिती मिळत नसल्याने उलटसुलट चर्चा सुरू आहे. मागील वर्ष ते दीड वर्षापूर्वी ज्या लोकांचे नावे पंतप्रधान घरकुल आवास योजने मध्ये आली नव्हती अशा लोकांची नावे यादीमध्ये समाविष्ट करण्यासाठी प्र पत्र डभरून त्यामध्ये समाविष्ट करण्यासाठीचा उपक्रम जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे माध्यमातून सुरू आहे. पण याबाबत नागरिकात चुकीचा संदेश दिला जात असून त्या आडून मोठ्या प्रमाणात काही ग्राम पंचायत माजी सदस्य स्वतःला सामाजिक कार्यकर्ते समजून गरिबांची लूट केली जात आहे.यामध्ये अनेक पात्र व अपात्र असणाऱ्या नागरिकांना यामध्ये घरकुल मिळणार आहे अशी चर्चा सुरू आहेत. अनेकांची नावे यादीमध्ये आली आहेत. एकाच घरातील तीन ते चार व्यक्तींची नावे या यादीमध्ये आहेत. त्यामुळे सर्वांनाच घरे मिळणार का? अनेकांच्या नांवावर नमुना आठ अ नाहीत, जागाही नाहीनुकतेच घरकुल बांधकांम केले आहे, काही अविवाहित आहेत, गावी राहत नाहीत अशी यादीमध्ये नाबे आहेत तर अनेकांना राहण्यासाठी घर नाही अशांना घरकुल मिळणार का? असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. याबाबतीत ग्रामपंचायत मधून व्यवस्थित खुलासा करणे गरजेचे असून यासाठी नागरिकांची धडपड सुरू आहे. अनेक कमी बुध्दीचे राजकीय नेते मंडळींनी आपली पोळी भाजून घेण्यासाठी प्रशासनाने पाठवलेल्या यादयाचा आधार घेत अनेक ठिकाणी मी तुमचे नाव यादी मध्ये घातले असल्याचे आनंदाने सांगत आहेत. परंतु प्रत्यक्षात मात्र यामधून अनेक नागरिकांची नावे पात्र व अपात्र होणार आहेत. त्यामुळे ही यादी अंतिम असून सदरील यादीमध्ये आधार फिटिंग करणे साठी पाठवण्यात आली आहे असे समजते.

### लूट करणाऱ्या विरूद्ध कायदेशीर कारवाई करू

**आधार प्रमाणीकरण करण्यासाठी कसल्याही प्रकारची फीस लागत नाही आणि आधार प्रमाणीकरण करणे हे मोफत करणे बंधकारक आहे.कोणीही कसल्याही प्रकारची फीस घेऊ नये अशा सूचना सर्व ग्राम सेवकांना दिल्या आहेत आणि जर कोणी काही फीस घेत असतील असे निदर्शनास आले तर त्याच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.**

**– सूर्यकांत भुजबळ,**
**गट विकास अधिकारी, पं स औसा**

### आधार प्रमाणीकरणाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात लूट

**तालुक्यातील अनेक गावांमध्ये आधार प्रमाणीकरण करण्याच्या नावाखाली अनेकांनी मोठ्या प्रमाणात नागरिकांची लूट केल्याचे चर्चा सध्या तालुक्यात सुरू असून एक आधार प्रमाणीकरण करण्यासाठी कमीत कमी पन्नास ते शंभर रुपये घेतले असल्याची चर्चा सुरू आहे. तालुक्याती अनेक गावांमध्ये जवळपास चारशे ते पाचशे जणांची यादी प्रधानमंत्री घरकुल आवास योजनेच्या ड प्रपत्र मध्ये आले आहेत. आधार प्रमाणीकरण करण्याच्या नावाखाली लोकसेवकाच्या हास्तकाकडून प्रत्येकी विना पावती ५0 ते १00 रूपय नावधारकाकडून वसुल केले जात आहेत. जवळपास प्रत्येक गावागावातून पन्नास हजार लाख रुपये जमा केले जात आहेत. पैसे घेवून पावती देत नासल्याने प्रशासनाच्या कारभारावर शंका व्यक्त केली जात आसून या व्यवहाराला अभय कोणाचे आहे असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.**

# आमदार अभिमन्यू पवार यांच्या उपस्थितीत औशात घंटानाद आंदोलन



### केंद्र सरकारने मंदिरे उघडण्याचे निर्देश दिल्यानंतर, राज्यातील भाविक व सर्वसामान्य नागरिकांकडून मंदिरे उघडण्याची मागणी

**औसा/प्रातिनीधी**

राज्यातील मंदिरे, गुरुद्वारा, जैन मंदिरासह धार्मिक संस्था उघडण्याच्या मागणीसाठी भाजपच्या वतीने शहरात घंटानादाच्या गजराबरोबरच झोपेत असलेल्या राज्य सरकारला जागे करण्यासाठी औशाचे आमदार अभिमन्यू पवार यांच्या उपस्थितीत औशात हनुमान मंदिरासमोर घंटानाद आंदोलन करण्यात आले यावेळी आमदार अभिमन्यू पवार यांनी घंटानाद करित मंदिर समोर टाळ वाजवून हे आंदोलन केले.

कोरोना प्रादुर्भावाच्या काळात जनजीवन पूर्ववत करण्यासाठी महाविकास आघाडी सरकारने राज्यातील मास–मदिरा पुन्हा सर्व काही चालू केले. मात्र संतांची भूमी असलेल्या महाराष्ट्रातील मंदिरे मात्र बंदिस्त ठेवले आहे. केंद्र सरकारने मंदिरे उघडण्याचे निर्देश दिल्यानंतर, राज्यातील भाविक व सर्वसामान्य नागरिकांकडून मंदिरे उघडण्याची मागणी करण्यात आली. मात्र, राज्य सरकारने त्याकडे सातत्याने दुर्लक्ष केले. त्यामुळे झोपी गेलेल्या ठाकरे सरकार ला जागे करण्यासाठी हे आंदोलन करण्यात आले औसा येथील हनुमान मंदिरासमोर शनिवारी सकाळी ११ वाजता आमदार अभिमन्यू पवार यांच्या उपस्थितीत हे आंदोलन करण्यात आले. याप्रसंगी औसा भाजपचे तालुकाध्यक्ष सुभाष जाधव, सुशीलदादा बाजपाई, ॲड मुक्तेश्वर वागदरे, ॲड अरविंद कुलकर्णी, सुनील उटगे, संतोषअप्पा मुक्ता, महेश पाटील, समीर डेंग, गोपाळ धानूरे, धनंजय परसणे, दिगंबर माळी, भिमाशंकर राचट्टे, लहू कांबळे, काकासाहेब मोरे, महादेव कटके, धनराज काजळे, राजकिरण साठे, पप्पूभाई शेख, पवन राचट्टे, सागर आपुणे, माधवसिंग परिहार, जगदिश परदेशी, विकास नरहरे, सुर्यकांत शिंदे, कमलेश बायस, कल्पना डांगे, तुराब देशमुख, अच्युत पाटील, उन्मेश वागदरे, श्रीकांत स्वामी, सुमनबाई भोसले, विकास कटके, सचिन कांबळे, सचिन आनसरवाडे, प्रतिक पाटील आदीसह भाजप पदाधिकारी, कार्यकर्त्याप्रमाणेच आध्यात्मिक आघाडी, धार्मिक संस्थांचे प्रतिनिधीही सहभागी होते.

# औद्योगिक क्षेत्रांमधील रुग्णांसाठी बोईसर परिसरात २०० बेडचे रुग्णालय निर्माण करावे -जिल्हाधिकारी

**पालघर/प्रतिनिधी**



पालघर जिल्ह्यामध्ये कोरोना चा प्रादुर्भाव वाढत असून जिल्ह्यांमधून बाधित रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे त्यामुळे तारापूर औद्योगिक क्षेत्रांमध्ये औद्योगिक व्यवस्थापनाच्या मदतीने बोईसर व परिसरामध्ये २०० बेड (DCHC) डेडिकेटेड कोव्हीड हेल्थ सेंटर निर्माण करावे, अशी सूचना जिल्हाधिकारी डॉ. कैलास शिंदे यांनी दिली. त्याचबरोबर कांबळगाव ता. पालघर येथील (CCC) कोव्हीड केअर सेंटर चे मजबुतीकरण करणे व टिमा रुग्णालय बोईसर येथील संपूर्ण ४० बेड आयसीयू करण्यात यावे अशा सूचना देखील जिल्हाधिकारी यांनी दिल्या.

सदर विषयास अनुसरून जिल्हाधिकारी डॉ.कैलास शिंदे यांनी दि. २५ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, नियोजन भवन येथे बैठक आयोजित केली होती त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीत प्रांताधिकारी, सहसंचालक ...पान ६ वर

# देवणी तहसिल कार्यालयात दहावी व बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव



**देवणी/प्रतिनिधी**

बारावी व दहावी परिक्षेत यश संपादन केलेल्या २२ विद्यार्थ्यांचा तालुका प्रशासनाच्यावतीने शुक्रवारी तहसिल कार्यालयात प्रशिस्ती पत्र देवुन गौरव करण्यात आला. यावेळी झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तहसिलदार सुरेश घोळवे तर प्रमुख पाहुणे म्हणुन सहाय्यक गटविकास अधिकारी अच्युत पाटील, गटशिक्षणाधिकारी संजय पारसेवार, नायब तहसिलदार हिसामोद्दीन शेख, उपप्राचार्य डी.व्ही.राजे, मंडळअधिकारी उत्तम जाधव, तहसील व गट साधन केंद्र, देवणीतील सर्व कर्मचारी उपस्थित होते. याप्रसंगी उपस्थितांचे मार्गदर्शन झाले. तालुक्यातील १०वी व १२वी बोर्ड परीक्षेतील तालुक्यातुन टॉपटेन गुणवंत विदयार्थ्यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. बारावी बोर्ड परिक्षेतील गुणवंत विज्ञान शाखा श्वेता बिरादार, नंदिनी म्हेत्रे, पुजा म्हेत्रे तर कला शाखेत प्रमोद सुर्यवंशी, जिजाबाई मोरे, गोविंद लखनगावे, वाणिज्य शाखेतुन श्रुती बिरादार, दिव्या बिरादार, प्रिती कारभारी तर किमान कौशल्यावर आधारीत अभ्यासक्रमात प्रवीण कांबळे, सचिन दोरवे, प्रदीप गालचिरले यांचा गौरव करण्यात आला. तर दहावी बोर्ड परिक्षेत शिवकन्या जढाळे, मयुरी पाटील, सानिया मजकुरी, प्रगती शिंदे, शिवकुमार भद्रे, शिवम् स्वामी, विशाखा बिरादार, ओमकार सावरगावकर, मयुरी पंचाक्षरे, स्नेहल डोंगरे यांचा ...पान ६ वर

# 'भारत जोडो'च्या मंडपात गणेश व मोहरम एकत्र!

## देवणी येथे घडतय् राष्ट्रीय एकात्मतचे दर्शन 'हिंदु- मुस्लिम भाई–भाई'



**देवणी/शकिल मनियार**

या वर्षी गणेशोत्सव व मोहरम एकाच कालावधीत आला. सर्वत्र जो तो आपआपले उत्सव साजरा करत असले तरी देवणी येथे भारत जोडो मित्र मंडळाने एकाच मंडपात गणेशाची स्थापना व मोहरमची सवारी बसवुन जणु राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देत हिन्दु- मुस्लिम भाई –भाई नारा समाजाला दिला आहे.

देवणी शहरातील देव नदीच्या काठावर कॅप्टन कृष्णकांत चौकात भारत जोडो मित्र मंडळाच्यावतीने दोन्ही सण भाविकांची श्रध्दावृंदगीत करणारे आहेत. शनिवार दिनांक २२ ऑगस्ट रोजी श्री गणेश ची स्थापना झाली तर मंगळवार दिनांक २५ ऑगस्ट रोजी मौलानी पीर यांची स्थापना एकाच मंडपात करण्यात आली आहे. विशेष बाब म्हणजे गणपती विसर्जन व पिराचे विसर्जन एकाच दिवशी होणार आहेत. मात्र या दोन्ही सणाचा उत्सव साजरा करण्याचा कालावधी एकत्र आल्याने गणेश व मोहरम मंडळाचे पदाधिकारी यांनी चर्चा करुन एकत्र साजरा करण्याचा निर्णय घेतला. असाच योग १९९०–२०१९ व या वर्षी आला आहे. त्यावेळी याच मंडळाने हे दोन्ही उत्सव एकत्र साजरे केले होते. गणेशोत्सवानिमित्त कोरोनाच्या पार्श्वभूमीवर दररोज होणारे भजन, किर्तन, प्रबोधन, सांस्कृतिक कार्यक्रम, आरती, प्रसाद हा कार्यक्रम रद्द करण्यात आले आहेत. रक्तदान शिबिर, आरोग्य तपासणी आधी कार्यक्रम घेण्यात येणार आहेत. तर मोहरमनिमित्त मजमा स्वारी, मिरवणुक व गणपती विसर्जन एकाच दिवशी होणार आहेत असे भारत जोडो गणेश मंडळाचे सचिव स्वप्नील बावगे यांनी सांगितले.

यासाठी वेळेचे नियोजनही केले आहे. दोन्ही उत्सव एकत्र साजरे होत असल्याने भाविकानाही दोन्ही उत्सवाचा आनंद लुटता येत आहे. शिवाय राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन होत आहे. हे दोन्ही कार्यक्रमासाठी दयानंद शेळके व हरीभाऊ पाटील यांचे मार्गदर्शन लाभले तर सर्व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भारत जोडतो गणेश मंडळाचे अध्यक्ष शंकर शिंदे, उपाध्यक्ष हनुमंत कापडे, रमेश बिरादार, बालाजी तंबाके, ईसाक मल्ले वाले, ताहेर शेख, अख्तर बुद्रे, अमित बावगे, लक्ष्मण गिरी, शुभम गुंगेवाड, संजय मुदाळे, अमोल कापडे, कृष्णा ईरले, रामेश्वर कापडे, आदीसह सर्व भक्तगण परिश्रम घेत आहेत.



**वसईचा लाडका...** ओम साई मित्र मंडळ दिवाणमान, वसई पश्चिम येथे प्रतिष्ठापना करण्यात आलेली श्रीगणेशाची आकर्षक मुर्ती. यंदा मंडळाचे १६वे आहे.

# सफाळे पोलिसांनी तिघा चोरट्यांना केले जेरबंद

**सफाळा/प्रतिनिधी**

घरफोडी करणाऱ्या तिघांना अटक करण्यात सफाळा पोलिसांना यश आले असून त्यांनी घरफोडीचे तीन गुन्हे केल्याचे चौकशीत काबुल केले आहेत. तसेच त्यांच्या कडून चोरीचा माल जप्त करण्यात आला आहे. सफाळा पश्चिम येथे रोषण भोईर यांचे साई इलेक्ट्रिक नावाचे दुकान आहे.

या दुकानाच्या मागच्या बाजूचे खिडकी व ग्रील काढून १४ हजारांचे मोबाईल चोरून नेल्याच्या गुन्ह्याची फिर्याद नोंदवण्यात आली होती. या प्रकरणी सफाळा पोलीस ठाण्यात ६२/२०२० गु.र. क्रमांक कलम ४५४,४५७,३८० नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणी पालघरचे उप विभागीय पोलीस अधिकारी विकास नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली सफाळा पोलिसांनी तपास करून राजू पळस (२२) अजय मवी (१९) आणि किसान परमार (१९) यांना अटक करण्यात आली. हे तिघेही पालघरच्या विरधान गावचे रहिवासी असून त्यांनी तीन घरफोड्यांची कबुली दिली. त्यांच्या कडून १५ हजाराचा लॅपटॉप २ हजाराच्या १२ चलनी नोटा, भारतीय चलनातील नोटा एक संमायीकाची दानपेटी, दोन स्टीलचे कुलूप, ३ मोबाईल, ३ एअर फोन आदी जप्त करण्यात आले. या कारवाईत प्रभारी अधिकारी सपोनि सुनील जाधव, पो.उप नि. पंकज पाटील, पो.ह. महेंद्र शर्मा, संदीप नगरे, अमन गायकवाड, शिवपाल प्रधाने यांनी भाग घेतला.

